॥ नायमात्मा बलहीनेन लभ्यः ॥

श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर

(स्थापना: २३ ऑगस्ट १९२५)
संस्थाविधी नोंद क्रमांक १६७६/१९४८-४९ दिनांक २०/१०/१९४८
सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ - २९८ (बी), दिनांक २९/०३/५४

१०० वार्षिक अहवाल उत्पन्न – खर्च पत्रक व ताळेबंद

दिनांक ०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६

श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर
संस्थापक: पूज्य व्यायाम महर्षी कै. प्र. ल. काळे गुरुजी

विश्वस्त मंडळ

डॉ. रुपिन शांतीलाल शहा, श्री. शिवकुमार उदय लाड, श्री. श्रेयस पुरुषोत्तम म्हसकर, पद्मश्री सौ. पद्मजा सुनिल जोगळेकर, श्री. अभय अनंत सावरकर

अध्यक्ष - उपाध्यक्ष (२०२४-२८)

अध्यक्ष - ॲड्. अरुण गोविंद देशमुख, **उपाध्यक्ष -** श्री. श्रीराम शरद दांडेकर

व्यवस्थापक मंडळ (२०२६-२८)

कार्याध्यक्ष - श्री. सुनिल बा. सवने,
कार्योपाध्यक्ष - श्री. स्वप्निल क. राणे,
कोषाध्यक्ष - श्री. स्वप्निल द. खेसे,
सहकोषाध्यक्ष - श्री. वैभव गोविंद पंत,
प्रमुख कार्यवाह - श्री. उदय वि. देशपांडे,
कार्यवाह, व्यवस्थापन - निलेश वि. परब,
कार्यवाह, क्रीडा - श्री. भूपेश ह. ठाकूर,
विश्वस्त प्रतिनिधी - श्री. श्रेयस पु. म्हसकर
सेवक प्रतिनिधी - श्री. प्रेमचंद्र भ. तारी,
सदस्य - श्री. आदित्य प्र. म्हात्रे
सदस्य - डॉ. सौ. नीता सं. ताटके,
सदस्य - सौ. सीमा चं. कोल्हटकर
सदस्य - श्री. रुपेश दि. शेलटकर,
सदस्य - श्री. अजीत सी. कुशे
स्वीकृत सदस्य - कु. हिमानी उ. परब
स्वीकृत सदस्य - कु. अथ:श्री अ. देशमुख

निमंत्रित सदस्य

श्री. गणेश वि. स्वार, श्री. रविंद्र अ. मेणकुरकर, श्री. संतोष रा. गाडे

श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर

कै. प्र. ल. काळे गुरुजी मार्ग, गोखले पथ (उत्तर), दादर (प.), मुंबई ४०० ०२८.

पत्रव्यवहाराचा पत्ता: समर्थ क्रीडा भवन, छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, दादर (प.), मुंबई ४०००२८. दूरध्वनी क्र. २४४५ ७८७०

वार्षिक साधारण सभेची सूचना

श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर, या संस्थेच्या सभासदांची सन २०२५-२६ या वर्षांची **वार्षिक साधारण सभा, रविवार, दि. २९ नोव्हेंबर २०२६ रोजी, सकाळी १०.३० वाजता** समर्थ क्रीडा भवन सभागृह, छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी कृपया वेळेवर उपस्थित रहावे.

विषय पत्रिका

१. दि. २४ ऑगस्ट २०२५ च्या वार्षिक साधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. दि. १.०४.२५ ते ३१.०३.२६ या कालावधीचा अहवाल मंजूर करणे.
३. दि. १.०४.२५ ते ३१.०३.२६ या कालावधीचे उत्पन्नखर्च पत्रक व दि. ३१.०३.२५ अखेरचा ताळेबंद मंजूर करणे.
४. २०२६-२०२७ या वर्षांकरिता हिशेब तपासनिसांची नेमणूक करून त्यांचे मानधन ठरविणे.
५. २०२६-२०२७ च्या अंदाज पत्रकाची माहिती देणे.
६. शताब्दी भवन बांधकामाबद्दल माहिती देणे.
७. संस्थेच्या उपक्रमांबद्दल माहिती देणे.
८. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे अन्य विषय.

व्य. मं. च्या आदेशानुसार
उदय वि. देशपांडे,
प्रमुख कार्यवाह

दि. ३.११.२०२६

विशेष सूचना

१. गणपूर्तीच्या अभावी सभा स्थगित झाल्यास अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी सभा सुरु होईल व अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता रहाणार नाही.
२. दि. २४ ऑगस्ट २०२५ च्या वार्षिक साधारण सभेचे इतिवृत्त, २०२५-२६ ची हिशेब पत्रके दि. १८ नोव्हेंबर २०२६ पासून रोज सायंकाळी ६ ते ७.३० या वेळात समर्थ क्रीडा भवन कार्यालयात पहावयास उपलब्ध असतील.
३. सभासदांना काही प्रश्न अथवा सूचना करावयाच्या असल्यास त्या दि. २४ नोव्हेंबर २०२६ रात्रौ ७.३० पर्यंत लेखी कराव्यात.
४. २०२५-२६ या कालावधीचा अहवाल समर्थ क्रीडा भवन संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध होईल. समर्थच्या ई पत्त्यावर (shreesamarthavyayammandir@gmail.com) ई मेल द्वारे अहवालाच्या प्रतीची मागणी करता येईल. मागणी केल्यास अहवाल पाठविण्यात येईल. संस्थेच्या वेबसाईटवर (www.ssvmdadar.com) अहवाल उपलब्ध असेल.

श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर (प.), मुंबई ४०००२८.

संस्थापक: पूज्य व्यायाम महर्षी कै. प्र. ल. काळे गुरुजी

जन्म: २० ऑक्टोबर १८९८ स्वर्गवास: १७ जुलै १९७३

विश्वस्त मंडळ	
डॉ. रुपिन शांतीलाल शहा	२०२४ ते २०३० पर्यंत
डॉ. अनंत लक्ष्मण जोशी	२०२० ते २०२६ पर्यंत
श्री. शिवकुमार उदय लाड	२०२० ते २०२६ पर्यंत
श्री. श्रेयस पुरुषोत्तम म्हसकर	२०२२ ते २०२८ पर्यंत
पद्मश्री सौ. पद्मजा सुनिल जोगळेकर	२०२२ ते २०२८ पर्यंत
सन् २०२४ ते २०२८ करिता	
अध्यक्ष	**उपाध्यक्ष**
ॲड्. अरुण गोविंद देशमुख	श्री. श्रीराम शरद दांडेकर
व्यवस्थापक मंडळ सदस्य २०२२ – २०२४	
कार्याध्यक्ष	**कार्योपाध्यक्ष**
श्री. अनंत गंगाराम भालेकर (८.८.२५ पर्यंत) श्री. स्वप्निल कमलाकांत राणे (८.८.२५ पासून)	श्री. स्वप्निल कमलाकांत राणे (८.८.२५ पर्यंत) श्री. सुनिल बापू सवने (८.८.२५ पासून)
प्रमुख कार्यवाह	**सहकोषाध्यक्ष**
श्री. उदय विश्वनाथ देशपांडे	श्री. वैभव गोविंद पंत
कार्यवाह, व्यवस्थापन	**कार्यवाह, क्रीडा**
डॉ. सौ. नीता संजीव ताटके	सौ. अस्मिता नायक
सदस्य: श्री. सुनिल बापू सवने, श्री. गणेश विष्णू स्वार, श्री. आदित्य प्रविण म्हात्रे श्री. रुपेश दिवाकर शेलटकर	
सौ. सीमा चंद्रशेखर कोल्हटकर	श्री. भूपेश हरिश्चंद्र ठाकूर
विश्वस्त प्रतिनिधी	**सेवक प्रतिनिधी**
श्री. श्रेयस पुरुषोत्तम म्हसकर	श्री. प्रेमचंद्र भगवान तारी
स्वीकृत	
श्री. गणेश विष्णू स्वार	श्री. ज्ञानेश्वर सदाशिव फडतरे
निमंत्रित	
कु. अथश्री अरुण देशमुख	श्री. प्रकाश तात्याबा माने सौ. संजना संदीप जोशी

९९ वा वार्षिक अहवाल
(दि. १.४.२०२५ ते ३१.३.२०२६)

मान्यवर सभासद,

संस्थेचा सन २०२५ – २०२६ चा अहवाल आपणासमोर मान्यतेसाठी सादर करीत आहोत.

सभा:

अ. विश्वस्त सभा: अहवाल वर्षात संस्थेच्या विश्वस्त मंडळाची सभा झाली नाही.

ब. संयुक्त सभा: अहवाल वर्षात संयुक्त सभा झाली नाही.

ड. व्यवस्थापक मंडळ सभा: सन २०२५-२०२६ या वर्षात व्यवस्थापक मंडळाच्या एकूण ९ सभा झाल्या.

सदस्यांची उपस्थिती पुढीलप्रमाणे होती.

क्र.	नाव	पद	उपस्थिती (९)
१	श्री. अनंत गंगाराम भालेकर	कार्याध्यक्ष	००
२	श्री. स्वप्निल कमलाकांत राणे	कार्योपाध्यक्ष, कार्याध्यक्ष	७
३	श्री. स्वप्निल दत्तात्रय खेसे	कोषाध्यक्ष	९
४	श्री. वैभव गोविंद पंत	सहकोषाध्यक्ष	६
५	श्री. उदय विश्वनाथ देशपांडे	प्रमुख कार्यवाह	९
६	डॉ. सौ. नीता संजीव ताटके	कार्यवाह (व्यवस्थापन)	७
७	सौ. अस्मिता नायक	कार्यवाह (क्रीडा)	००
८	श्री. सुनिल बापू सवने	सदस्य, कार्योपाध्यक्ष	७
९	सौ. सीमा चंद्रशेखर कोल्हटकर	सदस्य	४
१०	श्री. रुपेश दिवाकर शेलटकर	सदस्य	५
११	श्री. भूपेश हरिश्चंद्र ठाकूर	सदस्य	७
१२	श्री. आदित्य प्रविण म्हात्रे	सदस्य	४
१३	श्री. प्रेमचंद भगवान तारी	सेवक प्रतिनीधी	८
१४	श्री. श्रेयस पुरुषोत्तम म्हसकर	विश्वस्त प्रतिनिधी	३
१५	श्री. ज्ञानेश्वर सदाशिव फडतरे	स्वीकृत, सदस्य	५
१६	श्री. गणेश विष्णू स्वार	स्वीकृत	७
१७	कु. अथश्री अरुण देशमुख	निमंत्रित	४
१८	श्री. प्रकाश तात्याबा माने	निमंत्रित	३
१९	सौ. संजना संदीप जोशी	निमंत्रित	५

१. श्री समर्थ योगकेंद्र

श्री समर्थ व्यायाम मंदिर योग केंद्रात सकाळी ६ ते ७, १०.३० ते ११.३०, ११.३० ते १२.३०, दुपारी २.३० ते ३.३० व ३.३० ते ४.३० या वेळांमध्ये अनुभवी प्रशिक्षिकांच्या मार्गदर्शनाखाली, प्रत्येक सत्रात सुमारे ६० महिला, अशा रितीने ३०० महिलांना सूर्यनमस्कार, योगासने, प्राणायाम व विविध मुद्रा यांच्या प्रशिक्षणाद्वारे तणावमुक्त आरोग्य कसे राखता येईल याचे मार्गदर्शन केले जाते. शिस्तबद्ध पद्धतीने हे सर्व व्यायाम प्रकार सांघिकरित्या घेतले जातात. आरोग्य निरोगी राखण्यासाठी तसेच आजच्या धकाधकीच्या व स्पर्धेच्या युगात तणावमुक्त कसे रहावे याबाबत महिलांना जागरूक केले जाते. त्यांना सक्षम बनविले जाते आणि ह्यामुळे महिला साधकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. रक्तदाब, मधुमेह, अर्धशिशी, संधिवात, सायटिका आदि जुनाट आजार यावर खूप फरक पडला आहे.

सकाळच्या पहिल्या सत्रात ६ ते ७ या वेळात सौ. स्मिता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली योगाचा सराव केला जातो. या वर्गातील बहुतेक महिला नोकरी करणाऱ्या आहेत. योगासने तसेच ॲक्युप्रेशर व नॅचरोपथी मधील काही उपयुक्त प्रकार घेतले जातात. आहार-विहार व विश्रांतीचे महत्व समजावले जाते.

सकाळी १०.३० ते ११.३० या वेळेत सौ. कविता मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली योगाचा सराव केला जातो. या मध्ये संधीचालन क्रिया, डोळे, नाक, कान आणि घशासाठी शुद्धीक्रिया, सूर्यनमस्कार, आसन, प्राणायाम, त्रिबंध, हस्तमुद्रा, जोडीदार योगा, ओढणीच्या मदतीने योगा, पतंजलीचे अष्टांगयोग, योग्य आहार, व्यायाम आणि व्यवस्थित झोप यावर माहिती दिली जाते. स्मरणशक्ती वाढवण्यासाठी खेळ व व्यायाम शिकवले जातात. आपल्या शरीरातील वेदनांचे मूळ कारण जाणून त्यावर कोणती आसने करावीत तेही शिकविण्यात येते. मकर संक्राती, मंगळागौर, गुरुपौर्णिमा, नवरात्र आणि आंतरराष्ट्रीय योगदिन असे विविध सण साजरे करण्यात आले.

११.३० ते १२.३० या वेळेत सौ. उमा परब या योगासनांच्या अभ्यासाबरोबर ॲक्युप्रेशर, हास्य योगा तसेच पॉवर योगा यांचाही सराव घेतात. लहान वयाची आठवण करून देणारे विविध खेळही खेळले जातात. योग वर्गात लहान-मोठे सण व वाढदिवस साजरे केले जातात. योगवर्ग एक कुटुंबच बनल्यामुळे त्यांच्यामध्ये सकारात्मक बदल दिसून येतात. याबद्दलच्या भावना महिला वेळोवेळी आपल्या योग शिक्षकांकडे व्यक्त करतात व संस्थेचे आभार मानतात.

दुपारी २.३० ते ३.३० या वेळेत सौ. कल्पना हासे यांच्या मार्गदर्शनाखाली योगाचा सराव केला जातो. योग केंद्रातील महिलांच्या वेगवेगळ्या व्याधी समजून घेऊन त्यांना सूक्ष्म व्यायाम, वेगवेगळी आसने, प्राणायाम, बंध, मुद्रा यांचा अभ्यास घेतला जातो. महिलांनी योगासनांचा सराव केल्यामुळे भावनिक व शारीरिकदृष्ट्या सक्षम होण्यास त्यांना मदत मिळते. 'योगकेंद्र म्हणजे योग मंदिर आहे' असे सर्वांना वाटते.

सायंकाळी ३.३० ते ४.३० या वेळेत सौ. सुचेता वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली सराव केला जातो. योगवर्गात महिलांना मानसिक, शारीरिक व्याधीपासून मुक्तता मिळविण्यासाठी वेगवेगळी आसने, प्राणायाम, सूर्यनमस्कार आदी प्रत्यक्ष शिकवून त्याचे फायदे व तोटे सांगितले जातात. योगवर्गात मकरसंक्रांत, होळी, दसरा, दिवाळी इत्यादि सणानिमित्त सौ. कल्पना हासे सुरेख रांगोळी काढतात. सर्व शिबिरांचे अहवाल त्या वेळेवार लिहून देतात.

दि. २१ जून २०२४ रोजी श्री समर्थ व्यायाम मंदिरातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सकाळी ६ ते ७, १०.३० ते ११.३०, ११.३० ते १२.३०, दुपारी २.३० ते ३.३०, ३.३० ते ४.३० या सर्व ५ योगवर्गात योग शिष्टाचारा प्रमाणे सराव करुन घेण्यात आला. प्रत्येक योगवर्गात ५० महिलांनी भाग घेतला होता. पाचही वर्गातील मिळून एकूण २५० महिला हजर होत्या.

२. श्री समर्थ योगाश्रम

प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या समर्थ योगाश्रमामध्ये श्री. विपुल पाटील, श्री. रवींद्रनाथ जगदाळे, श्री. सुभाष कुबल व श्री. दत्तात्रय कारेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ३० ते ८० वयोगटातील सुमारे ५० योगाभ्यासी रोज सकाळी ७ ते ८ या वेळात सराव करतात. जानेवारी २०२६ पासून श्री. राजीव पाटील यांनी योगाभ्यास शिकवायला सुरुवात केली आहे. यामध्ये मेरुदंड सुस्थितीत राखून, बसून, पोटावर व पाठीवर झोपून तसेच उभ्याने करावयाची योगासने सांघिक पद्धतीने केली जातात. श्वसनाचे विविध प्रकार व प्राणायामही करून घेतला जातो. ओंकार, बंध, मुद्रा, अग्निसार, ध्यान व ॲक्युप्रेशर, नॅचरोपथी मधील काही उपयुक्त प्रकार याचेही प्रशिक्षण दिले जाते. नियमितपणे समंत्रक सूर्यनमस्कार केले जातात. या नियमित योगाभ्यासामुळे अर्धांगवायू वा नैराश्य या सारख्या दुर्धर रोगांमधून गेलेले योगाभ्यासी सावरले आहेत व इतर योगाभ्यासी आरोग्याचा एक चांगला दर्जा राखून आहेत. सर्व योगाभ्यासी शनिवारची श्री बजरंगबलीची आरती करतात. याच दिवशी योगसाधकांचे वाढदिवस साजरे केले जातात. गुरुपौर्णिमेच्या दिवशी सर्व गुरुजनांचा सन्मान केला जातो. संस्थेत विशेष यश मिळविलेल्या खेळाडू, प्रशिक्षक आदींचा खास सत्कार केला जातो.

३. समर्थ क्रीडा भवन

३.१ संस्थेतर्फे आयोजित शिबिरे

संस्थेत नियमित प्रशिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध खेळांच्या प्राथमिक तंत्रांचा सराव होण्यासाठी, त्याचप्रमाणे नियमित येऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध खेळांची तोंडओळख करून देण्यासाठी व सर्व वयोगटातील व्यक्तींना साधनविरहित व्यायामप्रकारांची माहिती करून देण्यासाठी संस्थेतर्फे वर्षभरात ८ ते १० दिवसांच्या कालावधीची एकूण ११ शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांमध्ये खेळांच्या मार्गदर्शनाबरोबरच योगासने, सूर्यनमस्कार व शारीरिक तंदुरुस्तीसाठी आवश्यक व्यायाम प्रकार शिकविले गेले.

३.१ (१) ५१ वे समर्थ वासंतिक क्रीडा प्रशिक्षण शिबिर

५१ वे समर्थ वासंतिक क्रीडा प्रशिक्षण शिबीर, दि. ०२ ते ११ मे २०२५ या कालावधीत समर्थ क्रीडा भवन येथे प्रमुख प्रशिक्षक श्री. उदय देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली रोज सकाळी ७ ते ८.३० व संध्याकाळी ५.३० ते ७ अशा दोन सत्रात पार पडले. दरवर्षी एप्रिल महिन्यात होणारे हे शिबीर यंदा अचानक 'शाळांच्या परिक्षा एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात घेण्यात याव्यात' असा सरकारी अध्यादेश निघाल्यामुळे, मे महिन्यात घेण्यात आले. तसेच खूप उन्हाळा असल्यामुळे शिबिराची वेळ सकाळ–संध्याकाळ २-२ तासाऐवजी दीड-दीड तास करण्यात आली. शिबिराचे उद्घाटन दि. ०२ मे २०२५ रोजी **'पद्म श्री' व अर्जुन पुरस्कार विजेती श्रीमती डायना एडलजी, महिला क्रिकेट, भारताच्या माजी कर्णधार,** यांच्या उपस्थितीत पार पडला. या प्रसंगी 'समर्थ' च्या राज्य व राष्ट्रीय खेळाडूंनी सूर्यनमस्कार, योग मनोरे, जलदीपासने, पुरलेला मल्लखांब, दोरीचा मल्लखांब, ॲथलेटिक्स, ज्युदो या सर्व खेळांची रोमांचक व चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. शिबिराचा समारोप दि. ११ मे २०२५ रोजी **पद्मश्री सुलेखनकार श्री. अच्युत पालव**, यांच्या उपस्थित पार पडला. शिबिरार्थींनी एकत्रित सांघिक सूर्यनमस्कार व शरीरतापन, तसेच पुरलेला मल्लखांब, दोरीचा मल्लखांब, फ्लोअर, बॅलन्सिंग बीम, हर्डल्स आणि लॅडर्स यावर १० दिवसात प्राप्त केलेले कौशल्य दाखविले. समर्थच्या खेळाडूंनी देखील ज्युडो, दोरीचा मल्लखांब, जलदीपासने व पुरलेला मल्लखांब यांची प्रात्यक्षिके सादर केली. या शिबिरात 'पूर्णवाद स्पोर्ट्स अँड प्रमोशन ॲकेडमी', बीडहून ४ विद्यार्थी, 'टच', विहिगांव, कसारा, या संस्थेतून १४ विद्यार्थी आणि फॅमिली होम (गिल ऑफ सर्व्हिस, बॉम्बे) हून २१ विद्यार्थी सहभागी झाले होते. शिबिरार्थींच्या सात गटांतून प्रत्येकी १ प्रमाणे ७ उत्कृष्ट पुरुष व ७ उत्कृष्ट महिला शिबिरार्थींची निवड करण्यात आली. सर्व शिक्षकांमधून २ उत्कृष्ट प्रशिक्षक निवडण्यात आले व त्यांना खास पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. त्यांची नावे पुढील प्रमाणे: **महिला शिबिरार्थी**: मुग्धा शेट्टी (वर्ग १), शेहनाझ शेख (वर्ग २), जोया शेख (वर्ग ३), अनन्या फाटक (वर्ग ४), पहल शिरुमल्ला (वर्ग ५), मायरा कासले (वर्ग ६), ओवी नाईक (वर्ग ७) **पुरुष शिबिरार्थी:** नेताजी पाटील (वर्ग १), पुष्कराज वझे (वर्ग २), तनिष पडवळ (वर्ग ३), क्रिशांक नागवेकर (वर्ग ४), युवांश शेडगे (वर्ग ५), रियान सेल्वराज (वर्ग ६), सार्थक इंगळे (वर्ग ७). **मुली प्रशिक्षिका:** सौम्या जाधव (ॲथलेटिक्स), अपर्णा साळगावकर (ज्युडो). त्याचबरोबर उल्लेखनीय दैनंदिनीसाठी सिया समेळ (वर्ग ६) हिला विशेष पारितोषिक देण्यात आले. या शिबिरामध्ये सहभागी झालेल्या सर्व शिबिरार्थींना सहभाग प्रमाणपत्रे देण्यात आली. वय वर्ष ५ ते ७३ वयोगटातील सुमारे ८०० शिबिरार्थींचा सहभाग, १५० छोटया- मोठ्या प्रशिक्षकांनी केलेले प्रशिक्षणाचे काम, साधनविरहित व्यायाम प्रकारांचे मुलभूत प्रशिक्षण, शरीरतापन, सूर्यनमस्कार व योगासनांच्या प्रशिक्षणावर भर, प्रशिक्षणानंतर सर्व शिबिरार्थी, प्रशिक्षक व स्वयंसेवक यांना पौष्टिक खाऊ, सकाळ व सायंकाळ अशा प्रत्येक सत्राची ध्वजारोहणाने सुरुवात व ध्वजावतरणाने शेवट आणि त्यासाठी प्रत्येक दिवशी चार असे दहा दिवसात शिबिराला भेट देणारे चाळीस नामवंत मान्यवर, ही या शिबिराची काही खास वैशिष्ट्ये होती. यावर्षी संस्थेचं शताब्दी महोत्सवी

वर्ष असल्यामुळे शिबिरामध्ये चाचण्या न घेता सर्व इच्छुक विद्यार्थ्यांना संस्थेत नियमित प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्यात आला.

दि. ४ मे २०२५ रोजी शिबिरार्थींच्या पालकांची सभा २ सत्रांमध्ये घेण्यात आली. शिबिरात वेळ पाळण्याचा काटेकोरपणा, प्रशिक्षकांचा उत्साह, आयोजनातील शिस्त व समन्वय याचे सर्व पालकांनी कौतुक केले.

पालक व इतर अनेक कार्यकर्त्यांनी आयोजनामध्ये, हजेरी घेण्यात, खाऊ वाटण्यात, मोलाची मदत केली. शिबिराच्या खाऊसाठी उच्च दर्जाचे आणि वाजवी दरात वाणसामान मिळविण्यास 'श्रीनाथ ज्वेलर्स' यांनी विशिष्ट सहकार्य केले. श्री. अजय लालवाणी यांनी एक दिवस कलिंगडाचा खाऊ सर्वाना दिला. सौ. शीतल आवटी यांचे वडील श्री. रोहिदास गणपत शिंदे ताजी जिलबी करून देण्यासाठी खास ब्राह्मण वाडा, अहमदनगरहून शिबिरासाठी आले. या शिबिराची पूर्व तयारी म्हणून दि. २८ ते ३० एप्रिल २०२४ या कालावधीत प्रशिक्षक प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले. प्रशिक्षक प्रशिक्षण शिबिराच्या शेवटी लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा घेऊन त्यात ६०% व अधिक गुण मिळविणाऱ्या प्रशिक्षकांना ५१ व्या वासंतिक प्रशिक्षक प्रशिक्षण शिबिरासाठी प्रशिक्षक व सहप्रशिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले. सर्व शिबिरार्थींना व प्रशिक्षकांना रोज पौष्टिक खुराक देण्यात आला.

३.१ (२) ४१ वे समर्थ पावसाळी मल्लखांब शिबिर.

यंदाचे हे ४१ वे पावसाळी मल्लखांब शिबीर, दि. २३ ते ३० जून २०२५ या कालावधीत सकाळी ७ ते ८ व संध्याकाळी ७ ते ८ अशा दोन सत्रांमध्ये घेण्यात आले. दि. २३ जून २०२५ रोजी सकाळी ७ ते ८ या वेळात झालेल्या शिबिरात सकाळच्या सत्राच्या मुलांचे वर्ग पाडून त्यांचे प्रशिक्षण सुरु करण्यात आले. दि. २३ जून २०२५ रोजी सायंकाळी ७ ते ८ या वेळात झालेल्या शिबिराच्या औपचारिक उद्घाटन समारंभाला श्री. अमिताभ सिंग, चीफ पोस्ट मास्टर जनरल, महाराष्ट्र आणि गोवा, श्री. यादगिरी, सहाय्यक संचालक, जी. पी. ओ., मुंबई, हे उपस्थित होते. त्यावेळी 'समर्थ' प्रशिक्षकांनी दोरीच्या व पुरलेल्या मल्लखांबावर विविध उड्या, सूर्यनमस्कार, जलदीपासने, यांची नेत्रदीपक प्रात्यक्षिके सादर केली. दि. २९ जून २०२५ रोजी सकाळी ७ ते ८ आणि संध्याकाळी ७ ते ८ या सत्रांप्रमाणे २ पालक सभा घेण्यात आल्या. दोन्ही पालक सभांमध्ये मा. प्रमुख प्रशिक्षक श्री. उदय वि. देशपांडे यांनी पालकांना संबोधित केले. सकाळच्या पालक सभेत ९ व सायंकाळच्या पालक सभेत ६० असे एकूण ६९ पालक उपस्थित होते. शिबिराच्या ८ दिवसात प्रशिक्षकांच्या मदतीने शिबिरार्थींना दोरीचा, पुरलेला, निराधार, बाटलीचा, टांगता मल्लखांब यांचे प्रशिक्षण देण्यात आले. दि. ३० जून २०२५ रोजी झालेल्या समारोप समारंभाला 'निकम ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज'चे संचालक श्री. समाधान निकम, रोटरी क्लब ऑफ मुंबई सायन'चे अध्यक्ष श्री. किरण शेट्ये, सचिव श्री. अविनाश राव व सदस्य सौ. शशिकिरण पारेख यांच्या उपस्थितीत निवडक शिबिरार्थींनी दोरी व पुरलेला मल्लखांब यांची प्रात्यक्षिके दाखविली. समर्थ प्रशिक्षकांनी, जलदीपासने, दोरी मल्लखांब, दीप रोप मल्लखांब, पुरलेल्या मल्लखांब,

हत्यारी मल्लखांब यावर वैयक्तिक संच व मनोरे अशी प्रगत चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. नियमित उपस्थिती, वर्गातील प्रगती व दैनंदिनी यावरून सकाळच्या सत्रातील उत्कृष्ट छोटे शिबिरार्थी म्हणून आहना ठक्कर व आद्य बाळगी यांना तर सायंकाळच्या सत्रातील वल्लभी केळूसकर व देव लोटणकर, तसेच सकाळच्या सत्रातील सौ. प्राची दवंडे व श्री. भूषण दवंडे यांना तर सायंकाळच्या सत्रातील विधी मोपी व केतन पवार यांना उत्कृष्ट मोठे शिबिरार्थी म्हणून पाहुण्यांच्या हस्ते विशेष पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. ह्या वर्षीचे उत्कृष्ट मोठे प्रशिक्षक अनंत पासलकर व शीतल बागायतकर तर उत्कृष्ट छोटी प्रशिक्षक आराध्या खोत यांनाही पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. भुज (गुजरात) येथे समर्थ प्रशिक्षक मंदार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या समर्थ प्रशिक्षणामधून तेथील विविध शाळांमधून आलेले तीन विद्यार्थी - हितेश सलाट, हिरेन बलिया, अतावाला समा व त्यांचे मार्गदर्शक मीत पेठाणी यांनी शिबिरात यशस्वी सहभाग नोंदवला. हे पाचही जण दहा दिवस मुक्कामाला समर्थ क्रीडा भवनात होते. त्यांचाही पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सर्व पाहुण्यांनी आपल्या भाषणात समर्थच्या उपक्रमांचे व प्रात्यक्षिकांचे कौतुक केले. सर्व शिबिरार्थींना सहभाग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सौ. नीता ताटके व काही प्रात्यक्षिकांचे सूत्रसंचालन तनिष्का नगरकर ह्यांनी केले. श्री समर्थ व्यायाम मंदिराच्या शताब्दी वर्ष महोत्सवानिमित्त या शिबिरात शिबिरार्थींच्या मानसिक व शारीरिक चांचण्या न घेता सर्व इच्छुक शिबिरार्थींना संस्थेत नियमित प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्यात आला.

३.१ (३) ९ वे समर्थ लाठी-काठी शिबिर

श्री समर्थ व्यायाम मंदिर येथे ९ वे समर्थ लाठी – काठी शिबिर प्रशिक्षक श्री. शैलेश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २७ ते ३१ मे २०२५ या कालावधीत सायंकाळी ७ ते ८ या वेळात पार पडले.

या शिबिरामध्ये ३ मुलगे व ९ मुली असे एकूण १२ विद्यार्थी सहभागी झाले होते. सर्व शिबिरार्थींना ५ दिवसात शिरवार, चिनवार यातील १४ प्रकार, दिशा बदल करून वार करणे, बगल असे लाठीकाठीचे प्राथमिक प्रशिक्षण देण्यात आले.

३.१ (४) ३७ वे समर्थ ज्युदो शिबिर

दि. १८ ते २५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत सायंकाळी ७ ते ८ या वेळात ३७ व्या समर्थ ज्युदो शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या उदघाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राजेश मयेकर तसेच सन्माननीय अतिथी म्हणून श्री. नीलकंठ मयेकर व श्री. के. रवी उपस्थित होते. या समारंभास संस्थेचे प्रमुख कार्यवाह मा. श्री. उदय देशपांडे व ज्युदो चे प्रमुख प्रशिक्षक रवींद्र पाटील हे देखील उपस्थित होते. या प्रसंगी श्री समर्थ व्यायाम मंदिराच्या ज्युदो व मल्लखांबाच्या खेळाडूंनी प्रात्यक्षिके दाखविली.

या शिबिराचा समारोप समारंभ दि. २५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ७ ते ८ या वेळात पार पडला. समारोपासाठी प्रमुख पाहुणी म्हणून मधुरा चंद्रकांत वयकर तसेच सन्माननीय

अतिथी म्हणून रमेश आनंद उपस्थित होते. या प्रसंगी व्यायामशाळेच्या राज्य व राष्ट्रीय ज्युदो खेळाडूंबरोबरच शिबिरार्थिंनीही प्रेक्षणीय प्रात्यक्षिके सादर केली.

शिबिरार्थींची पालक सभा दि. २४ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ७ ते ८ या वेळात, सेन्सेई श्री. रवींद्र पाटील, ज्युडो विभाग प्रमुख, यांनी घेतली. पालकांनी या सभेस चांगला प्रतिसाद दिला. या शिबिरातील सर्वोत्कृष्ट शिबिरार्थी म्हणून मुलांमध्ये यश बजोरिया, अर्णव जगडे व कृषिव चावण तसेच मुलींमध्ये सानवी निकम, आराध्य गावडे व आरोही चवन यांना पारितोषिक देण्यात आले. सर्वोत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून मुलांमध्ये आयुष फाळके, अथर्व शिंगरे व ओजस बर्वे तसेच मुलींमध्ये भूमि कोर्डे, आरोही शिंत्रे व केवा विस्पुटे यांची निवड झाली. राष्ट्रगीतांनी कार्यक्रमाची सांगता झाली.

या शिबिरात सर्व शिबिरार्थीना पुरणपोळी, भेळ, चणा मसाला, फ्रूट सलाद, कोथिंबीर वडी, बटर कॉर्न, थालीपीठ व अननसाचा शिरा हा खाऊ देण्यात आला. शिबिराच्या खाऊचा, प्रमुख पाहुण्यांच्या भेटवस्तूंचा व उत्कृष्ट खेळाडूंच्या भेटवस्तूंचा संपूर्ण खर्च नियमित येणाऱ्या ज्युदो खेळाडूंच्या पालकांनी व सीनियर खेळाडूंनी केला.

३.१ (५) ३रे समर्थ रांगोळी शिबिर

३ रे समर्थ रांगोळी शिबिर, दि. ०६ ते ११ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आले.

दि. ०६-१०-२०२५ रोजी सौ.कविता मिश्रा यांनी ३ ॐ कार प्रार्थनेने सुरुवात केली. रांगोळी प्रात्यक्षिक प्रत्यक्ष काढून दाखविले. सर्वांना 'संस्कार भारती'ची ५ प्रथम चिन्हे काढून दाखविली व त्याचा सराव करुन घेतला. शेवटी शान्ति पाठ घेतला. उपस्थिती २१.

दि. ०७-१०-२०२५ रोजी पहिल्या दिवशी शिकवलेल्या चिन्हांचा सराव करून घेतला. आज नविन चिन्हे सर्व प्रकारचे तुरे, सर्प रेषा, स्वस्तिक, कमळ, समई, आदि बोटाने काढायची चिन्हे शिकवली. उपस्थिती २१.

दि. ०८-१०-२०२५ रोजी शिकवलेल्या रांगोळीची उजळणी घेऊन गोल, अर्धगोल, चौकोन कोपरा या मध्ये कशी रांगोळी काढतात हे प्रात्यक्षिक करून दाखविले. लक्ष्मीची पावले हनुमान गदा, कलश, सर्प रेषा ही नविन चिन्हे शिकवली व सराव करून घेतला. उपस्थिती २०.

दि. ०९-१०-२०२५ रोजी फुलांची रांगोळी, पाकळ्या, पाने कापणे ही पूर्व तयारी कशी करायची ते सांगून प्रात्यक्षिक करून दाखविले. उपस्थिती २१.

दि. १०.१०.२०२५ रोजी सौ. कविता मॅडमनी ३ ॐ कार प्रार्थनेने सुरुवात केली. चार दिवस शिकवलेल्या चिन्हांचा सराव केला. तेलावरील रांगोळी शिकवली सराव करून घेतला. उपस्थिती २०.

दि. ११.१०.२०२५ रोजी शिबिराची सुरुवात ॐ कार प्रार्थनेने केली. सर्व उपस्थित महिलांनी ५, ५ जणांचे गट बनवून मैदानात रांगोळ्या काढल्या. अशा प्रकारे शिबिराची सांगता झाली. उपस्थिती १८.

३.१ (६) ११ वे समर्थ सूर्यनमस्कार शिबिर

दि. १० ते १५ नोव्हेंबर २०१५ या कालावधीत ११ वे समर्थ सूर्यनमस्कार व हस्तमुद्रा शिबिर २०२५ समर्थ क्रीडा भवन येथे संपन्न झाले.

दि. १०-११-२०२५ रोजी शिबिराची सुरुवात सौ. उमा परब यांनी केली. शिबिराच्या प्रमुख पाहुण्या व उद्घाटक सौ. मधुरा करंबेळकर यांनी सूर्यनमस्कार करायच्या आधी करावयाचे 'संधीचालन प्रकार व सूर्यनमस्कार' याबद्दल प्रात्यक्षिकासहित माहिती दिली व फायदे, तोटे सांगितले. कु. स्वप्ना शहा यांनी प्रात्यक्षिक करून दाखविले. सर्व शिबिरार्थीकडून सराव करून घेतला. डॉ. सौ. नीता ताटके यांनी लहान व तरुण शिबिरार्थींना प्रोत्साहन मिळावे म्हणून खेळाडूंचे अनुभव सांगितले. सौ. स्मिता जाधव व सौ. सुचेता वैद्य यांनी शिबिराच्या प्रमुख पाहुण्या सौ. मधुरा करंबेळकर यांना सन्मान चिन्ह देऊन त्यांचा सन्मान केला. सौ. उमा परब यांनी ॐ काराने शिबिराच्या पहिला दिवसांची सांगता झाली. दि. ११.११.२०२५ सौ. सुचेता वैद्य यांनी ३ ओमकार व प्रार्थनेने सुरुवात केली. सौ. स्मिता जाधव यांनी ज्ञान मुद्रा, वायु मुद्रा, आकाश मुद्रा, शुन्य मुद्रा, पृथ्वी मुद्रा, सूर्य मुद्रा, वरुण मुद्रा, जलोदरनाशक मुद्रा, अपान मुद्रा, अपान वायू मुद्रा (संजिवनी मुद्रा) किंवा हदयसंजिवनी मुद्रा या सर्व मुद्रांची माहिती दिली व प्रात्यक्षिक करून दाखविले. शिबिरार्थींकडून करून घेतले. सौ. कविता मिश्रा आणि सौ. उमा परब यांनी सौ. स्मिता जाधव यांना सन्मान चिन्ह देऊन त्यांचा सन्मान केला. दि. १२.११.२०२५ सौ. कविता मिश्रा यांनी ३ ओमकार व प्रार्थनेने सुरुवात केली. सौ. कल्पना हासे यांनी राम नमस्कार व महत्व सांगितले. प्रात्यक्षिक सौ. वंदना ठाकुर यांनी केले. सर्व शिबिरार्थींकडून सराव करून घेतला. सौ. उमा परब यांनी २२ अंकांचे सूर्यनमस्कार प्रात्यक्षिक करून दाखविले व सर्वांकडून करून घेतले. उपस्थिती ९.

दि. १३.११.२०२५ सौ. सुचेता वैद्य यांनी ओमकार व प्रार्थनेने सुरुवात केली. श्री. सुधाकर रोकडे सरांनी 'हीलिंग'बद्दल माहिती दिली. त्यांच्या अनुयायी सौ. संध्या, सौ. हेमा, सौ. सुचेता यांनी काही महिलांचे 'हीलिंग' करून घेतले. श्री. सुधाकर रोकडे यांना सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. दि. १४.११.२०२५ रोजी ३ ओमकार व प्रार्थनेने सुरुवात झाली. सौ. सुचेता वैद्य यांनी खुर्चीवर बसून सूर्यनमस्कार करण्याचे फायदे व तोटे सांगितले. सौ. कविता मिश्रा यांनी सूर्यनमस्कार करण्याअगोदरचे शिथिलीकरण करून घेतले. सौ. अलका घाडगे यांनी प्रात्यक्षिक करून दाखविले. उभ्याने व बसून करावयाचे असे दोन्ही प्रकारचे सूर्यनमस्कार शिकविले व सविस्तर माहिती दिली. सूर्यनमस्कार कोणी करावे व कोणी करू नये याची माहिती दिली. हस्तमुद्रा माहिती अपान वायू मुद्रा, प्राण मुद्रा, ज्ञान मुद्रा, अमृत संजिवनी मुद्रा, गणेश मुद्रा शिकवल्या व शेवटी शंका निरसन केले. ओमकाराने शिबिराच्या पाचवा दिवसांची सांगता झाली. आज बालदिनाच्या निमित्ताने सौ. सुचेता मॅडम आणि सौ. कविता मॅडम यांना कु. अलिया मोकाशी, कु. स्पदंन रेमझे या

बाल शिबीरार्थींकडून सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. सौ. कविता मॅडम यांनी सौ. कल्पना हासे यांना सन्मान चिन्ह देऊन सन्मानित केले. दि.१५.११.२०२५ ३ ॐ कार प्रार्थनेने सुरुवात झाली. शिबीरामध्ये ५ दिवस सर्व योग शिक्षिकांनी शिकलेल्या सूर्यनमस्कार व हस्तमुद्रा यांचा सौ. स्मिता मॅडम व सौ. कल्पना मॅडम यांनी सराव करून घेतला व शंकानिरसन केले. सौ. स्मिता जाधव यांनी सर्व योग साधकांना सहभाग प्रमाणपत्र दिली. सर्व योग शिक्षिकांचे, श्री. प्रेमचंद्र तारी, श्री. महेंद्र राऊत, कु. विजयश्री माजगांवकर, सौ. संजना जोशी यांचे सहकार्य लाभले.

३.१ (७) ५० वे समर्थ दीपावली जिम्नॅस्टिक्स शिबिर

५० वे दीपावली जिम्नॅस्टिक्स शिबीर, दि. ०३ ते १० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत, रोज संध्याकाळी ६ ते ७ या वेळात मुंबई जिल्हा जिम्नॅस्टिक्स संघटनेच्या परवानगीने संपन्न झाले. शिबिरप्रमुख म्हणून श्री. फिरोज बेळगावकर यांनी काम बघितले.

या शिबिरात श्री. फिरोज बेळगावकर, अंजली देसाई व श्री. विकास मिश्रा यांनी प्रशिक्षणाचे काम बघितले. श्री. सुनील सवने यांनी शिबिराला वेळोवेळी मार्गदर्शन केले. शिबिराच्या शेवटच्या दिवशी श्री. सुनील सवने यांच्या हस्ते मुलींमध्ये रीवा छेडा व मुलांमध्ये रुद्र पाटील यांना उत्कृष्ट शिबिरार्थी म्हणून बक्षीस देऊन त्यांचा सन्मान केला.

३.१ (८) २७ वे समर्थ ॲथलेटिक्स् शिबिर

२७ वे ॲथलेटिक्स् शिबीर दि. १५ ते २४ डिसेंबर २०२५ या दरम्यान पार पडले. या शिबिरात २०५ शिबिरार्थींनी प्रवेश घेतला होता. विभाग प्रमुख श्री. सुनील सवने तसेच शिबीरप्रमुख सौ. प्रियांका शेट्टी आणि श्री. अंगद अजगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली ॲथलेटिक्स् विभागात नियमित सराव करणाऱ्या जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील २९ खेळाडूंनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. शिबिराच्या उद्घाटनाला श्री. सुदर्शन सांगळे, विश्वस्त, श्री. सिद्धिविनायक मंदिर ट्रस्ट आणि श्री. हर्षल गुरव, विश्वस्त, राजराजेश्वरी प्रतिष्ठान न्यास, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शिबिरात काय शिकवले जाणार ह्याची प्रात्यक्षिके याप्रसंगी शिबिरार्थी आणि त्यांच्या पालकांना ॲथलेटिक्स् विभागातील खेळाडूंनी आणि मल्लखांबाची प्रात्यक्षिके मल्लखांबाच्या खेळाडूंनी सादर केली. या शिबिरात शिबिरार्थींना शरीरतापन, सूर्यनमस्कार तसेच ॲथलेटिक्स् मधील विविध प्रकारची हर्डल्स, लॅडर्स, लांब उडी, उंच उडी, गोळा फेक, थाळी फेक, भाला फेक व धावण्याच्या विविध शर्यतीत वापरण्यात येणाऱ्या तंत्रांची माहिती करून देण्यात आली आणि सराव करून घेण्यात आला. संस्थेचे १०० वे वर्ष असल्यामुळे शारीरिक व मानसिक चाचण्या घेतल्या नाहीत. रविवार, दि. २१.१२.२४ रोजी आयोजित पालक सभेत कार्यवाह व्यवस्थापन डॉ. नीता ताटके, ॲथलेटिक्स् विभाग प्रमुख श्री. सुनील सवने आणि कार्याध्यक्ष श्री. स्वप्निल राणे यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. शिबिरासाठी उपकरणे आणि खाऊ यांचे प्रायोजन पालक आणि मास्टर्स ॲथलेटिक विद्यार्थ्यांनी केले. समारोप सोहळ्यासाठी मुख्य अतिथी श्री. रोहित सूर्यवंशी, आघाडीचे मॉडेल आणि अभिनेता आणि श्री. विशाल

कराळकर, संस्थेचे माजी विद्यार्थी व सध्या सिडनी येथे क्रीडा कार्यक्रम व्यवस्थापनात कार्यरत असलेले उपस्थित होते. वरिष्ठ शिक्षक कु. आर्यन सवने यांनी शिबिरादरम्यान घेतलेल्या क्लिप्सवर एक छोटा व्हिडिओ तयार केला होता तो दाखविण्यात आला. यावेळी शिबिरार्थींनी ॲथलेटिक्स् मधील विविध क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके सादर केली. सार्थक जाधव (उत्कृष्ट छोटा शिबिरार्थी), आर्या मयेकर (उत्कृष्ट छोटी शिबिरार्थी), सिद्धेश चौहान (उत्कृष्ट मोठा शिबिरार्थी), अनीषा राऊत (उत्कृष्ट मोठी शिबिरार्थी), कु. आराध्या गायकवाड (उत्कृष्ट छोटी प्रशिक्षक), कु. गौरेश दळवी (उत्कृष्ट छोटा प्रशिक्षक), कु. आरती यादव (उतेजनार्थ प्रशिक्षक) यांना विशेष पारितोषिक देण्यात आले, ५० मीटर धाव स्पर्धेतील विजेत्यांना पदकांनी सन्मानित करण्यात आले. 'शुभम ज्वेलर्स'चे मालक व ज्येष्ठ खेळाडू शुभम देवकर यांच्याकडून शिबिरातील शिक्षकांसाठी 'टी-शर्ट' देण्यात आले. उत्कृष्ट शिबिरार्थी, शिक्षक व पाहुण्यांच्या भेटवस्तू, तसेच खाऊ व प्रमाणपत्रांचा खर्च ॲथलेटिक्स् विभागातील पालकांनी विभागून केला. शिबिराच्या समारोप प्रसंगी सर्व शिबिरार्थींना श्री. शुभम देवकर यांच्यातर्फे खाऊ वाटण्यात आला.

३.१ (९) २ रे समर्थ तंदुरुस्ती शिबिर

दि. १५ ते २१ जानेवारी २०२६ या कालावधीत दुसरे तंदुरुस्ती शिबिर पार पडले. दि. १५.१.२०२६ रोजी श्री. उदय वि. देशपांडे यांनी नियमित व्यायामाचे फायदे सांगून या शिबिराचे औपचारिक उद्घाटन केले. त्यानंतर श्री. सुनिल सवने यांनी शरीरतापनाचा वर्ग घेतला. दि. १६.१.२०२६ रोजी श्री. श्रेयस म्हसकर यांनी सूर्यनमस्कार, दि. १७.१.२०२६ रोजी श्री. सुनिल सवने यांनी तंदुरुस्तीचे 'कोअर' व्यायाम प्रकार, दि. १८.१.२०२६ रोजी श्री. उदय वि. देशपांडे यांनी योगासने व श्री. सुनिल सवने यांनी ध्यान (मेडीटेशन) घेतले. दि. १९.१.२०२६ रोजी श्री. स्वप्निल राणे यांनी प्रगतीकारक व्यायाम, दि. २०.१.२०२६ श्री. उदय देशपांडे यांनी सूक्ष्म व्यायाम घेऊन, दोरी मल्लखांबावर विविध प्रकार शिकवले. डॉ. सौ. नीता ताटके यांनी सहाय्यक म्हणून काम बघितले. दि. २१.१.२०२६ रोजी श्री. स्वप्निल खेसे यांनी ताकद याचे विविध व्यायाम शिकवले. त्यानंतर झालेल्या समारोप समारंभात शिबिरार्थींनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. श्री. उदय वि. देशपांडे यांच्या हस्ते शिबिरार्थींना प्रमाणपत्रे देण्यात आली.

३.१ (१०) ३० वे समर्थ खो खो शिबिर

दि. १७ ते २६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत समर्थ क्रीडा भवनाच्या पटांगणावर सायंकाळी ७ ते ८ या वेळेत सदर शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उदघाटन श्री. प्रशांत (काका) पाटणकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते, आंतरराष्ट्रीय पंच, श्री. बाला स्वामिनाथन, डॉ. स्मृति पवार, स्पोर्ट्स फिजिओथेरपिस्ट, श्री. मनोज पवार, महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू व पद्मश्री पुरस्कार प्राप्त श्री. उदय देशपांडे सर यांच्या हस्ते झाले. शिबिरातील शिबिरार्थींच्या पालकांची सभा रविवार दि. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ७ ते ८ या वेळेत श्री. उदय देशपांडे, कार्यकारिणी सदस्य

श्री. भूपेश ठाकूर व माजी खो खो विभागप्रमुख श्री. निलेश परब यांनी घेतली. शिबिराचा समारोप गुरुवार दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी श्री. नरसीराम चौधरी, श्री. वॉल्टर फर्गोस व श्री. उदय देशपांडे सर यांच्या हस्ते झाला. या प्रसंगी विहान नीरन परब, रिशिता सुजित पवार (छोटे उत्कृष्ट शिबिरार्थी), अर्णव प्रशांत जागडे, अन्विका प्रभाकर शिंदे (मोठे उत्कृष्ट शिबिरार्थी), अद्वैत प्रसाद हडकर, आराध्या धर्मराज माळी (छोटे उत्कृष्ट प्रशिक्षक), स्वरूप जयंत सुत्रावे, युक्ता धर्मेंद्र पटेल (मोठे उत्कृष्ट प्रशिक्षक) यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. शिबिरात मुले व मुली असे एकूण १६४ शिबिरार्थी सहभागी झाले होते. शिबिरातील सहभागी सर्व शिक्षक, सहाय्यक शिक्षक व सहाय्यक यांना इंदुमनी इंफ्रा ह्या बांधकाम कंपनीचे प्रवर्तक श्री. नरसीराम चौधरी व श्री. वॉल्टर फर्गोस यांनी टी शर्ट प्रायोजित केले होते.

शिबिरास भेट दिलेल्या मान्यवरांच्या नावांची यादी: १८ फेब्रुवारी २०२६ - श्री. सुरेंद्रकुमार विश्वकर्मा - विद्यार्थी क्रीडा केंद्र. मुंबई खो खो संघटनेचे प्रमुख कार्यवाह, श्री. निलेश सावंत, अमर हिंद मंडळाचे कार्यकारिणी सदस्य. राष्ट्रीय पंच, १९ फेब्रुवारी २०२६ - श्री. डलेश देसाई, सरस्वती स्पोर्ट्स क्लब, राष्ट्रीय खेळाडू, राष्ट्रीय पंच व राष्ट्रीय प्रशिक्षक. मुंबई खोखो संघटनेचे खजिनदार, श्री. श्रीकांत गायकवाड, युवक क्रीडा मंडळ राष्ट्रीय खेळाडू, मुंबई खो खो संघटनेचे सहकार्यवाह, २० फेब्रुवारी २०२६ - श्री. पराग आंबेकर, विद्यार्थी क्रीडा केंद्र, परळ शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू, त्याच संस्थेचे सचिव, राष्ट्रीय प्रशिक्षक, ॲड. श्री. अरुण देशमुख, दादोजी कोंडदेव पुरस्कार प्राप्त. राष्ट्रीय पंच. समर्थ व्यायाम मंदिर संस्थेचे व मुंबई खो खो संघटनेचे विद्यमान अध्यक्ष, २१ फेब्रुवारी २०२६ - आस्था महाडिक - संस्थेची राष्ट्रीय खेळाडू. किशोर-किशोरी गट राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा, हरयाणा, श्री. तुषार चिखले - युवक क्रीडा मंडळ, परळ. राष्ट्रीय खेळाडू तसेच राष्ट्रीय पंच, सौ. श्वेता पाटेकर - राष्ट्रीय खेळाडू, महाराष्ट्र खो खो असोसिएशनच्या तांत्रिक समिती सदस्या. २२ फेब्रुवारी २०२६ - सौ. प्राची गवंडी - राष्ट्रीय खेळाडू, मुंबई खो खो संघटनेच्या तांत्रिक समिती सदस्या, श्री. संतोष चव्हाण (कपिल सर) – पोलीस उपनिरीक्षक, फुटबॉल खेळातील राष्ट्रीय खेळाडू, श्री. महेंद्र भोसले - पोलीस उपनिरीक्षक, हॉकी खेळातील आंतरराष्ट्रीय खेळाडू. २३ फेब्रुवारी २०२६ - प्रेमनाथ कुसुम हरिश्चंद्र कदम – पॉवरलिफ्टिंग खेळात जिल्हा क्रीडा पुरस्कार, शिवछत्रपती पुरस्कार, जिजाऊ पुरस्कार, नाशिक, २०१० ते २०१७ स्ट्रॉग मॅन ऑफ मुंबई शहर, महापौर चषक, राष्ट्रीय व फेडरेशन स्पर्धेत सुवर्ण पदक, श्री. विकास पाटील - ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर संस्थेचे कार्यकारिणी सदस्य व प्रशिक्षक, मुंबई खो खो संघटनेचे उपाध्यक्ष व तांत्रिक समिती अध्यक्ष. राष्ट्रीय पंच, श्री. माधव खरे – अध्यक्ष - अखिल भारतीय कीर्तन मंदिर, दादर, उपाध्यक्ष – ब्राह्मण सहाय्यक संघ व धन्वंतरी रुग्णालय, दादर, श्री. महेश करमळकर - सरस्वती स्पोर्ट्स क्लबचे राष्ट्रीय खेळाडू, आंतरराष्ट्रीय पंच, भारतीय रेल्वेच्या मध्य रेल्वे संघाचे प्रशिक्षक, २४ फेब्रुवारी २०२६ - श्री. समाधान नामदेव धोमसे ॲथलेटिक्स्, वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी, श्री. प्रफुल्ल पाटील - सहकार कला क्रीडा व विज्ञान संस्थेचे नावाजलेले राष्ट्रीय खेळाडू. मुंबई खो खो संघटनेचे उपाध्यक्ष. श्री. रेविलोनो फर्नांडीस - राष्ट्रीय फुटबॉल खेळाडू, संतोष

ट्रॉफी स्पर्धेत सहभागी, २५ फेब्रुवारी २०२६ - श्री. गंगाधर राणे - विद्यार्थी क्रीडा केंद्र, परळ राष्ट्रीय खेळाडू. भारतीय रेल्वेच्या पश्चिम रेल्वे संघाचे मुख्य प्रशिक्षक. रग्बी मध्ये भारतीय संघाचे नेतृत्व, डॉ. सौ. नीतू जोशी – सहयोगी प्राध्यापक – माटुंगा येथील आर. ए. पोदार कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्समध्ये मुंबई विद्यापीठात बी.पी.एड. अभ्यासक्रमात सुवर्णपदक विजेती. क्रीडा मानसशास्त्र विषयावर त्यांनी १२ पेपर्स प्रसिद्ध, अनेक आंतरराष्ट्रीय सेमिनार मध्ये सहभागी. २६ फेब्रुवारी २०२६ - श्री. नरसीराम चौधरी - इंदुमनी इंफ्रा ह्या बांधकाम कंपनीचे प्रवर्तक, श्री. वॉल्टर फर्गोस - इंदुमनी इंफ्रा ह्या बांधकाम कंपनीचे प्रवर्तक श्री. अधिराज लोकेगावकर, CEO

३.१ (११) १० वे समर्थ योगासन शिबिर २०२६

दि. ०९.०३.२०२६ रोजी शिबिराची सुरुवात सौ. उमा परब यांनी केली. प्रमुख पाहुणे श्री. राजीव हरिशंकर पाटील यांनी योग विषयावर माहिती देऊन ताडासन कसे वेगवेगळ्या पध्दतीने करता येते हे सविस्तरपणे सांगितले व सराव करून घेतला. योगशिक्षिका डॉ. सौ. स्मिता जाधव यांनी श्री. राजीव पाटील यांचा शाल देऊन सत्कार केला. दि. १०.०३.२०२६ रोजी सौ. सुचेता वैद्य यांनी ३ ॐ कार प्रार्थनेने सुरुवात केली. सौ. प्रिया पर्वते यांनी मधुमेह (डायबिटीस) साठी संधीचलन, सुक्ष्म व्यायाम, हात व पायांचे प्रकार, बसून, पोटावरील व पाठीवरील आसने यांचा सराव करून घेतला व माहिती दिली. शेवटी शवासन व शांती पाठ घेतला. सौ. उमा परब यांनी प्रमुख पाहुण्या सौ. प्रिया पर्वते यांचा शाल देऊन सत्कार केला. दि. ११.०३.२०२६ रोजी सौ. उमा परब यांनी ३ ॐकारांनी सुरुवात केली. सौ. सुचेता वैद्य यांनी संधीचलन व सूक्ष्म व्यायाम, तसेच पाठीवर, पोटावर आणि बसून वगवेगळी आसने केली. योग साधक सौ. चेतना आणि धवल घाटगे यांनी विविध योगासनांचे उत्कृष्ट प्रात्यक्षिक करून दाखवले. सौ. उमा परब यांनी शांत, एकाग्र आणि प्रसन्न अनुभव देणारे शवासन (चैतन्यासन) करून घेतले.

दि. १२.०३.२०२६ रोजी सौ. कविता मिश्रा यांनी ३ ॐकार प्रार्थनेने सुरुवात केली. सौ. कल्पना हासे यांनी उभ्याने शिथिलीकरण व विविध आसनांचा सराव करून घेतला. सौ. दीपिका गाला यांनी प्रात्यक्षिक करून दाखविले. सौ. कविता मिश्रा यांनी ओढणीच्या सहाय्याने पश्चिमोत्तानासन, जानुशिरासन, द्रोणासन, गोमुखासन, उत्तानपादासन, अर्धहलासन, उत्थित द्विपादासन, पोटावरील नौकासन आणि अर्धनौकासन आसनांचा सराव करून घेतला. या आसनांचे प्रात्यक्षिक सौ. शामला शेट्टी यांनी करुन दाखविले. ॐकार आणि शांतिपाठाने सांगता झाली. दि. १३.०३.२०२६ रोजी सौ. सुचेता वैद्य यांनी ३ ॐकार प्रार्थनेने सुरुवात केली. शिबिराचे प्रमुख पाहुणे 'योग विद्या निकेतन'चे श्री. सुधाकर मिस्त्री यांनी शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक प्रगती यावर प्राणायाम, आसने सर्व महिलांकडून सराव करून उपयुक्त माहिती दिली. शेवटी शवासन (चैतन्यासन) घेतले. सौ. कविता मिश्रा यांनी प्रमुख पाहुणे श्री. सुधाकर मिस्त्री यांना शाल देऊन सत्कार केला. सौ. स्मिता जाधव यांचा प्रमुख पाहुण्यांनी सत्कार केला. ॐकाराने शिबिराची सांगता झाली. दि. २३.०३.२०२४ रोजी सौ. कल्पना हासे यांनी ३ ॐकार व प्रार्थनेने सुरुवात केली. सौ.

सुचेता वैद्य यांनी संधीचलन, सुक्ष्म व्यायाम करुन घेतले. सौ. उमा परब व सुचेता वैद्य यांनी बसून, पोटावर, पाठीवर झोपून व उभ्याने आसने सराव करून घेतला. सौ. उमा परब यांनी श्री समर्थ व्यायाम मंदिरातील चालणारे ५ महिला योगवर्ग, व्यायाम शाळेत वर्षभर विविध प्रकारचे शिबीर घेतात याविषयी माहिती दिली. सौ. सुचेता वैद्य व सौ. कल्पना हासे यांनी शिबिरातील सहभागी महिला यांना प्रमाणपत्र वाटप केले. ॐकार शांतीपाठाने शिबिराचा समारोप छान उत्साहात पार पडला. या शिबिराला सर्व योगशिक्षिकांचे, तसेच श्री. प्रेमचंद्र तारी, कु. विजयश्री माजगावकर, सौ. संजना जोशी, श्री. महेंद्र राऊत, श्री. वाकळेमामा यांचे सहकार्य लाभले.

३.२. संस्थेच्या शिबिरांना व विविध उपक्रमांना सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणाऱ्या मान्यवरांचे अभिप्राय:

१. **दि. २.५.२०२५ श्रीमती डायना एडलजी, 'पद्म श्री' महिला क्रिकेट, भारत कर्णधार, अर्जुन पुरस्कार विजेती:** It was an honor to be present here for the inauguration. All the best for this camp.

२. **दि. ३.५.२०२५ श्री. अधिराज लोकेगावकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिवाजी शिक्षणोत्तेजक मंडळ, काळाचौकी:** I am honored to be here today at the Vasantik Shibir, a summer camp with long history. Your dedication to sports and fitness is truly inspiring, I wish all the best for the future endeavors of the Institute.

३. **दि. ३.५.२०२५ लेफ्टनंट कर्नल मनोज कुमार सिन्हा, सेना मेडल (निवृत्त)** श्री समर्थ व्यायाम मंदिर के प्रांगण मे आकार, यहाँ जो पावन कार्य हो रहा है, पदमश्री उदयजी के मार्गदर्शन मे, वो देखकर मैं अत्याधिक आनंदित हूँ | मेरी यहाँ के सभी सदस्य को हार्दिक बधाई, शुभकामनाएँ । मुझे आमंत्रित करने पर हार्दिक आभार|

४. **दि. ३.५.२०२५ डॉ. सौ. अस्मिता अद्वैत वैद्य, प्राचार्य, गव्हर्नमेंट लॉ कॉलेज:** श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर यांच्या सततच्या खेळातील प्रशिक्षणामुळे नवीन पिढीला खेळातील नैपुण्य आणि स्वतःचे आरोग्य लाभते आहे. ५१ व्या वर्षात येणाऱ्या ह्या व्यायाम मंदिराच्या सेवेचा सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा असे वाटते.

५. **दि. ४.५.२०२५ राजश्री बर्वे सामंत, लेखिका:** अनेक वर्ष कार्यरत असलेल्या समर्थ व्यायाम मंदिरामध्ये आज ध्वजारोहण करण्याकरता आमंत्रण मिळाले. त्याचा खूप आनंद आहे. श्री. देशपांडे सरांचे कार्य अचंबित करणारे आहे. सातत्याने इतके वर्ष हे शिवधनुष्य पेलणे कौतुकास्पद आहे. व्यायाम मंदिराला खूप खूप शुभेच्छा!

६. **दि. ४.५.२०२५ मुकेश ग. कणेरी, NIFF संचालक:** मला आज इथे प्रमुख पाहुणे आणि झेंडा वंदन करून अतिशय छान वाटले. तसेच अनेक वर्ष कार्यरत असलेल्या "समर्थ व्यायाम मंदिर" यांच्या नावातच "समर्थ" आहे. यांच्या कार्यासाठी व मंदिरासाठी अभिनंदन व शुभेच्छा.

७. **दि. ४.५.२०२५ हिमानी उत्तम परब, अर्जुन पुरस्कार विजेती, मल्लखांब खेळाडू:** ५१ वे समर्थ वासंतिक क्रीडा प्रशिक्षण शिबीर, पूर्ण १० दिवस जरी येत आले नाही तरी २ दिवसात गेल्या २५ वर्षांच्या शिबिरांच्या दिवसांची आठवण झाली. आता क्रीडा विभागात क्रीडा कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत आहे, आणि एवढे वर्ष जे व्यायाम शाळेकडून शिकले, छोट्या गोष्टींपासून जसे पत्र लिहणे, एक्सेलवर काम करणे किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांशी स्पष्ट संवाद साधणे या सगळ्यामध्ये संस्थेने शिकवलेल्या शिस्तीसाठी मी खूप ऋणी राहीन.

८. **दि. ५.५.२०२५ निलेश विठ्ठल परब, खोखो खेळाडू, कीर्तनकार:** संस्था शंभरीत पदार्पण करतांना आनंद होत आहे. ५१ वे शिबिर त्यानिमित्ताने आपल्याचं संस्थेने केलेला सत्कार, बरं वाटले ! अजूनही संस्थेतील शिस्त कायम आहे. कितीही अडचणी आल्या तरीही ठरलेले शिबिर आयोजन झाले. पालकांचा हातभार खूप महत्वाचा आहे. संस्थेतील प्रत्येक शिक्षक व खेळाडू यांचा सहभाग सुद्धा महत्वाचा आहे. संस्थेचे नाव असेच उज्ज्वल राहो हिच सदिच्छा! पुनश्च देशपांडे सर व नीता ताईंचे अभिनंदन व आभार.

९. **दि. ५.५.२०२५ सचिन ज्ञानदेव कोरे, कुलगुरु VJTI:** श्री समर्थ व्यायाम मंदिराला १०० वर्षात पदार्पण केल्या बद्दल खूप शुभेच्छा. देशपांडे सरांनी मल्लखांब ला जागतिक पातळीवर नेऊन राष्ट्रीय पुरस्कार, राष्ट्रपती व पंतप्रधान यांच्या हस्ते मिळवला याचा पूर्ण महाराष्ट्राला अभिमान आहे. या संस्थेत तयार होणाऱ्या विद्यार्थांना, सरांना व सर्व सहकारी मंडळींना खूप शुभेच्छा. जय हिंद, जय महाराष्ट्र.

१०. **दि. ६.५.२०२५ श्री. पराग सुरेश कुलकर्णी, स्ट्रेंथ अँड फिटनेस कोच:** मी गेले १६ वर्ष व्यायाम शाळेचा सदस्य आहे. धन्यवाद देशपांडे सर आणि सुनील सर, मला आमंत्रण दिल्याबद्दल. जय महाराष्ट्र.

११. **दि. ६.५.२०२५ श्री. क्षितीज के., JSW:** Really grateful to Shree Samartha Vyayam Mandir for this opportunity to learn something about Mallakhamb at Shivaji Park.

१२. **दि. ६.५.२०२५ श्री. विशाल विठ्ठल कामत, कामत ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज:** It was an absolute delight to be a part of an emotion of Dadar and the Pride of India. Sir's passion and vision to take our heritage forward and the decade of dedication is only reinforced by the picture on the wall of India's first citizen giving the ultimate recognition to India's most fit citizen.

१३. **दि. ६.५.२०२५ डॉ. सौ. कल्पना देसाई, मा. विश्वस्त, मुंबई पोलीस प्राधिकरण:** I feel so proud to be the witness of the event. Shree Samartha Vyayam Mandir is really creator of the great sportsmen/women.

I feel so happy to see more girl children compared to boys! I am honored to be with the great 'Padma Shri' award achiever. Honorable Uday Deshpande ji, you are fulfilling the dream of honorable PM of 'Fit India Movement' part of 'खेलोगे तो खिलोगे'. जय हिंद, जय महाराष्ट्र

१४. **दि. ७.५.२०२५ अर्जुन कावळे, पश्चिम रेल्वे, वॉटर पोलो आंतरराष्ट्रीय खेळाडू:** Grateful to be a part of Shree Samartha Vyayam Mandir and coming back to be Chief Guest. Old memories and all the happy times. Would love to come back.

१५. **दि. ८.५.२०२५ डॉ. माधव नारायण साठे, अँनेस्थसिस्ट:** श्री समर्थ व्यायाम मंदिर, शिवाजी पार्क या संस्थेविषयी खूप ऐकले होते. देशपांडे सरांचे नाव या विभागातील प्रत्येक मुलांच्या तोंडी असते ते येथे त्यांनी हसत-खेळत शिकलेल्या मल्लखांब, रोप मल्लखांब अशा अस्तंगत होत चाललेल्या खेळातील शास्त्रोक्त प्रशिक्षणासाठी. आज त्यांनी मला त्यांच्या वासंतिक शिबिरात ध्वजारोहणाचा मान दिला, खूप आनंदाचा क्षण येथील शिस्तबद्ध बरोबर मिळाला. धन्यवाद. आपल्या कामास शुभेच्छा!

१६. **डॉ. रुपीन शहा, समर्थ विश्वस्त, युरॉलॉजिस्ट:** Shree Samartha Vyayam Mandir is deeply integrated in the community. The summer camp is a long-standing initiative that introduces hundreds of children to physical fitness. It is an honour and great pleasure to be associated with SSVM and all its activities.

१७. **दि. ८.५.२०२५ श्री. देवेंद्र भुजबळ, न्यूज स्टोरी टुडे:** श्री समर्थ व्यायाम मंदिराच्या शिबिराचे ध्वजारोहण करण्याचा मला आज मान मिळाल्याने मला फार आनंद झाला. ही संस्था युवकांचे आणि त्यांच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीचे कार्य गेली १०० वर्षे करीत आहे, ही खूप अभिमानाची बाब आहे. संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

१८. **दि. ९.५.२०२५ श्री. दीपक कानुलकर, रोटरी क्लब ऑफ मुंबई:** पद्मश्री उदय देशपांडे यांनी सुरु केलेली ही एक अलौकिक संस्कृतीच म्हणावी लागेल. अशी ही कार्यशाळा गेली ५१ वर्षे लहान मुलांना घडवीत आहे. हे देश निर्माणाचे कार्य असून ते असेच वर्षानुवर्षे सुरु राहू दे अशी प्रार्थना.

१९. **दि. ९.५.२०२५ कीर्ती सुर्वे-पराडे** उदय देशपांडे सर आपले खूप धन्यवाद. आज आपल्या समर्थ व्यायामशाळेत येऊन फोटो काढण्यास खूप छान वाटले. मी लहान असतांना साधारण १९९० साली मी सुद्धा या शिबिरात यायचे. त्यानंतर आजचे शिबिराचे फोटो काढण्यासाठी आले. खूपच आनंददायी अनुभव. हे सर्व बघून पुन्हा लहानपण अनुभवता आले.

२०.**दि. ९.५.२०२५ डॉ. नेहा जगतियानी, प्राचार्या, आर.डी.** नॅशनल कॉलेज: It was truly a remarkable experience to be a guest at this unique sport camp! From promoting Traditional Indian Sports Mallakhamb, to the disciplining of the young students, to the warmth their hospitality and keep student physically active, it's wonderful work! Truly commendable!

२१.**दि. १०.५.२०२५ श्री. समाधान निकम, संचालक हंटर सेक्युरिटी फोर्स, माजी सैनिक:** श्री समर्थ व्यायाम मंदिर, मुंबई, या संस्थेमध्ये भेट देण्याचा योग मला आज प्राप्त झाला, तो आदरणीय श्री. उदय देशपांडे सरांमुळे याचा मला सार्थ अभिमान आहे. त्यांचे समाजासाठी जेकार्य चालू आहे त्याची तोड नाही. त्यांचे, ह्या संस्थेचे कार्य 'नव भारत' घडवित आहे. मी त्यांना व त्यांच्या सर्व कर्मचारी वर्गाला मनापासून धन्यवाद देतो.

२२.**दि. १०.५.२०२५ श्री. समीर वानखेडे, भारतीय महसूल सेवा, अतिरिक्त आयुक्त, वित्त मंत्रालय, भारत सरकार:** It is a pleasure and honor to visits camps organized by shri Udayji, who is an assent to the nation. I am proud of his work to provide and impart training to the future assets of our nation in Traditional Sports Mallakhamb. All my best wishes him in all his endeavors towards National Development and Fit India.

२३.**दि. ६.५.२०२५ श्री. अच्युत पालव, पद्मश्री सुलेखनकर:** एक सुंदर अनुभव! श्री समर्थ व्यायाम मंदिराचे खूप खूप आभार! आसनं आणि मल्लखांब पाहून परत एकदा जीवनाला सुरुवात करावीशी वाटली.

२४.**दि. २३.६.२०२५, श्री. अमिताभ सिंग, प्रमुख पोस्ट मास्टर जनरल, महाराष्ट्र व गोवा:** I witnessed a truly fantastic demonstration of Mallakhamb today. The efforts of Shree Deshpande are truly wonderful. A huge contribution to making our young citizens strong, both in Body and Mind! Bravo!

२५.**दि. ३०.६.२०२५ श्री. समाधान निकम, संचालक, समाधान निकम ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज:** श्री समर्थ व्यायाम मंदिराचा खुपच सुंदर उपक्रम! भारतीय खेळ व व्यायाम प्रकारचे अतिराय सुंदर प्रशिक्षण व प्रसार करत आहेत, त्या बद्दल या संस्थेचे व श्रीमान उदय देशपांडे सरांचे खूप -खूप आभार! त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!!

२६.**दि. ३०.६.२०२५ श्री. किरण शेट्ये, अध्यक्ष, रोटरी क्लब, मुंबई सायन**: Thank you Uday sir and the hard-working team of Shree Samartha Vyayam Mandir. Kindly keep up the amazing work, many generations have and will benefit from your selfless dedication and amazing work.

२७.**दि. १७.७.२०२५ श्री. महेश पांडुरंग वैद्य, मालक, पांडुरंग हरी वैद्य ज्वेलर्स:** आजचा दिवस मला आयुष्यातील आठवणी दाटून येणारा आहे. मला माझ्या लहानपणाची आठवण झाली. श्री. समर्थ व्यायाम मंदिर हे मुंबईतील प्रत्येकाला लहान मोठ्यांसाठी घडविण्याचे मंदिर आहे. येथे मुलांनी व्यायाम अथवा मैदानी खेळ खेळले तर ते दीर्घायुषी होतील.

२८.**दि. १८.८.२०२५ श्री. के. रवी**: 'JAYOSTUTE'. Absolute pleasure observing your waves of students strengthening Bharat Mata. Our future is Bright.

२९.**दि. १८.८.२०२५ श्री. नीलकंठ मयेकर**: Today will be one of the most memorable day in coming times. 'Sports for All', 'Nation first and always'. Healthy Nation. Wishing the Best for all to achieve Goals of India.

३०.**दि. १९.८.२०२५ श्री. महेश बळीराम सावंत, आमदार, दादर-माहीम-प्रभादेवी विभाग:** श्री समर्थ व्यायाम मंदिर म्हणजे शिवाजी पार्क आणि मुंबईची शान. आता श्री समर्थ व्यायाम मंदिर या संस्थेला १०० वर्षे पूर्ण आहेत, या निमित्त १०० तास धावण्याचा विक्रम सर्व सभासद करणार आहेत. या कार्यक्रमाला खूप खूप शुभेच्छा!!

३१.**दि. २५.८.२०२५ श्री. रमेश आनंद:** Proud to be in the midst of such wonderful talent. You are doing a wonderful job building the future.

३२.**दि. २५.८.२०२५ सौ. मधुरा वायकर:** Shree Samartha Vyayam Mandir is doing an amazing job teaching and nurturing children from such an young age. Wonderful being a part of it.

३३.**दि. १५.१२.२०२५ श्री. सुदर्शन सांगळे, विश्वस्त, श्री सिद्धिविनायक मंदिर ट्रस्ट**: श्री समर्थ व्यायाम मंदिराच्या वतीने आज ॲथलेटिक्सचा कार्यक्रम बघून खूपच आनंद झाला. ५ ते ६५ वर्षापर्यंत कोणासाठी हा कार्यक्रम राबविण्यात आला. मुलांनी मल्लखांब व ॲथलेटिक्स प्रात्याक्षिके करून सर्वांची माने जिंकली. मला अभिमान वाटतो या संस्थेच व पद्मश्री उदय देशपांडे व येथील प्रशिक्षक विजय मुळीक यांचे खूप आभार. त्यांनी मला कार्यक्रमाला बोलावून माझा मान वाढवला.

३४.**दि. १५.१२.२०२५ श्री. हर्षल गुरव, विश्वस्त, राजराजेश्वरी प्रतिष्ठान न्यास**: श्री समर्थ व्यायाम मंदिर गेली १०० वर्षे हा वसा जोपासण्याचे काम करीत आहे, खरच हे खूप कौतुकास्पद आहे. आजची पिढी ही इलेक्ट्रोनिक युगात अडकलेली असतांना त्यांना मैदानाकडे आणणं हे खूपच अडचणीचे काम ही संस्था सातत्यपूर्ण करते. खरच आपल्या कार्याला लाख लाख सलाम व शुभेच्छा!

३५.**दि. २४.१२.२०२५ श्री. विशाल कराळकर, संस्थेचे माजी विद्यार्थी व सध्या सिडनी येथे क्रीडा कार्यक्रम व्यवस्थापनात कार्यरत:** Thanks to the management for having me to have this honour. It felt like I never left since 2008. Proud to see the team organising this at such a large scale. All the best to the team for future.

३६.**दि. २४.१२.२०२५ श्री. रोहित सूर्यवंशी, आघाडीचे मॉडेल आणि अभिनेता:** आज श्री समर्थ व्यायाम मंदिर, शिवाजी पार्क दादर में २७ ॲथलेटिक्स शिबीर का बहुत ही भव्य व सुंदर आयोजन किया गया। जिसमे लागभाग २०० बच्चोने भाग लिया. बच्चो का उत्साह और प्रतिभा अतुलनीय व अत्यंत प्रशासनीय थी। आज मुझे यहा विशेष अतिथी के रूपमे आमंत्रित व सन्मानित किया गया। जिसके लिये मैं संपूर्ण संस्था व गुरुओं का हृदयसे धन्यवाद करता हूँ। जय श्री राम।

३७.**दि. २६.२.२०२६ वॉल्ट सायमन फरमोय, नरसीयम, इंदुमती इन्फ्रा**: आजच्या श्री समर्थ व्यायाम मंदिराच्या प्रशिक्षण शिबिराच्या सांगता सोहळ्याच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याचा सन्मान मिळावा. एकंदरीत उपक्रम खूपच स्तुतियोग्य आहे. आपण ह्या बाळगोपाळांना खेळाची आवड निर्माण करण्याची जी भूमिका घेत आहात, त्याबद्दल आपले अभिनंदन आणि या पुढील आपल्या वाटचालीस शुभेच्छा!!

३८.श्री. मनोज कटारिया, 'टँडम सायकलिस्ट क्लब': 'टँडम सायकलिस्ट क्लब'च्या वतीने गेली दहा वर्षे दृष्टिबाधित सायकलपटू घडविण्याचे आणि त्यांना मोफत प्रशिक्षणाच्या माध्यमातून क्रीडा क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य सातत्याने दर रविवारी सुरू आहे. दृष्टिबाधित आणि दृष्टिक्षम व्यक्तींना 'टँडम सायकलिंग'च्या माध्यमातून एकत्र आणून समानता, आत्मविश्वास, स्वावलंबन आणि समावेशकतेचा संदेश देणे हे आमच्या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

२०२४ च्या सुरुवातीला आमचा हा उपक्रम अनेक अडचणींचा सामना करत होता. दृष्टिबाधित सायकलपटू घडविण्याचे कार्य सुरू ठेवणे, सायकली सुरक्षितपणे ठेवण्यासाठी जागा मिळविणे आणि मोफत प्रशिक्षणाची व्यवस्था सुरळीत चालू ठेवणे ही आमच्यासमोरील मोठी आव्हाने होती. अशा कठीण काळात श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर आणि पद्मश्री उदय देशपांडे सर, मा. सुनील सवने सर, श्री समर्थ व्यायाम मंदिराचे सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य आणि संपूर्ण टीम यांच्या मोलाच्या सहकार्यामुळे आमच्या उपक्रमाला नवसंजीवनी मिळाली.

श्री समर्थ व्यायाम मंदिराने आम्हाला सायकली ठेवण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली आणि आमचा उपक्रम नियमितपणे सुरू राहण्यासाठी भक्कम आधार दिला. शिवाजी पार्क परिसरातील या सुविधेमुळे दृष्टिबाधित खेळाडूंना पहाटे प्रशिक्षणासाठी येणे सोयीचे झाले. त्याचबरोबर दृष्टिक्षम सायकलपटू, स्वयंसेवक आणि क्रीडाप्रेमींना एकत्र आणून समावेशक सायकलिंग संस्कृती विकसित करण्यास मोठी मदत झाली. संस्थेच्या या सहकार्यामुळे

आमच्या 'क्लब'ला केवळ जागाच मिळाली नाही, तर आमच्या कार्याला स्थैर्य, विश्वास आणि पुढे जाण्याचे बळ मिळाले. सायकलींच्या सुरक्षिततेची आणि प्रशिक्षणासाठी जागेची चिंता मोठ्या प्रमाणात दूर झाली. त्यामुळे आम्हाला आमचे संपूर्ण लक्ष दृष्टिबाधित खेळाडू घडविण्यावर, त्यांना प्रशिक्षण देण्यावर आणि त्यांच्यासाठी नवीन क्रीडा संधी निर्माण करण्यावर केंद्रित करता आले.

टँडम सायकलिस्ट क्लबच्या अनेक वर्षांच्या प्रयत्नांना १५ ऑगस्ट २०२६ रोजी ऐतिहासिक यश मिळाले. 'राष्ट्रीय पॅरा ट्रायथलॉन स्पर्धे'त प्रथमच दृष्टिबाधित खेळाडूंचा समावेश झाला. 'ट्रायथलॉन' या खेळामध्ये जलतरण, सायकलिंग आणि धावणे या तीन क्रीडाप्रकारांचा समावेश असतो. या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्रातील सात दृष्टिबाधित खेळाडूंना सहभागी होण्याची संधी मिळाली. याशिवाय, देशातील इतर राज्यांतील खेळाडूंनाही स्पर्धेत सहभागी होता यावे यासाठी आमच्या क्लबच्या माध्यमातून 'टँडम' सायकली उपलब्ध करून देण्यात आल्या.

दृष्टिबाधित सायकलपटू घडविण्यापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंतचा ध्यास! आमचे स्वप्न केवळ सायकलपटू घडविण्यापुरते मर्यादित नाही. समाजाच्या तळागाळातील दृष्टिबाधित व्यक्तींना क्रीडा क्षेत्रात संधी मिळवून देणे, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देणे आणि त्यांना राज्यस्तरीय, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचविणे हे आमचे ध्येय आहे.

श्री समर्थ व्यायाम मंदिराच्या सहकार्यामुळे आमच्या उपक्रमाला सातत्य मिळाले, अनेक खेळाडूंसाठी संधी निर्माण झाली आणि दृष्टिबाधित व्यक्तींच्या क्रीडा क्षेत्रातील सहभागाला नवी दिशा मिळाली. आपले सहकार्य असेच कायम लाभत राहो आणि आपल्या सर्वांच्या प्रयत्नांतून अनेक दृष्टिबाधित खेळाडूंना त्यांच्या स्वप्नांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळो, हीच सदिच्छा!

३.३ संस्थेत नियमित चालणारी क्रीडा पथके

३.३ (१) सर्वसाधारण खेळ पथक

श्री समर्थ व्यायाम मंदिर संस्थेत नव्याने प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या ५ वर्षावरील कोणीही संस्थेत दर दोन महिन्याच्या अंतराने होणाऱ्या १० दिवसीय शिबिरांमधून उत्तीर्ण होऊन सर्वसाधारण खेळ पथकात प्रवेश घेतात. सुमारे ५ ते १२ वर्षे वयाची मुले या पथकात असून मुलींची सावित्री, अहिल्या व लक्ष्मी अशी तीन पथके आहेत, तसेच मुलांची रायाजी, धृव व चिलिया अशी तीन पथके आहेत. ही सहा पथके सायंकाळी ७ ते ८ या वेळात भरतात. या व्यतिरिक्त सकाळी प्रभात पथक ७ ते ८ या वेळात भरते. यामध्ये मनोरंजनाचे खेळ, मुक्तहस्त व्यायाम, कवायत, योगासने, सूर्यनमस्कार, लेझिम आणि डम्बेल्स इत्यादिंचे मुलांच्या वयानुसार प्रशिक्षण दिले जाते. मुलांची दैनंदिन उपस्थिती, आवड व कुवत लक्षात घेऊन किमान ३ महिने प्राथमिक प्रशिक्षण दिल्यानंतर विशिष्ट खेळांच्या पथकांमध्ये पाठविले जाते. मुलांची उंची व वजन यांची नोंद घेतली जाते. जास्त अनुपस्थित असणाऱ्या मुलांना शिबिरातून पुनर्प्रवेश घ्यावा लागतो.

३.३ (२) ॲथलेटिक्स

संस्थेच्या ॲथलेटिक्स् विभागात विभागप्रमुख श्री. सुनील सवने ह्यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज सुमारे ५५ विद्यार्थी सराव करतात.

२२-२३ ऑगस्ट २०२५ रोजी प्रियदर्शिनी पार्क येथे झालेल्या BCDAAA आयोजित जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत विजेते खेळाडू - सारा राणे- लांब उडी- सुवर्ण, उंच उडी- रौप्य, आर्यन सवने- लांब उडी- तृतीय क्रमांक, अद्वैत ठाकूर- १५०० मी. तृतीय क्रमांक, प्रेशित अंगारखे- गोळाफेक- तृतीय क्रमांक, ३/४ सप्टेंबर २०२५ रोजी बालेवाडी, पुणे येथे झालेल्या राज्य स्पर्धेत सारा राणे हिने लांब उडीमध्ये कांस्य पदक पटकावले.

१३-१४ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा शालेय स्पर्धेत वैदही जाधव हिने ३००० मी. धावणे सुवर्ण पदक व कु. सारा राणे हिने लांब उडी स्पर्धेत रौप्य पदक व तिहेरी उडी स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. आरोही जाधव- १५०० मी. सुवर्णपदक, इशान वर्पे- गोळाफेक- तृतीय क्रमांक, अथर्व गित्ये- १५००मी.- तृतीय क्रमांक., गौरेश दळवी- लांब उडी- तृतीय क्रमांक.

२८-२९ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या विभागीय शालेय स्पर्धेत सारा राणे हिने लांब उडी व तिहेरी उडी स्पर्धेत कांस्य पदक मिळवले. अद्वैत ठाकूर- सहभाग. महाविद्यालयीन जिल्हा आणि राज्यस्तरीय स्पर्धेत ख्याती धुरू हिने उंच उडी स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावले. ४६ वी महाराष्ट्र मास्टर ॲथलेटिक्स् चॅम्पियनशिप ही दिनांक २२ -२३ नोव्हेंबर या कालावधीत संपन्न झाली. पदक विजेते खेळाडू - ३० + महिला - शीतल आवटे लांब उडी, ८० मी. अडथळा दौड, ८०० मी. दौड तसेच ४ × १०० मी. रीले सुवर्ण. ३५ + महिला - अपर्णा मेहेर, ५००० मी., १५०० दौड आणि ४×१०० मी. रीले सुवर्ण पदक ८०० मी. दौड रौप्य. ३५ + महिला. - द्वारका जाधव, ८० मी. अडथळा दौड आणि ४×१०० मी. रीले सुवर्ण, ५००० मी. दौड रौप्य आणि भालाफेक कांस्य. ३५ + महिला - निता नावडकर, ४×१०० मी. रीले सुवर्ण, १५००/५००० मी. दौड रौप्य ८०० मी. कांस्य. ४० + महिला - कविता बिजवान, हातोडा फेक रौप्य तसेच ४०० मी. दौड कांस्य. ४० + महिला - जॉली जॉय, भालाफेक रौप्य तसेच हातोडा फेक कांस्य. ४५ + महिला - भाग्यश्री मराठे, ५००० मी. चालणे कांस्य. ४५ + महिला - मानसी साटम, ८० मी. अडथळा दौड सुवर्ण. ४५ + महिला - पूजा मालकर, ८० मी. अडथळा दौड रौप्य, ४ × १०० मी. रीले रौप्य तसेच हातोडा फेक कांस्य. ४५ + महिला- शुभांगी मांजरेकर, गोळाफेक, थाळीफेक कांस्य. ३० + पुरुष - सुशील सारंगधर, हातोडा फेक सुवर्ण, गोळाफेक रौप्य, भालाफेक कांस्य. ३५ + पुरुष - विजय मुळीक, ५००० मीटर चालणे सुवर्ण. ४५ + पुरुष - संजय दळवी, उंच उडी रौप्य पदक, ३००० मी स्टीपलचेस सुवर्ण.

इंडिया मास्टर्स ॲथलेटिक्स् आणि मध्यप्रदेश मास्टर्स ॲथलेटिक्स् आयोजित ४५ व्या मास्टर ॲथलेटिक्स् चॅम्पियनशिप, जबलपूर, गोकाळपूर १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ येथे आयोजित करण्यात आली होती. यात आपल्या मास्टर्स खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये आपल्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले.

संजय दळवी, उंच उडी सुवर्ण, ११० मीटर्स हर्डल्स् रौप्य, ५००० मीटर चालणे कांस्य, ४×१०० मी. मिक्स रिले रौप्य ४×१०० मी रिले कांस्य. लकिश जाधव, उंच उडी सुवर्ण पदक आणि ४०० मी. हर्डल्स रौप्य. संतोष जाधव, ४×१०० मी. रिले कांस्य. प्रवीण पाटील, १५०० मी. आणि ४×१०० मी. रिले रौप्य, ५००० मी. दौड कांस्य. सुशील शारंगधर, हातोडा फेक रौप्य. सुखदेव गवळी, हातोडा फेक कांस्य. शुभांगी मांजरेकर, गोळाफेक थाळीफेक, हातोडा फेक आणि ४×१०० मी. रिले रौप्य. प्रियांका शेट्टी ४×१०० मी. रिले सुवर्ण, तिहेरी उडी रौप्य पदक लांब उडी कांस्य. द्वारका जाधव. ४×४०० मी. रिले सुवर्ण, थाळीफेक, भालाफेक, ५ की. मी. दौड रौप्य. अपर्ण मेहेर ४०० मी. दौड सुवर्ण, १५०० मी. आणि ८०० मी. दौड रौप्य. सनाया जॉर्ज १०० मी., २०० मी. दौड आणि ४×१०० मी. मिक्स रिले सुवर्ण. लांब उडी आणि ४×१०० मी. रिले रौप्य. स्मिता बुगडे ८०० मी. सुवर्ण, ०५ की. मी., १५०० मी. आणि ४×१०० मी. रिले रौप्य.

३.३ (३) खो - खो

खो खो विभागप्रमुख श्री. मनोज वैद्य यांचे बरोबर रुपेश शेलटकर, भूपेश ठाकूर, प्रणय मयेकर, निशांत ठोंबरे, विराज कोठमकर, मिहीर वास्ते, यश बोरकर यांनी प्रशिक्षक म्हणून काम पहिले. श्री. धर्मेंद्र पटेल व श्री. कुणाल नाडकर्णी यांनी खो खो पथकाचे व्यवस्थापक म्हणून काम पहिले. या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली अंदाजे ५६ मुली व ५० मुलगे असे एकूण १०६ विद्यार्थी सरावाकरीता मैदानावर उपस्थित असतात.

मुंबई खो खो संघटनेच्या मान्यतेने मुंबई जिल्हा कुमार – मुली गट अजिंक्यपद खो खो स्पर्धा इन्स्पायर ग्रुप यांच्यामार्फत वैभव स्पोर्ट्स क्लब, दादर यांच्या मैदानात दि. २६ ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत पार पडली. या स्पर्धेत आपल्या संस्थेचे कुमार संघ व मुली संघ सहभागी झाला होता.

कुमार संघात अद्वैत हडकर, निकुंज चाती, श्रेयस नाचरे, साईश गुळेकर, कुशल वाघधरे, सार्थ वायंगणकर, अनिश शिरोडकर, साईश शिंदे, श्री सुर्वे, ओम सुर्वे, विहंग पाटील, आराध्य खाके, मल्हार नाईक, दक्ष पाटील यांचा सहभाग होता. कुमार संघाने या स्पर्धेत पाचवे स्थान प्राप्त केले. मुलींच्या संघात तन्वी मोरे, इशिका सरवैय्या, आर्या शिंदे, सानिका शिर्के, सोनम शेलार, आस्था महाडिक, खुशी यादव, ग्रंथा वारघडे, मनवा सावंत, हासिनी मर्गम, आराध्या माळी, आराध्या गोताड, आलिया मोकाशी, शिरीन बुगडे, श्रेया माळवे, लौक्या जाधव, अन्वी मयेकर, अनवा म्हात्रे, युक्ता पटेल यांचा सहभाग होता. मुलींच्या संघाने या स्पर्धेत पाचवे स्थान प्राप्त केले.

मुंबई खो खो संघटनेच्या मान्यतेने मुंबई जिल्हा पुरुष व महिला गट अजिंक्यपद खो खो स्पर्धा ओम साईश्वर सेवा मंडळ यांच्या मैदानात गायकवाड फाऊन्डेशन यांचे मार्फत दि. २६ ते ३० ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. पुरुष संघात संस्थेतील वेदांत देसाई, पियुष घोलम, वरूण पाटील, यश बोरकर, अनंत चव्हाण, हितेश आग्रे, वरद फाटक, जतीन गावकर, जयेश नेवरेकर, प्रतिक होडावडेकर, सुरज खाके,

विशाल खाके, निशांत ठोंबरे, तन्मय भुवड, अथर्व खोचाडे यांनी भाग घेतला. पुरुष संघाने या स्पर्धेत प्रथम स्थान पटकावले. पियुष घोलम याने सर्वोकृष्ट अष्टपैलू खेळाडू तर वेदांत देसाई याने सर्वोकृष्ट आक्रमक खेळाडूचा पुरस्कार मिळविला. महिला संघात श्रेया नाईक, जिग्नेशा सरवैय्या, तन्वी मोरे, इशिका सरवैय्या, आर्या शिंदे, सानिका शिर्के, सोनम शेलार, आस्था महाडिक, ख़ुशी यादव, ग्रंथा वारघडे, मनवा सावंत, हासिनी मार्गम, आराध्या माळी, आराध्या गोताड, आलिया मोकाशी, शिरीन बुगडे, श्रेया माळवे, अनवा म्हात्रे, युक्ता पटेल यांचा समावेश होता. महिला संघाला सहावे स्थान प्राप्त झाले.

दि. २२ नोव्हेंबर २०२५ या दिवशी एक डाव एक गुण पुरुष / महिला खो खो शिवसेना खासदार चषक ही स्पर्धा श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर यांच्या मदतीने छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथील मैदानात आयोजित करण्यात आलेली होती. या स्पर्धेत श्री समर्थ व्यायाम मंदिर संघास प्रथम स्थान प्राप्त झाले.

दि. २ ते ४ डिसेंबर २०२५ या कालावधीत युनायटेड स्पोर्ट्स क्लब, ठाणे यांचे मार्फत त्रिजिल्हा पुरुष खो खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. या स्पर्धेत श्री समर्थ व्यायाम मंदिर संघाने तृतीय स्थान पटकावले.

५१ वी कुमार व मुली गट राज्य अजिंक्यपद खो खो स्पर्धा दि. ४ ते ७ डिसेंबर २०२५ या कालावधीत श्री बाणेश्वर हायस्कूल, अहिल्यानगर येथे अहिल्यानगर जिल्हा खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने घेण्यात आली. मुंबईच्या कुमार संघात आपल्या संस्थेच्या श्री सुर्वे व मुलींच्या संघात तन्वी मोरे यांची निवड झाली होती. या स्पर्धेत मुंबईच्या कुमार संघाने सातवे स्थान तर मुली संघाने नववे स्थान प्राप्त केले.

६१ वी पुरुष व महिला गट राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धा दि. १८ ते २१ डिसेंबर २०२५ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल, बीड, येथे बीड जिल्हा खो-खो असोसिएशनने आयोजित केली होती. मुंबईच्या संघात पियुष घोलम, वेदांत देसाई, हितेश आग्रे, यश बोरकर व अनंत चव्हाण तर महिला संघात श्रेया नाईक, जिग्नेशा सरवैय्या यांची निवड झाली होती. मुंबई महिलांचे प्रशिक्षक म्हणून श्री. विराज कोठमकर यांची नियुक्ती झाली होती. मुंबईच्या पुरुष संघाने सातवे स्थान तर महिला संघाने दहावे स्थान प्राप्त केले.

आपल्या संस्थेने शताब्दीपूर्ती वर्षानिमित्त ३९ वी किशोर व किशोरी गट राज्य अजिंक्यपद खो खो स्पर्धा दि. २५ ते २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत महाराष्ट्र खो खो असोसिएशन यांच्या मान्यतेने व मुंबई खो खो संघटना यांच्या विद्यमाने मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ, वडाळा, मुंबई येथे आयोजित केली होती. मुंबई संघात किशोर गटात अद्वैत हडकर, कुशल वाघधरे तर किशोरीच्या संघात आस्था महाडीक, खुशी यादव, ग्रंथा वारघडे, मनवा सावंत यांची निवड झाली होती. मुंबईच्या किशोर संघाचे व्यवस्थापक म्हणून श्री. प्रणय मयेकर यांची नियुक्ती झाली होती. या स्पर्धेत मुंबईचे किशोर संघाने सातवे स्थान तर किशोरींच्या संघाने दहावे स्थान प्राप्त केले.

विद्यार्थी क्रीडा केंद्राने ४ फुट व ११ इंच (१८ वर्षाखालील) कुमार गट विभागीय निमंत्रित खो खो स्पर्धा दि. २२ ते २६ जानेवारी, २०२६ या कालावधीत लाल मैदान, आई-माई मेरवानजी लेन, परळ, मुंबई येथे आयोजीत केली होती. या स्पर्धेत अद्वैत हडकर, निकुंज चाती, श्रेयस नाचरे, स्वरूप सुत्रावे, साईश गुळेकर, कुशल वाघधरे, सार्थ वायंगणकर, अनिश शिरोडकर, अर्णव कार्ले, अथांग सरकाळे, श्लोक पाटील, वेद पाटील, मंथन नागवेकर, गगनेश मच्छा यांचा सहभाग होता.

५८ वी पुरुष व महिला गट राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धा दि. ११ ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीत रेल्वे मैदान, काझीपेठ, तेलंगणा येथे तेलंगणा खो खो असोसिएशनतर्फे घेतली गेली. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरुष संघाचे आपल्या संस्थेच्या श्री. वेदांत देसाई याने प्रतिनिधित्व केले.

५८ वी किशोर व किशोरी गट राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धा दि. ३१ जानेवारी ते दि. ४ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत हरियाणा येथे हरियाणा खो खो असोसिएशनतर्फे घेतली गेली. या स्पर्धेत आपल्या संस्थेची आस्था महाडिक हिने महाराष्ट्राच्या किशोरी संघाचे प्रतिनिधित्व केले. या स्पर्धेत महाराष्ट्र किशोरी संघाने प्रथम स्थान प्राप्त केले.

३.३ (४) ज्युदो

श्री समर्थ व्यायाम मंदिराच्या ज्युदो विभागात सध्या सुमारे १०० ज्युदोपटूंना नियमित व प्रगत प्रशिक्षण दिले जात आहे. सेन्सेई रवींद्र वा. पाटील (८ वी डिग्री ब्लॅक बेल्ट), राष्ट्रीय ज्युदो महासंघाचे पहिले भारतीय प्रशिक्षक, यांच्या अनुभवी मार्गदर्शनाखाली तसेच सहाय्यक प्रशिक्षक उदय शेट्टी यांच्या सहकार्याने प्रशिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी केली जाते. नियमित प्रशिक्षण दररोज सायंकाळी ७.०० ते ८.०० या वेळेत, तर प्रगत खेळाडूंसाठी विशेष प्रशिक्षण सायंकाळी ८.०० ते ९.३० या वेळेत आयोजित केले जाते. खेळाडूंच्या शारीरिक क्षमता, तांत्रिक प्रगती आणि एकूण कार्यक्षमतेचे मूल्यमापन करण्यासाठी नियमित शारीरिक चाचण्या घेतल्या जातात. राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू असलेले संपदा फाळके आणि आयुष फाळके हे सहाय्यक प्रशिक्षक म्हणून कनिष्ठ खेळाडूंना प्रशिक्षण व बेल्ट परीक्षेच्या तयारीसाठी सातत्याने मार्गदर्शन करतात.

यावर्षी विभागासाठी अभिमानास्पद अशी अनेक उल्लेखनीय यशे प्राप्त झाली.

दि. २१ ते २५ जानेवारी २०२६ या कालावधीत कोलकाता येथे आयोजित JFI–NDIO रेफरी (पंच) परीक्षेत गणेश स्वार, ओंकार घरत आणि संपदा फाळके हे यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले. दि. ११ ते १७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत गोवा येथे झालेल्या प्रथम डिग्री ब्लॅक बेल्ट परीक्षेत विशाल हळदेवेनकर, भूमी कोरडे आणि हेत छेडा हे यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले. ही सर्व यशस्वी कामगिरी विभागाच्या गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणाची, शिस्तबद्ध कार्यपद्धतीची आणि उत्कृष्टतेच्या सातत्यपूर्ण ध्यासाची साक्ष देते.

राष्ट्रीय स्तर

दि. १५ ते १७ जानेवारी २०२५ या कालावधीत चंदीगड येथे अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत सायली विजेश हिने मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले.

दि. २३ ते २५ जानेवारी २०२५ या कालावधीत कोलकाता येथे कनिष्ठ राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेत आर्या पाटील हिने महाराष्ट्र 'अ' चे प्रतिनिधित्व केले.

दि. २४ ते २६ जानेवारी २०२५ या कालावधीत इंफाल, मणिपूर येथे पार पडलेल्या डिएसओ राष्ट्रीय स्कूल गेम्स ज्युदो स्पर्धेत आर्या अहिरे हिने महाराष्ट्र चे प्रतिनिधित्व केले.

दि. १६ ते २० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत हैदराबाद येथे उप- कनिष्ठ राज्य ज्युदो स्पर्धेत प्रीती यादव आणि स्मयन आवटे यांनी महाराष्ट्र 'अ' चे प्रतिनिधित्व केले.

राज्य स्तर

दि. २२ ते २४ ऑगस्ट २०२५ या कालावधीत लातूर येथे आयोजित केलेल्या उप कनिष्ठ राज्य ज्युदो स्पर्धेत प्रीती यादव हिने मुंबई 'अ' चे प्रतिनिधित्व करत कांस्य पदक जिंकले.

दि. ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत जळगाव येथे आयोजित कनिष्ठ राज्य ज्युदो स्पर्धेत आर्या पाटील हिने मुंबई 'अ' चे प्रतिनिधित्व करत रौप्य पदक जिंकले व आर्य अहिरे हिने कांस्य पदक जिंकले.

दि. ७ ते ९ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत बालेवाडी स्टेडियम, पुणे येथे शालेय राज्य ज्युदो स्पर्धेत आर्या अहिरे हिने सुवर्ण पदक जिंकले व तिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आणि याशिका असवले हिने कांस्य पदक जिंकले.

विभागीय स्तर

दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी एस. एम. शेट्टी महाविद्यालय, पवई येथे मुंबई महाविद्यालयीन ज्युदो स्पर्धेत सायली विजेश हिने सुवर्ण पदक जिंकले आणि प्रियंका पाटील व आर्या पाटील हिने कांस्य पदक जिंकले.

दि. ०५ नोव्हेंबर २०२५ रोजी पनवेल येथे शालेय विभाग स्तरिय ज्युदो स्पर्धेमध्ये याशिका असवले आणि आर्या अहिरे यांनी सुवर्ण पदक जिंकले आणि शालेय राज्य ज्युदो स्पर्धेसाठी निवड झाली.

शहर स्तर

दि. १२ ते १३ सप्टेंबर २०२५ या कालावधीत आर. ए. पोदार महाविद्यालय, माटुंगा येथे शालेय शहर ज्युदो स्पर्धेत आर्य हुंडेकरी, कुश पाटील, प्रतिश सरोज, विघ्नेश हळदणकर, विहंग खेटले, याशिका असवले, आर्या अहिरे आणि श्रीया आठल्ये यांनी सुवर्ण पदक जिंकले व त्यांची शालेय विभागस्तरीय ज्युदो स्पर्धेसाठी निवड झाली.

दि. ०८ नोव्हेंबर २०२५ रोजी ऐरोली येथे विवा आंतरशालेय ज्युदो चषक स्पर्धेत वीर निंबकर, वेदान्त विचारे, विघ्नेश हळदणकर यांनी सुवर्ण पदक जिंकले. तसेच कैवल्य पवार, तीर्थ पवार, सौमिक मोहिते यांनी रौप्य पदक जिंकले आणि राहुल मुदलियर व साईश यांनी कांस्य पदक जिंकले.

दि. १३ ते १४ डिसेंबर २०२५ या कालावधीत गोरेगाव येथे झालेल्या विवा विबगीऔर आंतरशालेय ज्युदो स्पर्धेत कुश पाटील आणि श्रीनय अवटे यांनी सुवर्ण पदक जिंकले. प्रतिश सरोज आणि काव्या गोहिल यांनी रौप्य पदक जिंकले. वीर निंबकर, वेदांत विचारे, कृतेश पाटील, ध्रुव ठाणेकर व समृद्धी ठाणेकर यांनी कांस्य पदक जिंकले.

दि. १९ एप्रिल २०२६ रोजी अंधेरी येथे आयोजीत मेयर्स ट्रॉफी ज्युदो चषक या स्पर्धेत आयुष फाळके, आर्य पाटील, वेदांत जगाडे, सायली विजेश, याशीका असवले, वेदांत विचारे, कुश पाटील, प्रतीश सरोज यांनी सुवर्ण पदक जिंकले. सुयोग मोरे, अथर्व शिंगरे, ईसक्की राजा यांनी रौप्य पदक जिंकले आणि आर्यन पवार, वीर निंबकर, सौमिक मोहिते व बालाजी व्यंकटेश यांनी कांस्य पदक जिंकले.

३.३ (५) मल्लखांब

अ) स्पर्धात्मक मल्लखांब

मल्लखांब प्रमुख प्रशिक्षक श्री. श्रेयस म्हसकर, श्री. स्वप्निल खेसे, प्रणिता बोराडे व साक्षी मांजरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेत दररोज सायंकाळी ६.०० ते ९.०० या वेळेत स्पर्धात्मक मल्लखांबाचा नियमित सराव घेतला जातो. संस्थेतील मुलांची स्पर्धात्मक कामगिरी पुढीलप्रमाणे

राज्यस्तरीय

१. डेरवण यूथ गेम राज्यस्तरीय निमंत्रित मल्लखांब स्पर्धा २०२६

दि. ४ व ५ मार्च २०२६, महाराष्ट्र हौशी मल्लखांब संघटना व रत्नागिरी जिल्हा मल्लखांब संघटनेच्या मान्यतेने, एस.व्ही.जे.सी.टी स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित डेरवण यूथ गेम राज्यस्तरीय निमंत्रित मल्लखांब स्पर्धा २०२६, १२ वर्षाखालील मुलींच्या गटात गार्गी रामचंद्र दळवी सुवर्ण पदक, सर्वोकृष्ट मल्लखांबपटू या स्पर्धेत चतुर्थ क्रमांक पटकाविला, १२ वर्षाखालील मुली सांघिक प्रथम, ओवी विकास गुरव, गार्गी रामचंद्र दळवी, मुद्रा संदेश घाडगे, स्वरा संदीप कामठे, गार्गी शैलेश काळे, प्रियांका भूषण नाचरे, १८ वर्षाखालील मुली सांघिक तृतीय, आर्या विलास पाटील, अद्विका अभिजीत गवस, वैष्णवी हेमनाथ पेडणेकर, विधी कुंदन भोपी, स्वरा शिशिर आंबेकर, अक्षरा अजय मुरुडकर, १८ वर्षाखालील मुलगे सांघिक तृतीय, जिवतेश सचिन पिपंळे, क्षितिज मंगेश केणी, वेदांत योगेश घार्गे, नैतिक गणेश बेळणेकर, ओम अर्जुन घारगे, १४ वर्षाखालील मुली सांघिक चतुर्थ आराध्या अजय खोत, मीरा मिलिंद सकपाळ,

कुमुद श्रीकांत चौगुले, आनंदी जितेंद्र सुर्यवंशी, अन्वी राकेश जाधव, आर्या अरविंद सावंत पटकाविला. १४ वर्षाखालील मुलगे, अद्वय सदाशिव परब, रुद्वेद हेमनाथ पेडणेकर, प्रणित विनोद सावंत, साहिल सिद्धराम केबानी, विहंग संतोष गित्ये सहभाग.

२. यशवंत चषक राज्यस्तरीय निमंत्रित मल्लखांब स्पर्धा.

दि. २६ व २७ डिसेंबर २०२५, महाराष्ट्र हौशी मल्लखांब संघटना व मुंबई शहर जिल्हा मल्लखांब संघटनेच्या मान्यतेने, रूतुराज स्पोर्ट्स अकॅडेमी आयोजित यशवंत चषक राज्यस्तरीय निमंत्रित मल्लखांब स्पर्धा, सुरेश आचरेकर क्रीडांगण, चिंचपोकळी येथे पार पडली. महिला खुला गट तनिष्का योगेश नगरकर, आर्या अरविंद सावंत, अक्षरा अजय मुरुडकर, आद्या अजय दरेकर, पुरुषांच्या खुल्या गट क्षितिज मंगेश केणी, नैतिक गणेश बेळणेकर, अद्वय सदाशिव परब, साहिल सिद्धराम केबानी सहभाग.

विभागस्तरीय

१. विभागस्तर आंतरशालेय मल्लखांब स्पर्धा २०२५-२६

दि. १६ ऑक्टोबर २०२५, क्रीडा व युवक संचालनाय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर यांच्या संयुक्त विद्यमाने विभागस्तर आंतरशालेय मल्लखांब स्पर्धा २०२५-२६ रोजी अक्षरा हायस्कूल, कांदिवली येथे झाल्या. १४ वर्षाखालील मुलगे नैतिक बेळणेकर १७ वर्षाखालील मुलगे अर्जुन जितेंद्र सूर्यवंशी सहभाग. १४ वर्षाखालील मुली आनंदी जितेंद्र सूर्यवंशी, १९ वर्षाखालील मुली उर्मिला संतोष घुरे सहभाग.

२. विभागस्तर आंतर महाविद्यालयीन मल्लखांब स्पर्धा २०२५-२६

दि. ०५ ऑक्टोबर २०२५, मुंबई विद्यापीठ, कालिना, मुंबई अंतर्गत मुंबई शहर विभागाच्या आंतरमहाविद्यालयीन मल्लखांब पुरुष व महिला २०२५-२६, या क्रीडा स्पर्धांचे आयोजन एल.एस. रहेजा कला आणि वाणिज्य महाविद्यालय, सांताक्रूझ पश्चिम यांच्या वतीने जवाहर विद्या भवन, चेंबूर, येथे झाल्या. खुला वयोगट पुरुष सखाराम विजय नाईक सहभाग, खुला वयोगट महिला साक्षी मांजरेकर, कायरा लोबो व तनिष्का नगरकर सहभाग.

३. ४१ वी कै. भाऊसाहेब रानडे विभागीय नवोदित मल्लखांब स्पर्धा २०२५-२०२६

दि. २० व २१ डिसेंबर २०२५, महाराष्ट्र हौशी मल्लखांब संघटना व मुंबई उपनगर जिल्हा मल्लखांब संघटनेच्या मान्यतेने, साने गुरुजी आरोग्य मंदिर आयोजित व पिडीलाइट व इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे एअरपोर्ट पुरस्कृत ४१ वी कै. भाउसाहेब रानडे विभागीय नवोदित मल्लखांब सपर्धा, १० वर्षाखालील मुलांच्या गटात रुद्वेद हेमनाथ पेडणेकर सुवर्ण पदक, १६ वर्षाखालील मुली

वैष्णवी हेमनाथ पेडणेकर कांस्य पदक, १६ वर्षावरील मुली कायरा मॅकी लोबो कांस्य पदक व मुलींच्या संघाने सांघिक सर्वसाधारण विजेतेपद. खुल्या गटातील मल्लखांब स्पर्धेत मुलींना दोरीच्या मल्लखांब व मुलांना पुरलेला मल्लखांब या साधनांवरती १ मिनिट या वेळेत जास्तीत जास्त आरोहण व आवरोहण सादर करायचे होते. या स्पर्धेत साक्षी संदेश मांजरेकर हिने कांस्य पदक पटकाविले. १० वर्षाखालील मुलगे, अद्वय सदाशिव परब, अश्वद अजय मुरुडकर, रोहन बालन मुदलियार, रुद्वेद हेमनाथ पेडणेकर, आरव सुरेश अंजर्लेकर, १२ वर्षाखालील निथिलन थेवर, प्रणित विनोद सावंत, साहिल सिद्धराम केबानी, विहंग संतोष गित्ये, १४ वर्षाखालील जिवतेश सचिन पिपंळे, क्षितिज मंगेश केणी, नैतिक गणेश बेळणेकर, वेदांत योगेश घार्गे, १६ वर्षाखालील अर्जुन जितेंद्र सुर्यवंशी, ओम अर्जुन घारगे, समर्थ वृषाली पाटील, स्वराज सुहास कदम, १६ वर्षावरील अनंत कृष्णा पासलकर, भूषण शंकर दवंडे, निरज मुसळे, विकास सभापति मिश्रा, सोहम संतोष पाटील सहभाग. १० वर्षाखालील मुली, अक्षरा अजय मुरुडकर, गार्गी शुभांगी शैलेश काळे, मुद्रा संदेश घाडगे, स्वरा संदीप कामठे, हिर गिरीश गाला, काव्या शिवप्रसाद शर्मा, प्रियांका भूषण नाचरे, स्वामिनी पराग कीर, १२ वर्षाखालील आराध्या अजय खोत, गार्गी रामचंद्र दळवी, कुमुद श्रीकांत चौगुले, ओवी विकास गुरव, आद्या अजय दरेकर, मीरा मिलिंद सकपाळ, १४ वर्षाखालील आनंदी जितेंद्र सुर्यवंशी, अक्षदा अजय मुरुडकर, अन्वी राकेश जाधव, स्वरा शिशिर आंबेकर, तुहिना नंबियार, मनश्री दिपक कोरगावकर, आर्या अरविंद सावंत, १६ वर्षाखालील आर्या विलास पाटील, अद्विका अभिजीत गवस, वैष्णवी हेमनाथ पेडणेकर, विधी कुंदन भोपी, निविदा रमेश पाटील, नियती राजन सावंत, १६ वर्षावरील अवनी कैलास गायकवाड, जिज्ञासा श्याम मेहेर, कायरा मॅकी लोबो, तनिष्का योगेश नगरकर, लावण्या सुबोध ढवण, श्रद्धा सचिन मोरे, सुश्मिता हेमंत मोरे सहभाग.

४. बालबलजागृती विभागीय निमंत्रित मल्लखांब स्पर्धा

दि. ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२६ आद्यशक्ती श्री भवानी आखाडा आयोजित बालबलजागृती विभागीय निमंत्रित मल्लखांब स्पर्धा, बी. एम. सी. मैदान, मालाड पूर्व येथे संपन्न झाली. १२ वर्षाखालील मुलगे अद्वय सदाशिव परब, रुद्वेद हेमनाथ पेडणेकर, अश्वद अजय मुरुडकर, विहंग संतोष गित्ये, १४ वर्षाखालील मुलगे जिवतेश सचिन पिपंळे, नैतिक गणेश बेळणेकर, साहिल सिद्धराम केबानी, निथिलन थेवर सहभाग, १६ वर्षाखालील मुलगे अर्जुन जितेंद्र सुर्यवंशी, समर्थ वृषाली पाटील, क्षितिज मंगेश केणी, वेदांत योगेश घार्गे सहभाग. १२ वर्षाखालील मुली गार्गी शुभांगी काळे, मुद्रा संदेश घाडगे, ओवी विकास गुरव, गार्गी रामचंद्र दळवी सहभाग १४ वर्षाखालील मुली आनंदी जितेंद्र सुर्यवंशी,

अन्वी राकेश जाधव, आर्या अरविंद सावंत, अक्षदा अजय मुरुडकर सहभाग, १६ वर्षाखालील मुली आर्या विलास पाटील, अद्विका अभिजीत गवस, वैष्णवी हेमनाथ पेडणेकर, विधी कुंदन भोपी सहभाग.

५. विभागस्तर आय.सी.एस.ई. निमंत्रित आंतरशालेय मल्लखांब स्पर्धा २०२५-२६

दि. १६ नोव्हेंबर २०२५ अक्षरा हायस्कूल व मुंबई उपनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागस्तर आय.सी.एस.ई. निमंत्रित आंतरशालेय मल्लखांब स्पर्धा (आय.सी.एस.ई. मर्यादित), अक्षरा हायस्कूल, कांदिवली येथे पार पडल्या. १२ वर्षाखालील मुली कुमुद श्रीकांत चौघुले व दिविजा केळकर सहभाग, १४ वर्षाखालील मुली तुहिना नांबियार सहभाग.

जिल्हास्तरीय

१. जिल्हास्तरीय आंतरशालेय मल्लखांब स्पर्धा २०२५-२६

दि. ०९ सप्टेंबर २०२५, क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तर शालेय मल्लखांब क्रीडा स्पर्धा २०२५-२६, श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर येथे झाल्या. १९ वर्षाखालील मुली उर्मिला घुरे प्रथम, १४ वर्षाखालील मुलगे नैतिक गणेश बेळणेकर तृतीय, १७ वर्षाखालील मुलगे अर्जुन सूर्यवंशी तृतीय, १४ वर्षाखालील मुलगे ओम अर्जुन घार्गे पाचवा व शुभम वैभव सावंत सहावा, १७ वर्षाखालील मुलगे हंबिराव दिनेश नाईक चतुर्थ, १४ वर्षाखालील मुली आनंदी जितेंद्र सूर्यवंशी चतुर्थ, ओवी विकास गुरव पाचवी, अद्विका अभिजीत गवस सहावी, १७ वर्षाखालील मुली वैष्णवी हेमनाथ पेडणेकर पाचवी, आर्या विलास पाटील सहावी, १७ वर्षाखालील मुलगे जिवतेश सचिन पिंपळे, १४ वर्षाखालील मुली आर्या अरविंद सावंत, आराध्या अजय खोत, अन्वी राकेश जाधव व स्वरा शिशिर आंबेकर सहभाग.

२. ड्रीम स्पोर्टस एम. एस. एस. ए. वार्षिक आंतरशालेय मल्लखांब स्पर्धा २०२५-२०२६

दि. १३ डिसेंबर २०२५, ड्रीम स्पोर्टस मुंबई स्कूल्स् स्पोर्ट्स असोसिएशन आयोजित व श्री समर्थ व्यायाम मंदिर, शिवाजी पार्क, दादर यांच्या सहकार्याने ड्रीम स्पोर्टस एम. एस. एस. ए. वार्षिक आंतरशालेय मल्लखांब स्पर्धा २०२५-२०२६, श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर येथे झाल्या. १० वर्षाखालील गटात रुद्वेद हेमनाथ पेडणेकर सुर्वण पदक, १६ वर्षाखालील समर्थ विजय पाटील कांस्य पदक व १४ वर्षाखालील आनंदी जितेंद्र सुर्यवंशी कांस्य पदक पटकाविले. मुलांच्या १० वर्षाखालील अद्वय सदाशिव परब, १२ वर्षाखालील

प्रणित विनोद सावंत, १४ वर्षाखालील क्षितिज मंगेश केणी सहभाग. मुलींच्या १० वर्षाखालील स्वरा संदीप कामठे, हिर गिरीश गाला, शिवांशी कामठे, १२ वर्षाखालील गार्गी रामचंद्र दळवी, कुमुद श्रीकांत चौगुले, आराध्या अजय खोत, मीरा मिलिंद सकपाळ, १४ वर्षाखालील अन्वी राकेश जाधव, स्वरा शिशिर आंबेकर, तुहिना नंबियार, ओवी विकास गुरव, १६ वर्षाखालील आर्या विलास पाटील, वैष्णवी हेमनाथ पेडणेकर सहभाग.

३. खेळ महोत्सव २०२५-२६

दि. २२ नोव्हेंबर २०२५, शिवसेना (उबाठा) पक्षाचे नेते व खासदार मा. श्री. अनिल देसाई यांच्या संकल्पनेतून दक्षिण मध्ये मुंबईकरांसाठी सांस्कृतिक, कला व खेळ महोत्सव आयोजन दि. २२ नोव्हेंबर २०२५ ते १६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत विविध ठिकाणी करण्यात आले होते. मल्लखांब खेळाची स्पर्धा दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी, श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर येथे पार पडल्या. मुलींच्या १० वर्षाखालील गटात गार्गी शैलेश काळे रौप्यपदक, १४ वर्षाखालील गटात आर्या विलास पाटील कांस्य पदक, १६ वर्षाखालील वैष्णवी हेमनाथ पेडणेकर सुवर्ण पदक, १६ वर्षावरील गटात उर्मिला घुरे सुवर्ण पदक, कायरा मॅकी लोबो रजत पदक व तनिष्का नगरकर कांस्य पदक. मुलांच्या १० वर्षाखालील गटात रुदवेद हेमनाथ पेडणेकर रौप्यपदक, १२ वर्षाखालील गटात प्रणित विनोद सावंत रौप्यपदक, विहंग संतोष गित्ये कांस्य पदक, १४ वर्षाखालील गटात समर्थ विजय पाटील रौप्यपदक, १६ वर्षावरील गटात सचिन मळेकर कांस्य पदक. १० वर्षाखालील मुली हिर गिरीश गाला, स्वरा संदीप कामठे, प्रियांका भूषण नाचरे, स्वामिनी पराग कीर, रमा सिद्धार्थ शिंत्रे, सान्वी संदीप चव्हाण, काव्या शिवप्रसाद शर्मा, मुद्रा संदेश घाडगे, १२ वर्षाखालील गार्गी रामचंद्र दळवी, कुमुद श्रीकांत चौगुले, ओवी विकास गुरव, स्वरा शिशिर आंबेकर, आद्या अजय दरेकर, आराध्या अजय खोत, मीरा मिलिंद सकपाळ, आनंदी जितेंद्र सुर्यवंशी, आर्या अरविंद सावंत, श्रीती लक्ष्मीकांत सावंत, अक्षरा अजय मुरुडकर, १४ वर्षाखालील अक्षदा अजय मुरुडकर, मनश्री दिपक कोरगावकर, तुहिना नंबियार, अन्वी राकेश जाधव, विधी कुंदन भोपी, अद्विका अभिजीत गवस, १६ वर्षावरील लावण्या सुबोध ढवण, अवनी कैलास गायकवाड, जिज्ञासा श्याम मेहेर, वर्षा अजय खोत, क्षमा दिलीप आंबेरकर, प्राची भूषण दवंडे, सुश्मिता हेमंत मोरे, शीतल जगदीश कदम, समृद्धी जगदीश तांडेल सहभाग. १० वर्षाखालील मुलगे विवान केशव शिंदे, अद्वय सदाशिव परब, अश्वद अजय मुरुडकर, १२ वर्षाखालील निथिलन थेवर, साहिल सिद्धराम केबानी, १४ वर्षाखालील जिवतेश सचिन पिपंळे, क्षितिज मंगेश केणी, नैतिक गणेश बेळणेकर, वेदांत योगेश घार्गे, १६ वर्षाखालील अर्जुन जितेंद्र सुर्यवंशी, १६ वर्षावरील अनंत कृष्णा पासलकर, भूषण दवंडे सहभाग.

ब) मुंबईतील प्रात्यक्षिके

१) दि. १७.४.२५ जुनी प्रभादेवी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, प्रभादेवी यांचेतर्फे आयोजित जिल्हा ज्यूनियर कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी, २) दि. १७.०९.२५ महिला विकास मंडळ मल्लखांब प्रात्यक्षिक, कुलाबा यांच्या वर्धापन दिनानिमित्त, ३) दि. ०८.१०.२५ इंग्लंडचे पंतप्रधान श्री. कीर स्टार्मर यांच्या भारत भेटीच्या वेळी कोस्टल रोड व गेट वे ऑफ इंडिया जवळ, ४) दि. १५.११.२५ खेल महोत्सव उद्घाटन, चेंबूर, ५) दि. १८.०१.२६ बॉलीवूड धमाका आरोग्य मेळा येथे सुप्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा शेट्टी व श्री. तुषार कपूर तसेच विविध संस्थांमधील आरोग्य दूत यांच्या समोर चित्रकुट, अंधेरी. या प्रात्यक्षिकात भोपाळून मल्लखांब प्रशिक्षणासाठी आलेली ५ मुलेही सहभागी झाली होती, ६) 'टेन्डर रूट्स् इंडिया' व 'छत्रपती शिवाजी महाराज वास्तुसंग्रहालय' यांच्या संयुक्त विद्यमाने, छत्रपती शिवाजी महाराज वास्तुसंग्रहालय येथे दि. २० व २१ जानेवारी २०२६ या दोन्ही दिवशी पार पडलेल्या 'रूट फोकवेज्' या बाल सादरीकरण कलामहोत्सवात ६ सत्रांमध्ये मल्लखांब व जलदीपासने यांचे प्रात्यक्षिक, ७) दि. २२.१.२०२६ रोजी 'ताज लॅन्डस एन्ड', बांद्रा येथे इंडियन मर्चंट चेंम्बर्स आयोजित 'युवा क्षमता ग्लोबल स्पोर्ट्स कॉनक्लेव्ह' च्या उद्घाटन प्रसंगी समर्थच्या खेळाडूंनी जलदीपासने व पुरलेल्या मल्लखांबाची प्रात्यक्षिके सादर केली. पद्मश्री व अर्जुन पुरस्कार विजेत्या माजी क्रिकेट महिला कप्तान डायना एडलजी, अर्जुन पुरस्कार विजेते टेबल टेनिसपटू कमलेश मेहता, क्रीडा क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय पातळीवरचे मानसतज्ज्ञ, आहारतज्ज्ञ, स्पोर्ट्स सायन्स तज्ज्ञ, संघटक अशी अनेक मान्यवर मंडळी या प्रसंगी उपस्थित होती. ८) दि. १८.०२.२६ रोजी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मनेजमेंट येथे त्यांच्या शिवजयंती महोत्सवात जलदीपासने व मल्लखांब प्रात्यक्षिक, ९) १९.०२.२६ मुंबई जिल्हा क्रीडाधिकारी आयोजित शिवजयंती उत्सवात गेट वे ऑफ इंडिया येथे जिल्हाधिकारी श्रीमती आंचल गोयल यांच्या उपस्थितीत, १०) दि. २८.०२.२६ कॅनडाच्या पंतप्रधानाच्या पत्नी श्रीमती डायना फॉक्स कारनी यांनी समर्थ क्रीडा भवनाला भेट दिली असता त्यांना जलदीपासने, दोरीच्या व पुरलेल्या मल्लखांबाची प्रात्यक्षिके दाखविली, ११) दि. १९.०३.२६ रोजी गुढीपाडवा नववर्ष स्वागत शोभायात्रेमध्ये चालत्या ट्रकवर मल्लखांब प्रात्यक्षिक, गिरगाव, १२) दि. १९.०३.२६ रोजी गुढीपाडवा नववर्ष स्वागत शोभायात्रेमध्ये चालत्या ट्रकवर मल्लखांब प्रात्यक्षिक, दादर, १३) दि. १९.०३.२६ रोजी गुढीपाडवा पूजन मल्लखांब प्रात्यक्षिक, ऑर्केड अस्पायर, गोरेगाव, १४) दि. २३.०३.२६ इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, माटुंगा येथे त्यांच्या 'स्पोर्ट्स सागा' या उपक्रमात मल्लखांब प्रात्यक्षिक

या व्यतिरिक्त संस्थेला भेट देणारे परदेशी पाहुणे, मान्यवर व संस्थेच्या विविध उपक्रमांच्या प्रसंगीही संस्थेच्या खेळाडूंनी मल्लखांब प्रात्यक्षिके सादर केली.

क) मुंबई बाहेरील प्रात्यक्षिके

१) दि. ०२.०४.२५ रोजी **'हम चॅरिटेबल ट्रस्ट'** यांच्या निमंत्रणावरून मुंबई भेटीसाठी **जम्मू काश्मीरमधून** आलेल्या १०० मुला-मुलींसमोर नमस्कार मंडळ, कल्याण येथे मल्लखांब प्रात्यक्षिक, २) दि. २१.६.२५ या कालावधीत **पश्चिम विभाग सांस्कृतिक केंद्राच्या** निमंत्रणावरून **उदयपूर** येथे आयोजित **आंतरराष्ट्रीय योग दिन** या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात समर्थाच्या १४ खेळाडूंनी मल्लखांब प्रात्याक्षिके दाखवली. ३) दि. २२.११.२५ रोजी **'अदानी ग्लोबल इंडोलॉजी कॉनक्लेव्ह', अहमदाबाद,** येथे झालेल्या ३ दिवसीय कार्यक्रमात संस्थेचे प्रमुख प्रशिक्षक व मानद प्रमुख कार्यवाह श्री. उदय वि. देशपांडे यांना "Mallakhamb: The Ancient Art of Strength and Spirit", या विषयावर "Reviving Parampara for a United World," या संहिते अंतर्गत भाषण देण्यास निमंत्रित करण्यात आले होते. या प्रसंगी संस्थेच्या ४ खेळाडूंनी मल्लखांब व जलदीपासनांची प्रात्यक्षिके सादर केली ४) दि. १४.१२.२५ रोजी पुणे येथे भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वि. का. राजवाडे सभागृहात 'आई' विषयक **राज्यस्तरीय कविसंमेलन** व 'आई' वरील कवितांचा काव्यसंग्रह प्रकाशनाच्या 'मातृसन्मान' कार्यक्रमात, ५) दि. २४-२६.१२.२६ या कालावधीत **पश्चिम विभाग सांस्कृतिक केंद्राच्या** निमंत्रणावरून **शिल्पग्राम महोत्सव, उदयपूर** येथे आयोजित या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात समर्थाच्या १६ खेळाडूंनी मल्लखांब प्रात्याक्षिके दाखवली. ६) दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी एकता महिला मंडळ, पनवेल येथे सरोजिनी नायडू यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या केल्या जाणाऱ्या **राष्ट्रीय महिला दिनाच्या** निमित्ताने कॉंग्रेस भवन सभागृह, पनवेल येथे श्री समर्थ व्यायाम मंदिराच्या मुली व प्रामुख्याने प्रभात मल्लखांब पथकातील महिला यांचे दोरी व पुरलेला मल्लखांब यांचे प्रात्यक्षिक श्री. उदय वि. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सादर करण्यात आले. याप्रसंगी डॉ. नीता ताटके या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. ७) दि. १ मार्च २०२६ रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर मुख्य सभागृह, नाशिक येथे झालेल्या चौथ्या विश्व मराठी संमेलनामध्ये समर्थच्या संघांनी पारंपरिक व्यायाम पद्धती – सूर्यनमस्कार, योग मनोरा, जलदीपासने, पुरलेला मलखांब यांची प्रात्यक्षिके सादर केली. ८) दि. १७ मार्च २०२६ रोजी सिडको प्रदर्शन केंद्र, वाशी, नवी मुंबई येथे **बाल मराठी संमेलनामध्ये** झालेल्या क्रीडापरिसंवादामध्ये श्री. उदय देशपांडे सरांना निमंत्रित करण्यात आले होते. हा परिसंवाद संपल्यानंतर समर्थच्या संघांनी पुरलेल्या मल्लखांबाची प्रात्यक्षिके सादर केली.

ड) अंध विद्यार्थी प्रात्यक्षिके

१) दि. १ मे २६ संकल्प स्वप्नपूर्ती प्रतिष्ठान, गोरेगाव प्रात्यक्षिक सराव नोंद आहे, २) दि. ०१.०१.२६ रोजी श्री. तुकाराम मुंडे, सचिव, दिव्यांग कल्याण विभाग व श्री. राजेश अग्रवाल, सचिव क्रीडा, कमला मेहता दादर अंधशाळेला भेट देण्यासाठी

आले असतांना अंध मुलींनी त्यांना दोरी मल्लखांब प्रात्यक्षिक दाखवले. त्यांनी मुलींचे खूप कौतुक केले. या अंध मुलींना पुरलेल्या मल्लखांबाचा सराव करता यावा म्हणून त्यांनी २ पोल मल्लखांब' शाळेला देणगीदाखल दिले. ३) १८.०१.२५ उडान अंध मल्लखांब प्रात्यक्षिक, रवींद्र नाट्य मंदिर ४) दि. ३१.१.२६ व्हिक्टोरिया मेमोरिअल स्कूल फॉर द ब्लाइंड, ताडदेव अंध मुलगे मल्लखांब प्रात्यक्षिक, काला घोडा फेस्टिव्हल

याव्यतिरिक्त संस्थेतर्फे झालेल्या मुंबई तसेच बाहेरगावच्या अनेक प्रात्यक्षिकात अंध मुला-मुलीनी सहभाग घेतला. अंध विद्यार्थी मल्लखांबाचा सराव करण्यासाठीही संस्थेत येत आहेत.

परदेश दौरे

१) **दि. २३ ते ३० एप्रिल २०२६ मल्लखांब प्रशिक्षण व प्रात्यक्षिक, बाली, इंडोनेशिया:** 'पुष्कर हिंदुनेशीया' या संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्ताने मयुरा पार्क, मातरम, लोम्बॉक आयलंड, बाली येथील आंतरराष्ट्रीय परिसंवादात दोरी व पुरलेला मल्लखांब यांची प्रात्यक्षिके दाखविण्यासाठी समर्थ संघाला आमंत्रित करण्यात आले होते. प्रात्यक्षिकाच्या सुरुवातीला पद्मश्री श्री. उदय देशपांडे यांनी मलखांबाचा उगम, इतिहास आणि फायदे सांगितले. समर्थ पाटील, साहिल घरत, अंध खेळाडू अजय लालवाणी, डॉ. नीता ताटके, सेजल ठाकूर, अकायशा शेट्टी, अंध खेळाडू कोमल पाटील सहभागी झाले होते. वैयक्तिक उड्या व मनोरे सादर झाल्यावर एकसाथ नमस्ते, कवायत विसर्जननी कार्यक्रम संपला. या प्रात्यक्षिकाचे सर्वांनी खूप कौतुक केले. संपूर्ण संघाला स्टेजवर बोलावून त्यांचा खास सन्मान करण्यात आला.

इ) मुलाखती / चित्रीकरण / व्याख्याने

१) दि. १२.०४.२५ रोजी सुप्रसिद्ध मिडिया जॉकी जितुराज यांनी संस्थेच्या १०० वर्षाच्या वाटचालीवर रेडियो मिरचीसाठी समर्थाच्या प्रांगणात पद्मश्री उदय वि. देशपांडे, डॉ. नीता ताटके, ज्येष्ठ प्रशिक्षक सुनील सवने, शिवछात्रपती पुरस्कार विजेती अदिती देशपांडे, प्रशिक्षक स्वप्निल खेसे, राष्ट्रीय विजेता सागर राणे, ॲथलिट अंगद आजगावकर, ख्याती धुरू व सारा राणे, अंध विद्यार्थी अजय लालवाणी यांच्या समर्थ क्रीडा भवन येथे मुलाखती घेतल्या, २) दि. १.५.२५ जयेंद्र लोंढे यांनी पद्मश्री उदय वि. देशपांडे यांची घेतलेली टेली मुलाखत, ३) दि. ६.५.२५ आसरा फाउंडेशन पर्यावरण चित्रीकरण, ४) दि. ६.५.२५ सुहास जोशी, धीरज पाटोळे – समर्थ वासंतिक क्रीडा प्रशिक्षण शिबीर यावर पद्मश्री उदय वि. देशपांडे यांची मुलाखत, ५) दि. ८.५.२६ अजय लालवाणी यांची श्री. रजनीकांत साळवी यांनी घेतलेली मुलाखत, ६) दि. ९.५.२५ 'मदर-डॉटर' फोटो – मिड डे साठी समर्थ मध्ये सराव करणाऱ्या 'आई व मुलगी' यांचे कीर्ती सुर्वे यांनी केलेले छायाचित्रीकरण, ७)

दि. ५.५.२५ सोनू, मोहित खन्ना यांचे उदय वि. देशपांडे यांच्यावर पॉडकास्ट, समर्थ क्रीडा भवन, ८) दि. २०.७.२५ कीर्ती सुर्वे मिड डेच्या ४६ व्या वर्धापन दिनानिमित्त दोरी व पुरलेल्या मल्लखांबावर छायाचित्रीकरण, ९) दि. २९.७.२५ लेख वॉरियर यांनी उदय वि. देशपांडे यांची घेतलेली मुलाखत, १०) दि. १९.८.२५ दीक्षा सक्सेना, दिल्ली यांनी उदय वि. देशपांडे यांची घेतलेली ऑनलाईन मुलाखत, ११) दि. ११.०९.२५ फ्रेंच डॉक्युमेंटरी साठी मल्लखांब चित्रीकरण, समर्थ क्रीडा भवन, १२) दि. ०८.१०.२५ RJ कोमल यांनी उदय वि. देशपांडे यांची घेतलेली मुलाखत, आचार्य मराठे कॉलेज, १३) दि. २२.१०.२५ मल्लखांब खेळाडूंचे दिवाळी निमित्त झालेल्या फटाके आतषबाजीच्या पार्श्वभूमीवर विविध वृतपत्रांनी केलेले छायाचित्रीकरण, १४) ११.०१.२६ मराठी संमेलन पणजी, गोवा येथे उदय वि. देशपांडे यांची मुलाखत १५) दि. १०.०२.२६ रोजी श्री. विवेक वडोलिया, लंडन यांनी पुरलेल्या व दोरी मल्लखांबावर छायाचित्रीकरण, समर्थ क्रीडा भवन १६) दि. ११.०२.२६ रोजी जन गण मन या राष्ट्रगीतासाठी चित्रीकरण, समर्थ क्रीडा भवन.

ई) मल्लखांब प्रशिक्षण: विविध ठिकाणी मल्लखांब प्रशिक्षण प्रामुख्याने श्री. उदय देशपांडे यांनी घेतले. काही ठिकाणी त्यांना मल्लखांब वर्गातील प्रशिक्षकांनी सहाय्य केले.

मुंबईतील मल्लखांब प्रशिक्षण

क्र.	दिनांक	तपशील	स्थळ	प्रशिक्षक
१	१५-२४.४.२५	महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन संचालित दुसरे वासंतिक शिबीर	चिकित्सक समूह शिरोडकर हायस्कूल, चर्नीरोड	उदय वि. देशपांडे, सचिन मळेकर, विभी बारिया, सेजल ठाकूर, कुमुदिनी मिरजकर
२	२१.४.२५	श्री. शिरीष चक्रदेव	समर्थ क्रीडा भवन	उदय वि. देशपांडे
३	२६.४-६.५.२५	महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन संचालित तिसरे वासंतिक शिबीर	चिकित्सक समूह शिरोडकर हायस्कूल, चर्नीरोड	उदय वि. देशपांडे, सचिन मळेकर, विभी बारिया
४	२-३१.५.२०२५	प्रगत मल्लखांब स्पर्धात्मक प्रशिक्षण शिबीर	समर्थ क्रीडा भवन	श्रेयस म्हसकर, स्वप्निल खेसे

क्र.	दिनांक	तपशील	स्थळ	प्रशिक्षक
५	१६-२३.५.२५	महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन संचालित चौथे वासंतिक शिबीर	राजभवन, वाळकेश्वर	उदय वि. देशपांडे, डॉ. नीता ताटके
६	२६-३१.५.२५	मल्लखांब, ज्युडो, खो खो, ॲथलेटिक्स शिबीर	कामगार कल्याण केंद्र	डॉ. नीता ताटके, सुनील सवने, ख्याती धुरू, प्रियंका पाटील, सुयोग मोरे, रुपेश शेलटकर
७	१६-१९.६.२५	पावसाळी मल्लखांब शिबिरासाठी शिक्षक प्रशिक्षण शिबीर	समर्थ क्रीडा भवन	उदय वि. देशपांडे
८	११.८.२५	प्रियांका शेठ, अहमदाबाद	समर्थ क्रीडा भवन	उदय वि. देशपांडे
९	२४.८.२५	अल्जेरिन व इव्हान, कझाकस्तान	समर्थ क्रीडा भवन	उदय वि. देशपांडे
१०	०८-१०.९.२५	श्री. यू, थायलंड	समर्थ क्रीडा भवन	उदय वि. देशपांडे
११	१९-२०.११.२५	जे.एस्.डब्ल्यू. 'मल्लखांब प्रमोशन प्रॉजेक्ट' च्या खेळाडूंचा स्पर्धात्मक सराव	समर्थ क्रीडा भवन	उदय वि. देशपांडे, डॉ. नीता ताटके, अदिती देशपांडे, स्वप्निल खेसे, शंतनू लोहार, सचिन मळेकर
१२	१५.१२.२५	इशा श्रावणी	समर्थ क्रीडा भवन	उदय वि. देशपांडे
१३	२७-३१.१२.२५	महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन संचालित मल्लखांब प्रशिक्षण	बालभवन, चर्नीरोड	उदय वि. देशपांडे, साहिल घरात, सेजल ठाकूर
१४	११.२.२६	Gianmarco Soresi	समर्थ क्रीडा भवन	उदय वि. देशपांडे

नियमित मल्लखांब प्रशिक्षण केंद्रे

या वर्षी जुलै ते सप्टेंबर २५ या कालावधीत मुंबई विद्यापीठाच्या 'अकादमी ऑफ थियेटर आर्ट्स' या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना श्री. उदय देशपांडे व श्री. प्रितेश निळे यांनी मल्लखांब प्रशिक्षण दिले.

महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन संचालित मल्लखांब प्रशिक्षण शिबीर, बालभवन, चर्नीरोड, येथे आठवड्यातून दोनदा नियमित मल्लखांब प्रशिक्षण सुरु झाले. श्री. सचिन मळेकर व सेजल ठाकूर प्रशिक्षक म्हणून काम बघतात.

दि. २५ सप्टेंबर २०२५ पासून कमला मेहता मुलींची अंधशाळा येथे आठवड्यातून दोनदा नियमित मल्लखांब प्रशिक्षण सुरु झाले. डॉ. नीता ताटके व सौ. सुरेखा लिमये प्रशिक्षक म्हणून काम बघतात.

मुंबईबाहेरील मल्लखांब प्रशिक्षण

क्र.	दिनांक	तपशील	स्थळ	सहायक
१	०२.०४.२५	हम चॅरिटेबल ट्रस्ट जम्मू-काश्मीरमधील मधील मुलांना मल्लखांब प्रशिक्षण	नमस्कार मंडळ, कल्याण	उदय वि. देशपांडे, डॉ. नीता ताटके, अंकुश कामडी, अकायशा शेट्टी
२	०८.०४.२५	वनविभाग मल्लखांब प्रात्यक्षिक व प्रशिक्षण	मुरबाड	उदय वि. देशपांडे, अंकुश कामडी, कोमल पाटील, निविदा पाटील
३	२६-२८.५.२५	पाणिनी कन्या गुरुकुल	वाराणसी, उत्तर प्रदेश	उदय वि. देशपांडे
४	३१.५–३.६.२५	अवर चिल्ड्रन शिबीर	शांताबा विद्यालय, कुकेरी	उदय वि. देशपांडे, महेश म्हात्रे, दुर्वा सोनावडेकर, प्रीती सावंत
५	१५.०६.२५	अश्वमेध मल्लखांब प्रशिक्षण केंद्र उद्घाटन	मुरबाड	उदय वि. देशपांडे, अंकुश कामडी, कोमल पाटील
६	६.७.२५	कनैलाल विद्यामंदिर	चंदननगर, हुगळी	उदय वि. देशपांडे

क्र.	दिनांक	तपशील	स्थळ	सहायक
७	१७.७.२५	शिवरुद्र आखाडा	श्रीवर्धन	उदय वि. देशपांडे
८	१९.७.२५	दीनदयाळ उपाध्याय आश्रमशाळा	निलंगा, लातूर	उदय वि. देशपांडे
९	१९.७.२५	रेणुका पब्लिक स्कूल	रेणापूर, लातूर	उदय वि. देशपांडे
१०	१९.७.२५	जिल्हा क्रीडा संकुल	लातूर	उदय वि. देशपांडे
११	२२-२३.७.२५	विवेकानंद केंद्र विद्यालय	चिन्मय मिशन, अंदमान	उदय वि. देशपांडे, डॉ. नीता ताटके, विभी बारिया
१२	२२.७.२५	'टच'	विहिगाव	आकाशकुमार सिंग
१३	२५-२७.७.२५	अनादि फाऊंडेशन	पळणी, तामिळनाडू	उदय वि. देशपांडे, विभी बारिया
१४	३१.७.२५	श्री विद्यासागर गुरुकुलम	भोपाल	उदय वि. देशपांडे
१५	०३-५.०८.२५	वाल्मिकी आश्रम गुरुकुल	सिकंदराबाद, तेलंगणा	उदय वि. देशपांडे
१६	३०-३१.०८.२५	शांताबा विद्यालय	कुकेरी	उदय वि. देशपांडे, नुपूर परब
१७	०५-६.०९.२५	बगडिया विद्या निकेतन	लक्ष्मणगढ, जयपूर	उदय वि. देशपांडे
१८	०८-९.०९.२५	जे.एस्.डब्ल्यू. मल्लखांब 'प्रोजेक्ट' शिक्षक प्रशिक्षण	खडवली	उदय वि. देशपांडे
१९	१३-१४.०९.२५	'मॅड'	विक्रमगड	उदय वि. देशपांडे, नेहा कुलकर्णी
२०	२१-२२.०९.२५	शांताबा विद्यालय	कुकेरी	उदय वि. देशपांडे, डॉ. नीता ताटके, प्रीतेश निळे
२१	२४-२५.९.२५	संस्कृती संवर्धन मंडळ	सगरोळी, नांदेड	उदय वि. देशपांडे

क्र.	दिनांक	तपशील	स्थळ	सहायक
२२	२६-३१.१०.२५	अवर चिल्ड्रन शिबिर	पनवेल	महेश म्हात्रे, प्रचीती देसाई, इशा देसाई
२३	०८-९.११.२५	शांताबा विद्यालय	कुकेरी	डॉ. नीता ताटके, शंतनू लोहार
२४	६-७.१२.२५	शांताबा विद्यालय	कुकेरी	डॉ. नीता ताटके, वीरेंद्र चमणकर
२५	०९.१२.२५	निर्वाण फाऊंडेशनच्या 'एनलायटन इंटरनॅशनल स्कूल	खोपोली	उदय वि. देशपांडे
२६	१२-१३.१२.२५	जे.एस्.डब्ल्यू. मल्लखांब 'प्रोजेक्ट' शिक्षक प्रशिक्षण	खातिवली, वासिंद	उदय वि. देशपांडे
२७	०३-४.०१.२६	शांताबा विद्यालय	कुकेरी	उदय वि. देशपांडे, डॉ. नीता ताटके
२८	०८.०१.२६	परशुराम एज्यूकेशन सोसायटी	चिपळूण	उदय वि. देशपांडे, डॉ. नीता ताटके, शांताराम जोशी
२९	०८.०१.२६	युनायटेड इंग्लिश स्कूल	चिपळूण	उदय वि. देशपांडे, डॉ. नीता ताटके, शांताराम जोशी
३०	०९.०१.२६	आयडियल इंग्लिश स्कूल ॲन्ड ज्यूनियर कॉलेज	कणकवली	उदय वि. देशपांडे, डॉ. नीता ताटके, शांताराम जोशी
३१	२३.१.२६	JSW मल्लखांब 'प्रोजेक्ट' शिक्षक प्रशिक्षण	खडवली	उदय वि. देशपांडे
३२	०२-६.०३.२६	वाल्मिकी आश्रम	हैद्राबाद	उदय वि. देशपांडे
३३	१४-१६.०३.२६	शांताबा विद्यालय	कुकेरी	उदय वि. देशपांडे, डॉ. नीता ताटके, अंजली टपाल
३४	१६.०३.२६	मानव सेवा संघ	डांग	उदय वि. देशपांडे, डॉ. नीता ताटके, अंजली टपाल

परदेशातील मल्लखांब प्रशिक्षण व प्रात्यक्षिके

१) दि. २३-३०.४.२५ मल्लखांब प्रशिक्षण, बाली, इंडोनेशिया: दि. २७.४.२०२५ रोजी सायंकाळी ४ ते ५.३० या वेळात दोरी मल्लखांबावर झालेल्या कार्यशाळेला मलेशियाच्या नृत्यसंघातील एका तरुणीसह ५ विद्यार्थी उपस्थित होते.

दि. २८.४.२०२५ सायंकाळी ६ ते ७.३० या वेळात ४ लहान विद्यार्थी, एक योग शिक्षिका, मलेशियन नृत्य संघातल्या मुली व त्यांची शिक्षिका असे सुमारे १५ जणांचे दोरी मल्लखांबावर प्रशिक्षण झाले. दोन्ही दिवशी सूर्यनमस्कार घेऊन एक साथ नमस्ते, कवायत विसर्जन करून वर्ग सोडला.

२) **सातवा अमेरिका मल्लखांब दौरा. दि. १६ ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबर २०२५ झालेल्या या ७ व्या** अमेरिका दौऱ्यात ४२ मल्लखांब प्रशिक्षण कार्यशाळा व व्याख्याने, सादरीकरण घेण्यात आले. त्याचा तपशील खालीलप्रमाणे,

क्र.	दिनांक, आयोजक, स्थळ	मल्लखांब प्रकार, विद्यार्थी संख्या, वेळ, विशेष उपस्थिती
१	**१७.१०.२५** नीलम कासवा, मल्लखांब फेडेरेशन यू.एस.अे. (MFU), फ्रीमॉट, कॅलिफोर्निया	**'पोल' व 'रोप' मल्लखांब,** २०-२५ मुलगे मुली, ५॥ ते ७॥ टेरेसा कॉक्स, फ्रिमॉटच्या माजी कौन्सिल सदस्य, सँटा क्लाराच्या ज्येष्ठ सोर्सिंग ऑफिसर, श्री. भास्कर रानडे, या विभागाचे महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष, सौ. नेहा कुलकर्णी, ईस्ट बे महाराष्ट्र मंडळाच्या सदस्या, अहमदनगरला हो. तु. गोडळकर यांच्याकडे पूर्वी शिकलेली अश्विनी कुलकर्णी, नाशिकला यशवंत जाधव यांच्याकडे शिकलेली संस्कृती धनवटे, मुलुंड जिमखान्याची शशिकला सुर्वे यांच्याकडे शिकलेली स्नेहल गोडसे उपस्थित
२	**१८.१०.२५** नीलम कासवा, मल्लखांब फेडेरेशन यू.एस.अे. (MFU), सॅन होजे	**'रोप' मल्लखांब,** २५-३० शिबिरार्थी, ५ ते ५० वर्षे वयोगट, १२ ते २, 'डाऊन सिंड्रोम' असलेला १५-१६ वर्षांचा मुलगाही शिकायला वर्गात

क्र.	दिनांक, आयोजक, स्थळ	मल्लखांब प्रकार, विद्यार्थी संख्या, वेळ, विशेष उपस्थिती
३	**१९.१०.२५** नीलम कासवा मल्लखांब फेडेरेशन यू.एस.अे. (MFU), डी ॲन्झा बुलेवर्डवर, सॅन होजे	**'पोल' मल्लखांब**, १० शिबिरार्थी, ३ ते १२ वर्षे वयोगट, १२॥ ते २ 'समर्थ'चा माजी मल्लखांबपटू इंद्रनील सोपारकर यानी पुरलेल्या मल्लखांबावर प्रात्यक्षिक दाखवले. त्याचा मुलगा इवान शिबिरात सहभागी 'यो इंडिया टीव्ही'ची जसलीन खनुजा व त्यांचा 'कॅमेरामन' यांनी कार्यशाळा सुरू असतांना चित्रीकरण केले. तिने मल्लखांबावर छान मुलाखत घेतली.
४	**१९.१०.२५** नीलम कासवा, हिंदू स्वयंसेवक संघ (HSS), सॅन होजे	**व्याख्यान,** १५-२० मुलं व १५-२० पुरुष-महिला स्वयंसेवक, ५॥ ते ७. मल्लखांबाची महती व माहिती, वैशिष्ट्ये व फायदे व आजवर केलेल्या मल्लखांब प्रचार-प्रसार कार्याबद्दल थोडक्यात माहिती दिली. अमेरिकन भारतियांकडून मल्लखांब प्रसारासाठी असलेल्या अपेक्षा स्पष्ट केल्या.
५	**२५.१०.२५** 'समर्थ'ची माजी राष्ट्रीय खेळाडू दिपाली आठल्ये-करंदीकर, हिंदू स्वयंसेवक संघ (HSS) दोन दिवसीय निवासी शिबीर, कँप वामटोचिक, प्रेस्कॉट	**'रोप' मल्लखांब,** बाल गट व पालक महिला, सायंकाळी ४ ते ६ सकाळी ११॥ ला उदय देशपांडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व औपचारिक उद्घाटन समारंभ. दि. २६.१०.२०२५ रोजी कालच्या मल्लखांब सत्राबद्दल 'प्रतिसाद सत्र' झाले. कालचं 'रोपं' मल्लखांबाचं सत्र 'खूप छान' झालं असं सर्वांनीच सांगितलं.
६	**२७.१०.२५** माजी मल्लखांबपटू उपेंद्र वाटवे, मल्लखांब फेडेरेशन यू.एस.अे. (MFU), कनेक्टिकट मल्लखांब प्रशिक्षण केंद्र	**'पोल' व 'रोप' मल्लखांब,** मुलभूत व प्रगत प्रशिक्षण, २० खेळाडू मल्लखांबात 'एण्ड रिझल्ट' बरोबरच तिथे जातानाचे मार्गक्रमण जास्त महत्वाचं असतं यावर भर

क्र.	दिनांक, आयोजक, स्थळ	मल्लखांब प्रकार, विद्यार्थी संख्या, वेळ, विशेष उपस्थिती
७	**२८.१०.२५** माजी मल्लखांबपटू उपेंद्र वाटवे मल्लखांब फेडरेशन यू.एस.ए. (MFU), एडिसन, न्यू जर्सी	**'पोल' व 'रोप' मल्लखांब,** २० खेळाडू, सायंकाळी ५.३० ते ८ 'समर्थ'ची माजी मल्लखांब प्रशिक्षिका निधी बेर्डे उपस्थित
८	**२९.१०.२५** माजी मल्लखांबपटू उपेंद्र वाटवे मल्लखांब फेडरेशन यू.एस.ए. (MFU), एडिसन, न्यू जर्सी	**स्पर्धात्मक मल्लखांब प्रशिक्षण सत्र,** सायंकाळी ६.३० ते ७.३०, अनिश काटकर हा त्यांचा प्रशिक्षक उपस्थित होता. न्यू जर्सीचे 'कौन्सुल मेंबर' श्री. अजय पाटील, विश्व मल्लखांब फेडरेशनचे संस्थापक व संचालक श्री. कृष्णकुमारजी तसेच 'समर्थ'चा शिवछत्रपती पुरस्कार विजेता मल्लखांबपटू राजेश नारखेडे या प्रसंगी उपस्थित.
९	**३१.१०.२५** मंदार पाटील व क्षितिजा देशपांडे, हिंदू स्वयंसेवक संघ (HSS), चिन्मय मिशन, ओरलँडो, फ्लोरिडा	**'पोल' मल्लखांब,** मुले, महिला व पुरुष, सायंकाळी ६ ते ८ ६८ वर्षांच्या शकुंतलाबाई जानवडकर, ८२ वर्षांचे मुलेशभाई नायक या वर्गात सहभागी.
१०	**१.११.२५** मंदार पाटील व क्षितिजा देशपांडे, पाईन लेक रिट्रीट, ओरलँडो, फ्लोरिडा	**'पोल' व 'रोप' मल्लखांब,** १२ शिबिरार्थी, २ ते ६, बडोद्याच्या लक्ष्मीनाथ व्यायाम मंदिरातील राष्ट्रीय मल्लखांबपटु जिंकल, त्यांची बहीण व त्यांचे वडील, समर्थची माजी विद्यार्थिनी अनघा जोशी, पाईन व्हॅली रिट्रीट'चे मालक श्री. ब्रम्हा अग्रवाल उपस्थित
११	**२.११.२५** मंदार पाटील व क्षितिजा देशपांडे, मंदार पाटील यांचे घरी, ओरलँडो, फ्लोरिडा	**'पोल' मल्लखांब,** २ शिबिरार्थी, ११.३० ते १२.३०

क्र.	दिनांक, आयोजक, स्थळ	मल्लखांब प्रकार, विद्यार्थी संख्या, वेळ, विशेष उपस्थिती
१२	**२.११.२५** मंदार पाटील व क्षितिजा देशपांडे, पार्सले लेन फार्म, न्यू स्मिर्ना बीच, ओरलँडो, फ्लोरिडा	**'पोल' व 'रोप' मल्लखांब,** २० मुले व पालक, दुपारी २.३० ते ४.३० 'मल्लखांब आरती व मल्लखांब गीत' म्हणून दाखवलं. श्री. नंदेश उमपजींनी गायलेला मल्लखांब पोवाडा व त्यावर 'समर्थ' मल्लखांबपटुंनी केलेलं सुरेख मल्लखांब प्रात्यक्षिक दाखवलं.
१३	**४.११.२५** मंदार पाटील व क्षितिजा देशपांडे, रोटरी क्लब ऑफ वेस्ट सेंट लुईस काऊंटी, हॉटेल एज वाईल्ड, ओरलँडो, फ्लोरिडा	**व्याख्यान,** सकाळी ११.३० ते १२ सर्वांनी आपल्या 'हॅप्पी मेसेज' मध्ये प्रत्येकाने 'आपल्याला मल्लखांबाबद्दल समजलं व आनंद वाटला, 'गेस्ट' उदय देशपांडे यांना शुभेच्छा' अशा भावना व्यक्त केल्या.
१४	**५.११.२५** ओंकार देशपांडे, स्वप्निल बिडवे निवास, बालविन	**मल्लखांबावर 'पीपीटी'** सादरीकरण, ५० व्यक्ती उपस्थित, सायंकाळी ६.३० ते ८
१५	**७.११.२५** अभिषेक भट, गौतम सोंदे, भाग्यश्री पटवारी, रोझेनबर्ग	**'पोल' व 'रोप' मल्लखांब,** २५ छोटी मुलं व १५ पालक, सायंकाळी ५ ते ८, अभिषेकजींनी संपूर्ण प्रशिक्षण वर्गाचं चलतचित्रीकरण केलं.
१६	**८.११.२५** राजेश पटवारी, सेवा इंटरनॅशनल, ब्राझोज् रिव्हर साईड पार्क, शुगरलँड	**'फाईव्ह के रन' उपक्रम,** २००-२५० धावपटु 'हेल्थ ईज वेल्थ' असा संदेश देऊन 'रन'ला शुभेच्छा दिल्या, संजू (जगदीश) देसाई – डॉ. सौ. सुजाता कुमठा यांची भेट.
१७	**८.११.२५** प्रमुखाध्यापक अमृत आठवले, अधिक्षिका अनुजा झांब्रे, ह्युस्टन मराठी मंडळ, विठ्ठल रुक्मिणी मंदिर	**'पोल' व 'रोप' मल्लखांब,** सकाळी १० ते ११.३०, ६०-७० शिबिरार्थी व त्यांचे पालक, श्री. गणेश देवरुखकरचा विद्यार्थी मल्लखांब प्रशिक्षक अजिंक्य जोशी उपस्थित

क्र.	दिनांक, आयोजक, स्थळ	मल्लखांब प्रकार, विद्यार्थी संख्या, वेळ, विशेष उपस्थिती
१८	**८.११.२५** प्रमुखाध्यापक अमृत आठवले, अधिक्षिका अनुजा झांब्रे ह्युस्टन मराठी मंडळ, विठ्ठल रुक्मिणी मंदिर	**'पोल' व 'रोप' मल्लखांब,** दुपारी १.३० ते २.३०, ६०-७० शिबिरार्थी व त्यांचे पालक
१९	**८.११.२५** प्रमुखाध्यापक अमृत आठवले, अधिक्षिका अनुजा झांब्रे ह्युस्टन मराठी मंडळ, विठ्ठल रुक्मिणी मंदिर	**'पोल' व 'रोप' मल्लखांब,** दुपारी २.३० ते ३.३०, ६०-७० शिबिरार्थी व त्यांचे पालक
२०	**८.११.२५** स्वानंद जोशी, ह्युस्टन मराठी मंडळ, विठ्ठल रुक्मिणी मंदिर	**'पोल' व 'रोप' मल्लखांब,** सायंकाळी ५ ते ८, ३०-३५ मुलं व प्रौढ कार्यकर्ते, 'समर्थ'ची माजी खेळाडू वनाली तुळजापुरकर, तिचा मुलगा श्लोक, मुलगी शारवी व यजमान शैलेंद्र यांच्यासह आली होती. सुब्रमणीजी, शिवा-सत्या, श्रवण सहभागी
२१	**९.११.२५** अभिषेक भट, ह्युस्टन मराठी मंडळ, विठ्ठल रुक्मिणी मंदिर	**'पोल' मल्लखांब,** २० शिबिरार्थी, सकाळी ९ ते ११, ७ ते ७० वर्षे
२२	**९.११.२५** अभिषेक भट, ह्युस्टन मराठी मंडळ, विठ्ठल रुक्मिणी मंदिर	**'पोल' मल्लखांब,** श्री. कोहडी आणि त्यांची 'पोल डान्सर' पत्नी सकाळी १०.३० ते ११.३०, संजू (जगदीश) देसाई – डॉ. सौ. सुजाता कुमठा यांची भेट.
२३	**१०.११.२५** रूबी कॅरेन व लुक्का, फेअरमॉट स्कूल	**'रोप' मल्लखांब,** 'एरियल' करणाऱ्या मुली, १.३० ते २.३०, 'वेस्ट कोस्ट एरियल आर्ट फेस्टिव्हल' या उपक्रमात

क्र.	दिनांक, आयोजक, स्थळ	मल्लखांब प्रकार, विद्यार्थी संख्या, वेळ, विशेष उपस्थिती
२४	**११.११.२५** सुब्रमणी अनंतपद्मनाभ, शिवकामी श्रीनिवासन, चिन्मय मिशन, डोमेन	**'रोप' मल्लखांब,** सायंकाळी ६ ते ८, मुल, पालक व एक अमेरिकन नर्तक
२५	**१२.११.२५** सुब्रमणी अनंतपद्मनाभ, शिवकामी श्रीनिवासन, चिन्मय मिशन, डोमेन	**'पोल' मल्लखांब,** सकाळी ८.३० ते १०.३०, १२ मुलं, तत्व ॲकॅडेमी'च्या ३ ते १२ वर्षे हा वयोगट
२६	**१२.११.२५** सुब्रमणी अनंतपद्मनाभ, शिवकामी श्रीनिवासन, चिन्मय मिशन, डोमेन	**'पोल' मल्लखांब,** सकाळी १०.३० ते ११.३०, ३ मुलगे, विशेष प्रशिक्षण
२७	**१२.११.२५** सुब्रमणी अनंतपद्मनाभ, शिवकामी श्रीनिवासन, चिन्मय मिशन, डोमेन	**'रोप' मल्लखांब,** सायंकाळी ५ ते ६, ॲडल्ट्स् रोप
२८	**१२.११.२५** सुब्रमणी अनंतपद्मनाभ, शिवकामी श्रीनिवासन, चिन्मय मिशन, डोमेन	**'पोल' मल्लखांब,** सायंकाळी ७ ते ८, १२ मुलगे
२९	**१३.११.२५** सुब्रमणी अनंतपद्मनाभ, शिवकामी श्रीनिवासन, चिन्मय मिशन, डोमेन	**'पोल' मल्लखांब,** सकाळी ९ ते ११, १५ शिबिरार्थी, २ ते १३ वर्ष वयोगट
३०	**१३.११.२५** सुब्रमणी अनंतपद्मनाभ, शिवकामी श्रीनिवासन, चिन्मय मिशन, डोमेन	**'पोल' मल्लखांब,** सकाळी ११ ते १२, स्वयंसेवक, शिक्षक व मोठ्या मुलांचा अतिरिक्त सराव

क्र.	दिनांक, आयोजक, स्थळ	मल्लखांब प्रकार, विद्यार्थी संख्या, वेळ, विशेष उपस्थिती
३१	**१३.११.२५** सुब्रमणी अनंतपद्मनाभ, शिवकामी श्रीनिवासन, चिन्मय मिशन, डोमेन	**'पोल' मल्लखांब,** सायंकाळी ५ ते ६.३०, पालक
३२	**१३.११.२५** सुब्रमणी अनंतपद्मनाभ, शिवकामी श्रीनिवासन, चिन्मय मिशन, डोमेन	**'रोप' मल्लखांब,** सायंकाळी ६.३० ते ७.३०, 'तत्व ॲकॅडेमी'चे प्रमुख श्री. दिनेशजी पूर्ण वेळ प्रशिक्षण सत्राला उपस्थित.
३३	**१५.११.२५** अरुणकुमार अक्किनेनी नॉलेज सिस्टिम्स फाऊंडेशन', ब्लफ्यू कम्युनिटी 'बास्केटबॉल कोर्ट	**'पोल' मल्लखांब,** सकाळी ९.३० ते ११, २५-३० मुलं व १५-२० पालक
३४	**१५.११.२५** अरुणकुमार अक्किनेनी नॉलेज सिस्टिम्स फाऊंडेशन', ब्लफ्यू कम्युनिटी 'बास्केटबॉल कोर्ट	**'रोप' मल्लखांब,** ११ ते १२.३०, २५-३० मुलं व १५-२० पालक
३५	**१५.११.२५** अरुणकुमार अक्किनेनी अभिषेक पद्मनाभूनी निवास	**मुलाखत,** दुपारी १ ते २, दुपारी 'इंडियन नॉलेज सिस्टिम्, ऑस्टिन हिंदु टेंपल व इतर अनेक हिंदू संघटनांशी जवळून निगडित असलेल्या श्री. अरुणजी यांनी प्रदीर्घ मुलाखत घेतली. शिवकामीजींनी ती आख्खी रेकॉर्ड केली.
३६	**१५.११.२५** सुब्रमणी अनंतपद्मनाभ, शिवकामी श्रीनिवासन, नृत्य सभागृह, शिवकामी निवास	**'पोल' व 'रोप' मल्लखांब,** सायंकाळी ५ ते ६, प्रशिक्षण व छायाचित्रीकरण

क्र.	दिनांक, आयोजक, स्थळ	मल्लखांब प्रकार, विद्यार्थी संख्या, वेळ, विशेष उपस्थिती
३७	**१६.११.२५** सुब्रमणी अनंतपद्मनाभ, कृष्ण मोहनजी व जोगेश्वरजी ऑस्टिन हिंदु टेंपल, ईस्ट ऑस्टिन	**मल्लखांब आरती,** 'एएचटी, एचएसएस, हिंदु पॅक्ट' या संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित. शिवाच्या शंखनादाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. श्री. उदय देशपांडे यांनी रचलेल्या 'मल्लखांब आरती'च्या प्रती सर्वाना वाटल्या गेल्या. उदय देशपांडे यांनी ध्वनीक्षेपकावरून खड्या आवाजात म्हटलेल्या आरतीला सर्वांनी चांगली साथ दिली.
३८	**१६.११.२५** सुब्रमणी अनंतपद्मनाभ, कृष्ण मोहनजी व जोगेश्वरजी ऑस्टिन हिंदु टेंपल, ईस्ट ऑस्टिन	**व्याख्यान,** मल्लखांब व त्याचे फायदे, ५ ते १२ वर्षे, १०.३० ते ११
३९	**१६.११.२५** सुब्रमणी अनंतपद्मनाभ, कृष्ण मोहनजी व जोगेश्वरजी ऑस्टिन हिंदु टेंपल, ईस्ट ऑस्टिन	**प्रात्यक्षिक,** ११ ते ११.३०, प्रशिक्षण घेतलेल्या मुला-मुलींनी वैयक्तिक उड्या व मनोरे, बाहेर 'रोप' मल्लखांबाचे प्रात्यक्षिक झाले.
४०	**१६.११.२५** सुब्रमणी अनंतपद्मनाभ, कृष्ण मोहनजी व जोगेश्वरजी ऑस्टिन हिंदु टेंपल, ईस्ट ऑस्टिन	**'पोल' मल्लखांब** - समोर प्रेक्षक म्हणून बसलेल्या ४-५ मुलांचे 'बेसिक एलिमेंट्स्' घेतले. त्यानंतर नवीन मुले, पालक, 'एएचटी'चे काही कार्यकर्ते, अगदी ७१ वर्षांचे जोगेश्वरजी, ४१ वर्षांचे 'फोटोग्राफर'सुद्धा 'कॅमेरा' बाजूला ठेऊन पुढे आले व सर्वानीच उभ्याने शवासन, 'इन्व्हर्टेड हँग', पश्चिमोत्तानासन, 'वन हँड पद्मासन' वर चढणं असे प्रकार यशस्वीपणे करून दाखवले.

क्र.	दिनांक, आयोजक, स्थळ	मल्लखांब प्रकार, विद्यार्थी संख्या, वेळ, विशेष उपस्थिती
४१	**१६.११.२५** अभिषेक पद्मनाभूनी, सिरील बेर्नियर, अध्यक्ष रोटरी क्लब ऑफ ऑस्टिन कॉस्मॉपॉलिटन, ईस्ट ऑस्टिन	**व्याख्यान,** मल्लखांब म्हणजे काय? त्याचे फायदे काय? तो सगळ्या वयोगटातील स्त्री-पुरुषांना कसा करता येतो? अंध मुलंही कसा करू शकतात? 'फोटो आल्बम' व समर्थमध्ये घेतलेली एक ३ मिनिटांची 'फिल्म'
४२	**१७.११.२५** सुब्रमणी अनंतपद्मनाभ शिवकामी निवास, ऑस्टिन	**'पोल' व 'रोप' मल्लखांब** - सुब्रमणीजी व शिवकामीजी यांच्या कुटुंबियांसाठी शेवटची मल्लखांब कार्यशाळा, लाठी व मुद्गल प्रशिक्षण

या सर्व कार्यशाळांमध्ये सुरुवातीला शरीरतापन, शेवटी सूर्यनमस्कार व 'एक साथ नमस्ते, कवायत विसर्जन'ने हा प्रशिक्षण वर्गाची समाप्ती होत असे. प्रत्यक्ष मल्लखांबावर चढायच्या आधी विविध आसने घेतली जात असत. 'पोल'वर द्रोणासन, इन्व्हर्टेड हँग, त्यातून पद्मासन, वर बोंडावर बसणे, प्रौढासन, पादहस्तासन, हँगिंग पद्मासन, उलटी अढी, द्रोणासन, चौघांचं एकावेळेस द्रोणासन, 'हँडस्टँड माऊंट', चक्रासन, रिव्हर्स हँडस्टँड, बाणे गुरुजी पकड, उलटी अढी, क्रंचेस, 'बजरंग पकड', पाठीचा व पोटाचा ताजवा व मनोरे हे प्रकार प्रामुख्याने शिकवले.

'रोप' मल्लखांबावर तीन प्रकारचे झोके, 'इन्व्हर्टेड हँग' उभ्यानी शवासन व पश्चिमोत्तानासन, 'वन हँड हँगिंग पद्मासन', साधी उडी व साध्या उडीचा संच, बजरंग पकड, वाडी, रिकेब, दुहेरी पद्मासनाचा व इतर मनोरे प्रामुख्याने शिकवले.

दि. ६.०२.२६ श्रीलंका

मा. श्री. अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असतांना त्यांनी उद्घाटन केलेल्या स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्रात श्रीलंकेतील पहिले मल्लखांब प्रशिक्षण चांगले पार पडले. या वर्गात ३० ते ७० वर्षे वयोगटातील २० योग प्रशिक्षकांना २ तास 'रोप' मल्लखांबावर उभ्याने शवासन, पश्चिमोत्तानासन, हँगिंग पद्मासन, वन हँड हँगिंग पद्मासन, इन्व्हर्टेड हँग, बड्र्स् नेस्ट, कटी पकड असे बरेच प्रकार घेतले. 'एक साथ नमस्ते व कवायत विसर्जन' घेऊन वर्ग संपला.

फ) मल्लखांब (इतर)

दि. १५ जून २०२५ रोजी ९ व्या आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिनानिमित्त श्री. श्रेयस म्हसकर व श्री. स्वप्निल खेसे यांनी मल्लखांब व या दिवसाची माहिती दिली. मल्लखांब दिनानिमित्त खेळाडूंच्या मल्लखांब स्पर्धा घेण्यात आल्या.

दि. ०९.०९.२५ JSW मल्लखांब 'प्रोजेक्ट' अंतर्गत खडवली येथे झालेल्या मल्लखांब स्पर्धेमध्ये डॉ. नीता ताटके व श्री. सुनील सवने यांनी पंच म्हणून काम बघितले.

१. प्रभात महिला मल्लखांब पथक: प्रमुख प्रशिक्षक पद्मश्री श्री. उदय देशपांडे, डॉ. नीता ताटके आणि प्रशिक्षिका तेजल मुसळे यांच्या मार्गदर्शनाखाली रोज सकाळी महिला मल्लखांब पथकाचा सराव सुरु असतो. हा सराव श्री. उदय देशपांडे सर स्वतः ७.०० ते ८.०० या वेळेत घेतात. या पथकात वय वर्ष १० पासून ते वय वर्ष ५० पर्यंतच्या सुमारे ३० महिला, मुली आहेत. एकूण प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या, तसेच याच व्यायाम शाळेत शिकत असणाऱ्या मुलांच्या मातांचाही यात समावेश आहे. सर स्वतः काळ्जीपूर्वक यांना पोल मलखांब, रोप मलखांब, सूर्यनमस्कार, बेबी बार, सिंगल बार, योगासने, फ्लोअर एक्सरसाईज शिकवतात. नियमित आल्यामुळे या महिलांच्या तब्बेतीत सुधारणा, आत्मविश्वास वाढणे, अडचणींवर मात करणे, नेतृत्व विकास हे गुण वाढीस लागले आहेत.

४. उत्सव व समारंभ

संस्थेमध्ये आयोजित केलेले विशेष दिन व साजरे झालेले समारंभ खालीलप्रमाणे.

४.१ (१) ५२ वा संस्थापक स्मृती दिन, दि. १७ जुलै २०२५

श्री समर्थ व्यायाम मंदिराचे संस्थापक व्यायाममहर्षी पूज्य कै. प्र. ल. काळे गुरुजी यांचा ५२ वा पुण्यतिथी समारंभ दि. १७ जुलै २०२५ रोजी साजरा करण्यात आला. १०० वर्षे पूर्ण होणाऱ्या या संस्थेत विविध प्रकारच्या मनोरंजनाचे खेळ ते स्पर्धात्मक खेळ सादर करून व्यायाम प्रात्यक्षिकांव्दारे श्रद्धांजली वाहण्यात आली. या व्यायाम प्रात्यक्षिकांमध्ये संस्थेच्या १९२५ साली झालेल्या स्थापनेच्या इतिहासापासून ते आतापर्यंत झालेली प्रगती दाखविण्यात आली होती. या प्रात्यक्षिकांची संहिता व निवेदन संयुक्त कार्यवाह डॉ. नीता ताटके यांनी लिहिले होते. प्रात्यक्षिक सादर करणारे खेळाडू, समोर बसलेले लहान-मोठे खेळाडू प्रेक्षक, त्यांचे पालक व प्रमुख पाहुणे यांच्यातला दुवा निवेदनाद्वारे साधण्याचं काम सौ. सीमा कोल्हटकर यांनी अतिशय समर्थपणे केले. हे प्रात्यक्षिक बसविण्यासाठी श्री. सुनील सवने, श्री स्वप्निल खेसे, कु. अंजली देशमुख, श्री. भूषण दवंडे, श्रीमती उल्का भगत व सौ. आरती मेस्त्री यांनी विशेष मेहनत घेतली. मुलांचे कौतुक करायला 'मे. पांडुरंग हरी वैद्य आणि सन्स'चे मालक श्री. महेश पांडुरंग वैद्य हे प्रमुख पाहुणे व कै. प्र. ल. काळे गुरुजी यांचे नातू निवृत्त ए. सी. पी. श्री. हेमंत काळे, अमर हिंद मंडळाचे विश्वस्त श्री. दिपक पडते, कार्योपाध्यक्ष श्री. विजय राणे आणि कोषाध्यक्ष श्री. प्रफुल्ल पाटील सन्माननीय अतिथी

म्हणून उपस्थित होते. श्री समर्थ व्यायाम मंदिराचे अध्यक्ष ॲड. अरुण देशमुख, तसेच अनेक व्यवस्थापक मंडळ सदस्य, खेळाडू, प्रशिक्षक मोठ्या संख्येने हे देखील उपस्थित होते.

संस्थेचे नाव आपल्या कामगिरीने उज्ज्वल करणाऱ्या गुणवंत खेळाडूंना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते परितोषिके देण्यात आली. शिक्षक व कर्मचारी यांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. गुणवंत खेळाडू व प्रात्यक्षिकात सहभागी झालेल्या सर्वांना सुकामेवा पाकीट देण्यात आले. प्रात्यक्षिकात सहभागी झालेल्या सुमारे २५० खेळाडू तसेच प्रशिक्षक यांना श्री. उदयदादा लाड यांचेतर्फे खास चिक्की देण्यात आली. प्रसाद म्हणून सर्वांना मोतीचूर लाडू देण्यात आला.

४.१ (२) दि. १५ ऑगस्ट २०२५

दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी आपल्या संस्थेतर्फे '७९ वा स्वातंत्रदिन ध्वजारोहण सोहळा' समर्थ क्रीडा भवन, छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे सकाळी ७ ते ८ वेळात आयोजित करण्यात आला होता. सकाळी ७ वाजता सर्वसाधारण प्रभात पथक व सायंकाळ ध्रुव पथकातील विद्यार्थी - २२ मुली, १६ मुलगे मिळून ३७ विद्यार्थी आणि पालक - पुरुष १०, महिला ०९ असे १९ जण उपस्थित होते. सेवक श्री. सचिन मोरे यांनी गच्चीत उभारलेल्या ध्वजस्तंभावर मल्लखांब प्रशिक्षक श्री. सचिन मळेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मैदानात उपस्थित असलेल्या विद्यार्थी-पालक यांनी ध्वजाला सामुहिक मानवंदना दिली. सर्वांनी तिरंगी ध्वजाला वंदन करून 'जन-गण-मन' हे राष्ट्रगीत एका सुरात म्हटले आणि सर्वांना प्रसाद साखर वाटण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे मानद प्रमुख कार्यवाह व प्रशिक्षक पद्मश्री श्री. उदय विश्वनाथ देशपांडे यांनी दिल्या. कोषाध्यक्ष श्री. स्वप्निल खेसे, श्री. महेंद्र राऊत, कु. विजयश्री माजगांवकर व सर्वसाधारण पथक शिक्षिका सौ. आरती मेस्त्री, सौ. वर्षा खोत या प्रसंगी उपस्थित होते.

देशभक्तीपर प्रतिज्ञा, भाषण, कविता, वेशभूषा असे विविध गुणदर्शन कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केले, त्याचे श्री. सचिन मळेकर यांनी सूत्रसंचलन केले. १) रित्विक हेरंब आक्रे, मराठी प्रतिज्ञा, भारत माझा देश आहे, २) शिवांशी समीर कामठे, मराठी मुद्रा, शिवगर्जना, शिवाजी महाराज, ३) साईशा रुचिरा पाटील, मराठी भाषण स्वातंत्र्यदिन, ४) रेयांश ज्योतीरंजन मंत्री, इंग्रजी भाषण, स्वातंत्र्यदिन, ५) मोहिका विनोद भाबल, मराठी कविता सुंदर सुंदर माझा देश, ६) रेयांश ज्योतीरंजन मंत्री, वेशभूषा, महात्मा गांधी, ७) अहाना आदित्य ठक्कर वेशभूषा, कस्तुरबा गांधी, ८) मराठी गाणं, जय जय महाराष्ट्र माझा

संस्थेचे पद्मश्री मानद प्रमुख कार्यवाह श्री. उदय विश्वनाथ देशपांडे यांच्या हस्ते कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना भारताचा ध्वज व पेन संच देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.

४.१ (३) गणेशोत्सव

दि. २७ ते ३१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत श्री समर्थ व्यायाम मंदिराचा शतकमहोत्सवी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात व दिमाखात साजरा करण्यात आला. या गणेशोत्सवाचे प्रमुख म्हणून संस्थेचे अध्यक्ष ॲड. अरुण देशमुख यांनी काम पाहिले. संस्थेची स्थापना दि. २३ ऑगस्ट १९२५ रोजी गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर पूज्य संस्थापक व्यायाम महर्षी कै. प्र. ल. काळे गुरुजी यांनी केली होती. गणेशोत्सवानिमित्त दि. २३ ते ३१ ऑगस्ट २०२५ दरम्यान संस्थेवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. यंदा गणेशोत्सवात निबंध, वक्तृत्व, गणपती कार्यशाळा, बुद्धिबळ, अथर्वशीर्ष आवर्तन, योगकेंद्र व समर्थ क्रीडा भवन सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

दि. २३ ऑगस्ट २०२५ रोजी श्री गणेश मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज मैदानाला प्रदक्षिणा घालून संस्थेमध्ये श्री गणेशमूर्तीचे आगमन झाले. मिरवणुकीत ॲड. अरुण देशमुख, कार्योपाध्यक्ष श्री. स्वप्नील राणे, कोषाध्यक्ष श्री. स्वप्निल खेसे, ॲथलेटिक्स् विभाग प्रमुख श्री. सुनील सवने, सदस्य श्री. भूपेश ठाकूर, सेवक प्रतिनिधी श्री. प्रेमचंद्र तारी, श्री. महेंद्र राऊत, श्री. सचिन मोरे, श्री. प्रभू वाकळे, पथक शिक्षिका सौ. उल्का भगत, सौ. वर्षा खोत तसेच संस्थेतील सर्व पथकातील विद्यार्थी उपस्थित होते. खो-खो विभागातील महिला खेळाडूंनी पारंपरिक लेझीम नृत्य सादर करून श्री गणरायाला मानवंदना दिली. श्री गणपतीच्या मूर्तीचे सौ. सुखदा देशपांडे, सौ. उल्का भगत, सौ. अदिती गिलातर, सौ. वर्षा खोत, सौ. प्राची दवंडे व कु. विजयश्री माजगावकर यांनी औक्षण केले. गणपतीची मूर्ती कांदिवली येथील गणेश कृपा या कार्यशाळेतून श्री. स्वप्निल खेसे, शंतनू लोहार, मित वरळीकर आणि समर्थ पाटील यांनी आणली. ही मूर्ती श्री. फिरोज बेळगावकर यांच्या कडून देण्यात आली.

प्राणप्रतिष्ठा व सत्यनारायण पूजा: दि. २७ ऑगस्ट रोजी सकाळी १२.३० वाजता श्री. प्रशांत देशपांडे गुरुजी यांच्या हस्ते श्री गणपतीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा संस्थेची मल्लखांब खेळाडू सौ. तेजल मुसळे सहाणे व तिचे पती श्री. अजिंक्य सहाणे यांच्या हस्ते संपन्न झाली. त्याच दिवशी दुपारी ३ वाजता श्री. गणेश करंबेळकर गुरुजी यांच्या हस्ते श्री सत्यनारायण पूजा संस्थेची ॲथलेटिक्स् खेळाडू सौ. अमृता माने व तिचे पती श्री. साहिल सोहनी यांच्या हस्ते पार पडली. या प्रसंगी कार्यवाह पद्मश्री उदय देशपांडे, कोषाध्यक्ष श्री. स्वप्निल खेसे, सेवक श्री. महेंद्र राऊत व श्री. सचिन मोरे उपस्थित होते. पूजेसाठी पाट व चौरंग श्री. संजय अहिर यांनी गणेश उद्यान, छत्रपती शिवाजी पार्क मैदान यांच्या कडून उपलब्ध करून दिले. श्री. श्रेयस म्हसकर यांनी पंचामृत दिले.

रोज सकाळी ८ वाजता प्रभात पथक व योगाश्रम तर संध्याकाळी ८ वाजता सर्व पथकातील मुलांनी व पालकवर्ग यांनी आरती केली. प्रसादासाठी श्री. ज्ञानेश्वर फडतरे यांनी चिक्की, राजगिरा लाडू व बटाटा वेफर्स, सौ. अंजली पुरंदरे यांनी ५० चिक्की, श्री. मारू यांनी १५० चिक्की दिली. मल्लखांब पथकातील पालक सौ. अर्चना सूर्यवंशी यांनी पाच दिवस सुंदर हारांची सेवा केली.

विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम

निबंध स्पर्धा – २३ मुली व ४ मुलगे असे एकूण २७ विद्यार्थी सहभागी झाले. २ वयोगटात ही स्पर्धा झाली. विषय – १) माझा आवडता खेळ २) श्री समर्थ व्यायाम मंदिराचे शतक ३) श्री समर्थमधली खास आठवण. या स्पर्धेचे परीक्षण सीमा कोल्हटकर यांनी केले.

वैयक्तिक व सांघिक नृत्य आणि वक्तृत्व स्पर्धा – दि. ३० ऑगस्ट २५ रोजी आयोजित करण्यात आल्या. यात एकूण १५ विद्यार्थी सहभागी झाले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून नृत्यदिग्दर्शिका कु. नियती सुर्वे व गणेशोत्सवाचे प्रमुख ॲड. अरुण देशमुख यांनी काम पहिले तसेच कार्यकारी विश्वस्त श्री. श्रेयस म्हसकर, ॲथलेटिक्स् प्रमुख श्री. सुनील सवने, कोषाध्यक्ष श्री. स्वप्निल खेसे, पथक शिक्षिका सौ. उल्का भगत हे ही उपस्थित होते. संस्थेतील पालक व विद्यार्थी यांनी मोठ्या संखेने उपस्थित राहून सहभागी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

बुद्धिबळ स्पर्धा – दि. ३१ ऑगस्ट २५ रोजी पार पडली. यात एकूण १७ विद्यार्थी सहभागी झाले. परीक्षक – श्री. चंद्रशेखर कोल्हटकर, ॲड. अरुण देशमुख व कोषाध्यक्ष श्री. स्वप्निल खेसे.

संस्कृतिक कार्यक्रम – दि. २९ ऑगस्ट २५ रोजी समर्थ योगकेंद्रातील महिला योगसाधिका व शिक्षिका यांनी मंगळागौर पारंपरिक नृत्य सादर केले. या प्रसंगी गणेशोत्सवाचे प्रमुख ॲड. अरुण देशमुख, कार्यवाह पद्मश्री उदय देशपांडे, ॲथलेटिक्स् प्रमुख सुनील सवने व सेवक प्रतिनिधी श्री. प्रेमचंद्र तारी, योग शिक्षिका सौ. उमा परब, सौ. सुचेता वैद्य, सौ. कल्पना हासे, सौ. स्मिता जाधव व सौ. कविता मिश्रा उपस्थित होते.

अथर्वशीर्ष आवर्तन – यंदा प्रथमच संस्थेत अथर्वशीर्षाचे आवर्तन ठेवण्यात आले, दि. ३१ ऑगस्ट २५ रोजी ते पार पडले. या प्रसंगी गणेशोत्सवाचे प्रमुख ॲड. अरुण देशमुख व कोषाध्यक्ष श्री. स्वप्निल खेसे हे उपस्थित होते.

बक्षीस वितरण व विसर्जन – दि. ३१ ऑगस्ट २५ रोजी सायं. ६.३० वाजता बक्षीस समारंभ झाला. गणेशोत्सवाचे प्रमुख ॲड. अरुण देशमुख, कार्योपाध्यक्ष श्री. स्वप्नील राणे, ॲथलेटिक्स् प्रमुख श्री. सुनील सवने, कोषाध्यक्ष श्री. स्वप्निल खेसे, सदस्य श्री. रुपेश शेलटकर व श्री. धर्मेंद्र पटेल यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. बक्षिसे श्री. पांडुरंग हरी वैद्य, वैद्य ॲन्ड सन्स ज्वेलर्स यांनी प्रायोजित केली होती. सायंकाळी ७ वाजता आरती करून संस्थेचे व्यवस्थापक मंडळ सदस्य श्री. गणेश स्वार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथील बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी उपलब्ध केलेल्या कृत्रिम तलावात श्री गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यात आले.

४.१ (४) १०० तास अविरत रिले दौड

शतक महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित '१०० तास अविरत रिले दौड' - दि. १९ ते २३ ऑगस्ट २०२५

संस्थेच्या शतकपूर्ती वर्षाचे औचित्य साधून संस्थेच्या ॲथलेटिक्स पथकाचे पथक प्रमुख श्री. सुनील बापू सवने यांच्या मार्गदर्शनाखाली '१०० तास अविरत रिले दौड' मंगळवार, दि. १९.८.२५ दुपारी तीन वाजल्यापासून शनिवार दि. २३.८.२५ संध्याकाळी सात वाजेपर्यंत यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली.

या दौडची सुरुवात मंगळवार दि. १९ ऑगस्ट, २०२५ रोजी बरोबर दुपारी ३.२० मिनिटांनी संस्थेचे प्रमुख कार्यवाह पद्मश्री श्री. उदय विश्वनाथ देशपांडे तसेच स्थानिक आमदार श्री. महेश बळीराम सावंत, ॲथलेटिक्स प्रमुख श्री. सुनील बापू सवने यांनी '१०० तास अविरत रिले दौड' ची पहिली जोडी श्री. संजय कृष्णा दळवी आणि सौ. श्रुती संजय दळवी यांच्याबरोबर स्वतः धावून केली. ह्या '१०० तास अविरत रिले दौड' मध्ये सर्वात कमी वयाची धावक कुमारी ओवी लकीश जाधव वय वर्ष सहा, हिने श्री छत्रपती शिवाजी महाराज उद्यानास ६ फेऱ्या मारल्या तसेच सर्वात जेष्ठ धावक श्री. धर्मेंद्र मगनलाल पटेल वय वर्षे ६२ यांनी मैदानाच्या पाच पूर्ण फेऱ्या मारल्या. संस्थेचे आजी-माजी खेळाडू, पालक, सभासद, आजीव सभासद, हितचिंतक अशा एकूण १४२ धावकांनी उस्फूर्तपणे सहभागी होऊन हा उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला.

ह्या उपक्रमासाठी ॲथलेटिक्स् पथकाच्या खेळाडू प्रियंका शेट्टी यांच्या मदतीने श्री. अधिराज लोकेगांवकर यांची संस्था 'शुभा एडयू फोर्ट' एल्.एल्.पी. यांनी रोख रुपये २५,०००/- देणगी दिली. तसेच संस्थेचे माजी खेळाडू श्री. साहिल आणि शुभम आनंद देवकर यांच्याकडून सहभाग घेतलेल्या सर्व धावकांसाठी आकर्षक असे सन्मान चिन्ह देण्यात आले. ॲथलेटिक्स् पथकाचे खेळाडू संजय कृष्णा दळवी यांच्या मदतीने श्री. सुजित आपटे यांच्याकडून ह्या दौडसाठी लागणाऱ्या पाण्याच्या बाटल्या पुरविण्यात आल्या. पालक श्री. रणजीत निकम आणि गीता रमेश गवळी यांच्या मित्र परिवाराकडून संपूर्ण दौडसाठी खाऊ म्हणून केळी पुरवण्यात आली. ॲथलेटिक्स खेळाडू जॉली जॉर्ज आणि नीता नावडकर यांच्याकडून सुका खाऊ देण्यात आला. स्थानिक आमदार श्री. महेश बळीराम सावंत यांच्यामार्फत या संपूर्ण कालावधीसाठी सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली, 'ग्लुकॉनडी'ची पाकिटेही देण्यात आली. ही दौड संपल्यानंतर सर्व धावक, स्वयंसेवक, पालक, कार्यकर्ते, शिक्षकवर्ग यांच्यासाठी श्रमपरिहार म्हणून स्वादिष्ट अशा स्नेहभोजनाची व्यवस्था सौ. प्रियंका अक्षित शेट्टी आणि श्री. स्वप्निल कमलाकांत राणे यांच्याकडून करण्यात आली. यामध्ये सहभाग घेतलेल्या सर्व धावकांचा आणि स्वयंसेवकांचा यथोचित सन्मान श्री समर्थ व्यायाम मंदिराचे अध्यक्ष ॲड. श्री. अरुण देशमुख, ज्युदोचे पथक प्रमुख श्री. रविंद्र पाटील तसेच ॲथलेटिक्स् पथक प्रमुख श्री सुनील बापू सवने यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

ॲथलेटिक्स् पथकाचे सर्व खेळाडू, पालक वर्ग, स्वयंसेवक, वरद पाटील, धनेश हेदवीकर, सर्व पथकांचे पथक प्रमुख, खेळाडू यांच्या सहकार्याने ही दौड पूर्ण झाली. शिवाजी पार्क पोलीस स्टेशन, दादर पोलीस स्टेशन, (वाहतुक विभाग), बृहन्मुंबई महानगरपालिका जी-उत्तर विभाग, स्थानिक आमदार श्री. महेश बळीराम सावंत, देणगीदार तसेच संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्री. अरुण देशमुख, कार्योपाध्यक्ष श्री. स्वप्निल राणे, प्रमुख कार्यवाह, पद्मश्री श्री. उदय देशपांडे सर, व्यवस्थापन सचिव डॉ. नीता ताटके, कोषाध्यक्ष, श्री. स्वप्निल खेसे, विश्वस्त प्रतिनिधी श्री. श्रेयस म्हसकर सर तसेच व्यवस्थापक मंडळ सदस्य, सर्व कार्यालयीन सेवक यांच्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून आणि पुन्हा एकदा संस्थेचे पूज्य संस्थापक कै. प्रल्हाद लक्ष्मण काळे गुरुजी यांना विनम्र अभिवादन करून ह्या उपक्रमाचा सांगता समारंभ करण्यात आला.

४.१ (५) ३० वा वार्षिक क्रीडा महोत्सव

श्री समर्थ व्यायाम मंदिराच्या ३० व्या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजता आंतरराष्ट्रीय ज्युदोपटू श्री. कृष्णा थापा यांच्या शुभहस्ते श्रीफळ वाढवून व ध्वजारोहणाने उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. याप्रसंगी सर्वसाधारण पथकातील सर्व शिक्षिकवृंद उपस्थित होत्या.

वार्षिक क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यात मल्लखांब, खो-खो, ॲथलेटिक्स आणि ज्युदो या क्रीडाप्रकारांमध्ये राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केलेल्या खेळाडूंनी हातात प्रज्वलित मशाली घेऊन क्रीडांगणाला फेरी मारली. या मशाल संचलनाने संपूर्ण वातावरणात क्रीडाभावना आणि उत्साह निर्माण झाला. उपस्थित मान्यवरांसमोर विविध गटांतील खेळाडूंनी आपापल्या क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके सादर केली. राष्ट्रीय ज्युदोपटू कु. वेदांत जगडे यांनी सर्व स्पर्धकांना क्रीडा शपथ दिली.

या वार्षिक क्रीडा महोत्सवात एकूण २८० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. महोत्सवांतर्गत अंतर्गत तसेच खुल्या गटातील विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये दोरीच्या उड्या, सूर्यनमस्कार, जोर-बैठका आणि कुस्ती यांसारख्या स्पर्धांचा सुद्धा समावेश होता. विविध स्पर्धांमधून खेळाडूंना आपले कौशल्य, शारीरिक क्षमता, शिस्त आणि खिलाडूवृत्ती प्रदर्शित करण्याची संधी मिळाली. राज्य व राष्ट्रीय स्तरावर यश मिळविलेल्या खेळाडूंनी स्पर्धांमध्ये पंच म्हणून जबाबदारी पार पाडली.

या क्रीडा महोत्सवाचा पारितोषिक वितरण समारंभ दिनांक ७ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजता उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना गौरविण्यात आले. सर्वोत्कृष्ट स्पर्धकांना संस्थेची मानद पदके प्रदान करून त्यांच्या मेहनतीचा, जिद्दीचा आणि क्रीडा क्षेत्रातील कामगिरीचा सन्मान करण्यात आला.

या ३० व्या वार्षिक क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून खेळाडूंमध्ये क्रीडाप्रेम, शिस्त, संघभावना आणि निरोगी जीवनशैलीची प्रेरणा निर्माण झाली. खेळाडूंच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि उत्कृष्ट कामगिरीमुळे हा महोत्सव संस्मरणीय ठरला.

५. अभिनंदन

१. दि. ३.५.२०२५ रोजी संस्थेच्या **विश्वस्त सौ. पद्मजा फेणाणी जोगळेकर** यांना सावरकर स्मारक येथे झालेल्या एका भव्य समारंभात रामुभैया दाते स्मृती समितीच्या वतीने ज्येष्ठ संगीतकार श्री. अशोक पत्की यांच्या हस्ते **'अरुण दाते कला सन्मान पुरस्कार'** प्रदान करण्यात आला.

२. दि. २२.८.२५ संस्थेची माजी विद्यार्थिनी व सुप्रसिद्ध कलाकार **स्पृहा जोशी** हिस **'सायबर इन ट्रायबल पुरस्कारा'**ने सन्मानित करण्यात आले. सावरकर स्मारक येथे झालेल्या एका भव्य कार्यक्रमात श्री. उदय वि. देशपांडे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

३. 'इंडियन पोलीस मित्र मंडळ, भारत'च्या' वतीने 'विवेकानंद सांस्कृतिक केंद्र, कोलंबो, श्रीलंका येथे 'सेलिब्रेटिंग सर्व्हिस, ऑनरिंग एक्सलन्स अँड इन्स्पायरिंग सोसायटी' या एका विशेष समारंभात **श्री. उदय विश्वनाथ देशपांडे 'लाईफ टाईम अचीव्हमेंट'** पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

४. दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी एकता महिला मंडळ, पनवेल येथे सरोजिनी नायडू यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने कॉंग्रेस भवन सभागृह, पनवेल येथे या मंडळातर्फे **'संस्कृती रक्षक पुरस्कार'**ने **प्रचिती देसाई व ईशा देसाई** या संस्थेच्या दोन मल्लखांब खेळाडूंना, पनवेल येथे मल्लखांब प्रचार-प्रसाराचे कार्य केल्याबद्दल अभिनंदनपूर्वक मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. श्री. उदय वि. देशपांडे यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

५. दि. २७.३.२०२६ रोजी ज्युदोच्या विकासासाठी दिलेल्या मोलाच्या योगदानाची दखल घेत 'ज्युदो फेडरेशन ऑफ इंडिया' (JFI) च्या प्रशासकांनी **सेन्सेई रवींद्र वा. पाटील** यांना **'८ वी डिग्री ब्लॅक बेल्ट'** प्रदान करून सन्मानित केले.

सत्कार

संस्थेचे प्रमुख प्रशिक्षक व प्रमुख कार्यवाह श्री. उदय वि. देशपांडे यांचा खालील ठिकाणी विशेष सत्कार करण्यात आला,

१. दि. ०५.०४.२५ अनुजा क्रिएशन यांचेतर्फे दादर माटुंगा कल्चरल सेंटर येथे झालेल्या 'गगन सदन' या कार्यक्रमात, तसेच सावरकर स्मारक येथे दि. २५.०३.२६ रोजी झालेल्या गीत रामायण या कार्यक्रमात

२. दि. ०७.०४.२५ रोजी इंस्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी येथे ‹आरोग्य धनसंपदा २५' तर्फे जागतिक आरोग्य दिनानिमित्त

३. दि. ११.०४.२५ रोजी सातारा येथे परिसर ज्येष्ठ नागरिक संघातर्फे

४. दि. २२.४.२०२५ रोजी डी.टी.एस्.एस्. शहा कॉलेजच्या संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी

५. दि. १७.४.२५ जुनी प्रभादेवी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, प्रभादेवी यांचेतर्फे आयोजित जिल्हा ज्यूनियर कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी श्री. उदय वि. देशपांडे व मल्लखांब प्रात्याक्षिकामध्ये भाग घेणाऱ्या सर्व रोजी खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

६. दि. ०६.०८.२५ रोजी वैद्य सभागृह, दादर येथे झालेल्या जनकल्याण बँकेच्या आजीव सभासद सभेत

७. दि. ०७.०९.२५ दादर सार्वजनिक वाचनालयाच्या वार्षिक साधारण सभेत

८. दि. २६.०९.२५ घाटकोपरच्या रसिक रंजन सभा या संस्थेनी एका विशेष कार्यक्रमात

६. इतर विशेष

अ) विविध उपक्रम

- दि. ०६.०४.२५ सावरकर स्मारक येथे रामनवमी उत्सवानिमित्त झालेल्या होमहवनाला श्री. उदय वि. देशपांडे व डॉ. नीता ताटके यांना निमंत्रित करण्यात आले होते.

- दि. १९.४.२५ रोजी श्री. शिरीष चक्रदेव यांनी समर्थला भेट देऊन नागपूर येथे मल्लखांब सुरु करण्याबद्दल चर्चा केली.

- दि. २५.४.२६ रोजी डॉ. भोपाल शिंदे यांनी 'मेडिकल किट' संस्थेला भेट दिली.

- दि. १३.५.२६ रोजी महाराष्ट्र कामगार कल्याण पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम श्री. उदय वि. देशपांडे यांच्या हस्ते कामगार कल्याण केंद्र, प्रभादेवी येथे पार पडला.

- दि. १५.५.२५ रोजी शिवाजी पार्क ओपन जिम्नॅशियम आणि शिवाजी पार्क नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'ऑपरेशन सिंदूर सन्मान यात्रा' या उपक्रमात श्री. उदय वि. देशपांडे व संस्थेतील कार्यकर्ते-खेळाडू सहभागी झाले होते.

- दि. २४.५.२५ रोजी राजभवन येथे झालेल्या मल्लखांब प्रशिक्षण शिबीरामधील प्रशिक्षकांसाठी खास 'राजभवन दर्शन' आयोजित करण्यात आले होते. राजभवनामध्ये काही वर्षांपूर्वी सापडलेले भुयार, खास समारंभांसाठी असलेली सभागृहे व तिथे असलेल्या सोईसुविधा या सर्व गोष्टी दाखविण्यात आल्या.

- दि. २५.५.२५ पासून दिव्यांग स्पोर्ट्स अँड कल्चरल फाउंडेशनच्या विनंतीवरून अंध विद्यार्थी चालवतात त्या टँडम सायकली संस्थेमध्ये ठेवायला परवानगी देण्यात आली.

- दि. ५.६.२५ कार्टररोड येथे झालेल्या सायक्लेथॉनची सुरुवात श्री. उदय वि. देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आली. या उपक्रमात संस्थेचे खेळाडू मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

- दि. ८.६.२५ रोजी सोमैय्या महाविद्यालय येथे झालेल्या 'फ्लाय हाय एरियल चायलेंज' या स्पर्धेला श्री. उदय वि. देशपांडे व डॉ. नीता ताटके यांनी पंच म्हणून काम बघितले.
- दि. १५.०६.२५ रोजी मानव सेवा संघ 'संडे फ्रेंड्स' आयोजित रक्तदान शिबीराला श्री. उदय वि. देशपांडे यांनी भेट दिली.
- दि. १६.६.२५ रोजी BJK स्पोर्ट्स सेंटर, लोणावळा येथे तयार होत असलेल्या क्रीडा सुविधांची पाहणी करण्यासाठी श्री. उदय वि. देशपांडे यांनी त्या सेंटरला भेट दिली.
- दि. १९.६.२५ रोजी दिव्यांग स्पोर्ट्स अँड कल्चरल फाउंडेशनच्या माध्यमातून १५ अंध सायकलपटूंनी मुंबई ते पंढरपूर ही सुमारे ४०० किमीची वारी टँडम सायकलीवरून करण्यासाठी समर्थ क्रीडा भवनाच्या प्रांगणातून प्रयाण केले. श्री. अजय लालवाणी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून व श्री. उदय वि. देशपांडे यांच्या हस्ते झेंडा दाखवून या प्रवासाला शुभेच्छा देण्यात आल्या.
- दि. २५.६.२५ रोजी लोकमत वृत्तसमुहातर्फे मुंबईतील काही पद्मश्री पुरस्काराने सन्मानित व्यक्तिंचा 'मुंबई प्रशासनाकडून' तुमच्या अपेक्षा' या विषयावर लोकमत भवन येथे परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादात श्री. उदय वि. देशपांडे यांनी 'क्रीडा सुविधांबाबत' अपेक्षा व्यक्त केल्या. लोकमत वृत्तपत्रात सर्वांच्या मताला चांगली प्रसिद्धी देण्यात आली.
- दि. २४.७.२५ रोजी सकाळी १०.३० ते ११.३० या योगवर्गाच्या सत्रात जनकल्याण बँकेतर्फे 'कॅन्सर प्रोडक्ट्स' ची माहिती देण्यात आली.
- दि. २९.७.२५ रोजी अमेरिकेत राहणारे श्री. सायरस झोरे मुंबईत आले की त्यांची मुलगी मिशेल हिला नियमितपणे सकाळी मल्लखांब शिकवायला आणीत असत. या मुंबई भेटीत त्यांनी श्री. उदय वि. देशपांडे यांच्या सन्मानार्थ खास भोजन दिले.
- दि. ०२.०८.२५ रोजी आंतरराष्ट्रीय योगपटू व पंच डॉ. पल्लवी कव्हाणे यांनी संस्थेला भेट दिली.
- दि. ०९.०८.२५ रोजी श्री. रवींद्रनाथ जगदाळे यांनी प्रभात पथके, योगाश्रम व ५ कामगारांच्या मदतीने पूर्ण सभागृह, स्वच्छता गृह, व्हरांडा, कचेरी याची संपूर्ण सफाई केली. मल्लखांब वर्ग २ अ व ब यांनी श्री. स्वप्निल खेसे यांच्या मार्गदर्शनाखाली गच्चीची सफाई केली. श्री. भूषण गवांदे यांनी यांत्रिक धुलाईने सभागृह पाण्याने स्वच्छ केले.
- दि. २१.८.२५ दादर सांस्कृतिक मंच आयोजित श्रावण महोत्सव या उपक्रमात इतर क्षेत्रातील तज्ज्ञांबरोबर मल्लखांबातील शिवछत्रपती पुरस्कार विजेती अदिती देशपांडे विशेष 'रॅप वॉक'मध्ये सहभागी झाली होती.
- दि. ११.०९.२५ रोजी मध्यप्रदेश येथील मल्लखांब प्रशिक्षक श्री. गोपाळ सिसोदिया यांनी त्यांच्या मल्लखांब खेळाडूंसोबत संस्थेला भेट दिली.

- दि. ०१.१०.२५ रोजी खंडेनवमीनिमित्त संस्थेतील सर्व साधने व साहित्य यांची मांडणी करून व पूजा करण्यात आली. दि. ०२.१०.२५ रोजी दसरा साजरा करण्यात आला.
- दि. ०५.१०.२५ भारतीय स्त्री शक्ती या राष्ट्रीय संस्थेच्या 'तारुण्याच्या उंबरठ्यावर, कुतूहल आणि दक्षता' या विषयावर त्यांच्या प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी डॉ. नीता ताटके यांना आमंत्रित करण्यात आले होते. हे प्रशिक्षण भारतीय स्त्री शक्ती समुपदेशन केंद्र, विलेपार्ले येथे सकाळी १० ते सायंकाळी चार या वेळात पार पडले.
- दि. २५.५.२५ व दि. ०५.१०.२५ रोजी समर्थ क्रीडा भवन येथे दादर सांस्कृतिक मंचातर्फे 'देणाऱ्याने देत जावे' हा उपक्रम राबविण्यात आला.
- दि. ०६.१०.२५ क्रीडा समालोचक श्री. मिलिंद वागळे यांच्या कारकिर्दीची ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आयोजित कार्यक्रमाला श्री. उदय वि. देशपांडे विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.
- दि. ०६.१०.२५ कामगार कल्याण भवनाचे आयुक्त श्री. रविराज इलावे यांचा निरोप समारंभ श्री. उदय वि. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.
- दि. ०९ ते १२.१०.२५ या कालावधीत लायन्स क्लब, आभार फाउंडेशन व श्री समर्थ व्यायाम मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने 'माणुसकीची भिंत' हा उपक्रम पार पडला. तीन दिवसांमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर कपडे, भांडी व इतर जीवनोपयोगी साहित्य जमा होऊन त्याचे वितरणही करण्यात आले. अध्यक्ष ॲड. अरुण देशमुख यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला.
- दि. ११ ते १५.१०.२६ या कालावधीत मुंबई शहर जिल्हा क्रीडाधिकारी आयोजित जिल्हा शालेय खो खो स्पर्धा समर्थच्या मैदानावर यशस्वीपणे घेण्यात आल्या.
- दि. २१.१०.२५ रोजी दीपावलीच्या लक्ष्मी पूजनानिमित्त खो खो पथकानी मैदानावर भव्य रांगोळी काढून साहित्य पूजन केले.
- दि. ९.११.२५ रोजी महानगरपालिकेतर्फे शिवाजी उद्यानात सर्व संबंधित संस्था यांना एकत्र करून 'धूळ प्रदूषण' समस्येवर चर्चा करण्यासाठी कबड्डी असोसिएशन येथे भरविण्यात आलेल्या सभेमध्ये आपल्या संस्थेचे प्रतिनिधित्व कोषाध्यक्ष श्री. स्वप्निल खेसे यांनी केले.
- दि. २०.११.२५ रोजी संस्थेच्या माजी विद्यार्थिनी लथा वॉरियर व तिचे यजमान श्री. विनीत, बेल्जियम मध्ये स्थायिक लेखा वॉरियर यांनी समर्थला भेट दिली. समर्थच्या खेळाडूंचे 'पॉडकास्ट' व इतर उपक्रमांद्वारे समर्थला कशी प्रसिद्धी देता येईल यावर चर्चा करण्यात आली.
- दि. २३.११.२५ प्रभादेवी ते जुहू या पट्टयात वर्ल्ड मिशन सोसायटीतर्फे 'बीच' स्वच्छता उपक्रमात संस्थेच्या खेळाडूंनी भाग घेतला.

- नोव्हेंबर २०२५ डी.टी.टी.एस. कॉलेज ऑफ कॉमर्स अॅंड पी.डी.तुराखिया ज्युनियर कॉलेज ऑफ कॉमर्सचे श्री. शैलेश पडवळ यांनी 'A study of efforts made by Mr. Uday Deshpande for the upliftment and expansion of Mallakhamb and its beneficial impact on sports persons with special reference to Mumbai' या विषयावर श्री जगदीशप्रसाद झाबरमल टिबड़ेवाला विद्यापीठ, राजस्थान या संस्थेला प्रबंध सादर केला. त्यांना या विषयावर विद्यापीठाने 'विद्यावाचस्पती' ही पदवी प्रदान केली.
- दि. ०४.१२.२५ रोजी सद्भक्ती मंदिर, जोगेश्वरी येथील मंदिरात श्री. गौतम सोंदे यांच्या निमंत्रणावरून विशेष पूजा करण्याचा मान श्री. उदय वि. देशपांडे यांना मिळाला.
- दि. ९ ते १२ डिसेंबर २०२५ या कालावधीत आपल्या संस्थेतील मल्लखांबाची शिव छत्रपती पुरस्कार विजेती अदिती देशपांडे हिच्या फ्लाय हाय एरियल आर्टच्या १० खेळाडूंनी अदिती देशपांडे हिच्या मार्गदर्शनाखाली बुडापेस्ट येथे पोल आणि एरियल क्रीडा जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सहभाग घेतला. रेया गाला हिने कनिष्ठ वर्गात ९वे स्थान पटकावले. या पहिल्याच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेण्याची संधी, मिळालेला मोलाचा अनुभव यातून या संघाला चांगली प्रेरणा मिळाली. दि. ७.१२.२०२५ रोजी बजरंगबलीची प्रार्थना करून या संघाने बुडापेस्टला प्रयाण केले.
- दि. १८.०१.२६ रोजी समर्थ क्रीडा भवनच्या मैदानात पतंग महोत्सव साजरा करण्यात.
- दि. २३.०१.२६ रोजी चेंबूर जिमखाना येथे 'मी नाना बोलतोय' हे श्री. सुहास पाठारे यांच्यावर आत्मचरित्रपर लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन श्री. उदय वि. देशपांडे यांच्या हस्ते झाले.
- दि. २७.०१.२६ रोजी जियो वर्ल्ड, येथे 'पिकल बॉल लीग'चे उद्घाटन श्री. उदय वि. देशपांडे यांच्या हस्ते झाले.
- दि. २९.०१.२६ मानसतज्ज्ञ वरदायनी गोऱ्हे, परूल देवल, इरावती जोगळेकर यांच्याशी भेट होऊन क्रीडाक्षेत्रातील आव्हाने यावर सकारात्मक चर्चा झाली.
- दि. ३१.०१.२६ रोजी राज्य मराठी विकास संस्था यांच्या सहयोगाने तयार झालेला 'शिल्पकार चरित्रकोश उद्योग-अर्थकारण – क्रीडा, खंड १२ याचे फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे येथे प्रकाशन श्री. उदय वि. देशपांडे यांच्या हस्ते झाले.
- दि. २४.०२.२६ रोजी दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय नॅचरोपथी संस्थेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या सभेस श्री. उदय वि. देशपांडे उपस्थित राहिले होते.
- दि. ०७.०३.२६ रोजी डॉ. राम व सुनिता गोडबोले या विवेकानंद केंद्रात कार्यरत असलेल्या दांम्पत्याचा महाराष्ट्र हायस्कूल येथे पद्मश्री पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला होता. या सत्कार समारंभाला श्री. उदय वि. देशपांडे, डॉ. नीता ताटके व संस्थेच्या मल्लखांब पथकातील काही मुली उपस्थित राहून या दोघांनी प्रामुख्याने छत्तिसगड येथे केलेल्या कार्याची माहिती करून घेतली.

- दि. ०८.०३.२६ रोजी डॉ. नीता ताटके यांनी सौ. वर्षा उपाध्ये यांच्याकडे प्रशिक्षण घेत असलेल्या रिदमिक जिम्नॅस्टिक्सच्या खेळाडूंच्या पालकांसाठी 'पालकांची मानसिकता व जबाबदारी' यावर क्रीडाकेंद्र, कालिना विद्यापीठ येथे चर्चा सत्र घेतले.

ब) सन्माननीय अतिथी

श्री. उदय वि. देशपांडे सन्माननीय अतिथी वा विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित खालील कार्यक्रमांना उपस्थित होते,

- दि. १८.४.२५ रोजी एस.बी.एस ग्लोबल स्कूल ग्राउंड, विरार येथे फिटनेस गेम्स तर्फे आयोजित स्वर्गीय श्री. दत्ताराम दुदम नवोदित मल्लखांब स्पर्धा
- दि. १५.५.२५ रोजी रवींद्र नाट्य मंदिर येथे नारायण देसाई फाउंडेशनतर्फे झालेल्या 'मातृभाषा सन्मान – मराठी चित्रपट पुरस्कार' कार्यक्रम
- दि. १९.५.२५ रोजी मुंबई मराठी वृतपत्र लेखक संघ यांचा 'क्रीडा पत्रकार पुरस्कार' समारंभ
- दि. २९.५.२५ रोजी जनकल्याण बँक दादर शाखा येथे जनकल्याण बँकेच्या वर्धापन दिनाचा कार्यक्रम
- दि. ७.६.२५ रोजी आसरा फाऊंडेशन, वर्सोवा यांच्या वतीने 'धरती की पुकार' या माहितीपटाचा प्रक्षेपण कार्यक्रम
- दि. ८.६.२५ रोजी नारायण सेवा संस्थान यांच्या तर्फे निको हॉल विशेष लोकांना 'कॅलिपर्स वितरण' उपक्रम
- दि. २३.६.२५ रोजी आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिनानिमित्त भारतीय क्रीडा भवन येथे झालेल्या वक्तृत्व स्पर्धा
- दि. २९.६.२५ रोजी जोगेश्वरी एज्यूकेशन सोसायटीच्या अरविंद गंडभीर हायस्कूल, जोगेश्वरी येथे निर्धार – एक हात आपुलकीचा यांचेतर्फे रक्तदान शिबीर
- दि. १.७.२५ रोजी महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्र, प्रभादेवी यांच्या ७२ व्या वर्धापन दिन
- दि. ११.७.२५ रोजी सावरकर स्मारक येथे झालेल्या ऑपरेशन सिंदूर स्वदेशीची यशोगाथा कार्यक्रम
- दि. १७.७.२५ रोजी श्री. अशोक व अजित मापुस्कर यांनी लिहिलेल्या 'छंद माझा गिरिशिखरांचा' या पुस्तकाच्या श्रीवर्धन येथे झालेल्या प्रकाशन समारंभ. एव्हरेस्ट वीर ऋषिकेश यादव, 'उदवेली प्रकाशन संस्थे'चे विवेक मेहेत्रे, ठाण्याच्या कऱ्हाडे ब्राम्हण संघाचे सचिव श्री. संदिप कळके हे ही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

- दि. २०.७.२५ रोजी हरिभाऊ विश्वनाथ म्युझिकल्सच्या १००व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम
- दि. ०१.०८.२५ रोजी वृषाली सामंत यांच्या रवींद्र नाट्य मंदिर येथे भरलेल्या चित्रकला प्रदर्शन
